
व्लादीमिर बोगोमोलोव

इवान



रादुगा प्रकाशन
मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई



व्लादीमिर बोगोमोलोव

इवान

कादंबरिका

चित्रे: ओरेस्त वेरेयस्की

लोकवाङमय गृह प्रा. लि.
मुंबई

अनुवादक : अनिल हवालदार
सजावट : स. एं. बाराबाश

Владимир Богомолов

ИВАН

на языке маратхи

Bogomolov V.

IVAN

in Marathi

सोविएत संघात मुद्रित

ISBN 5-05-001326-7

प्रस्तावना

मुले आणि युद्ध

खूप खूप वर्षे युद्ध माहीत नसलेली काही माणसे आहेत. त्यांच्या शहरांवर विमानांनी बाँब टाकले नाहीत, रणगाड्यांच्या चाकांखाली त्यांची पिके चिरडली नाहीत. जवळच्या माणसांच्या मरणाच्या वार्ता घेऊन येणाऱ्या मूक पोस्टमनांनी त्यांच्या घरांची दारे ठोठावली नाही. ह्या माणसांना युद्ध माहीत आहे पुस्तकांमार्फत, चित्रपटांमार्फत, म्हाताऱ्या माणसांच्या कथनामार्फत.

युद्ध माहीत नसलेल्यांना हे पुस्तक कदाचित चकित करील. ज्याने शाळेत जायचे, अभ्यास करायचा, मित्रांबरोबर खेळायचे, असा एक सर्वसामान्य मुलगा रणधुमाळीत अडकला व त्याला सैनिकाचे

मरण आले, ही कथा त्यांना वास्तव वाटायची नाही.

पण ह्या पुस्तकाच्या नायकाबद्दल तुम्ही जे काही वाचाल, इवान असे रशियन नाव असलेल्या रशियन मुलाबद्दल – ते सर्व खरे आहे.

त्याहून आणखी सांगतो: ही कथा म्हणजे युद्धावरील मुले नामक आश्चर्यकारक वीर-इतिहासाचे एक पान आहे, अत्यंत कठोर सत्याचा एक भाग आहे.

युद्ध लढणे पुरुषांचे, प्रौढांचे काम आहे हे सर्वांना माहीत आहे. कोणे एके काळी कदाचित तसेच होते. पण आधुनिक युद्धे – साम्राज्यवादी, आक्रमक – निर्दय आहेत. ही युद्धे ना मुलांची, ना स्त्रियांची, ना म्हाताऱ्यांची गय करतात. ह्या युद्धांमध्ये आक्रमक केवळ सैनिक नसतात, तर खुनी सैनिक असतात.

फॅसिस्ट जर्मनीचे सोविएत संघाविरुद्धचे युद्ध असे होते. अत्यंत कठोर, मानवजातीच्या इतिहासातील अत्यंत विध्वंसक युद्ध.

... २१ जून रोजी रात्री उशीरा सोविएत स्टेशन ब्रेस्त इथून जर्मनीला आगगाडी रवाना झाली. मालडब्यांवर खडूने "धान्य" असा छोटा, भला शब्द होता. आम्ही पश्चिमेला धान्य धाडले होते, आम्हाला शांतता हवी होती.

ज्या दिशेला आगगाडीमधून धान्य पाठवले

होते, त्याच दिशेने आणखी दोन तासांनंतर, २२ जून १९४१ च्या पहाटेला, आमच्या देशावर पोलादाच्या आणि आगीच्या लाव्हारसाचा वर्षाव झाला. आणि फॅसिस्टांच्या रणगाड्यांच्या झुंडी वाटेत आडव्या येणाऱ्या सर्व गोष्टींचा नाश करीत सीमा ओलांडून घुसल्या. घरे कोसळली, पिके जळली. सैनिकांशेजारीच लहान मुले ठार झाली.

मुलांचे रक्षण करण्यासाठी, युद्धाच्या आगीच्या ज्वाला जेथे पोहोचणार नाहीत अशा दूर पिछाडीला त्यांना पाठवण्यासाठी, आमच्या लोकांनी कल्पनातीत प्रयत्न केले. मुलांना सर्वप्रथम युद्ध आघाडीपासून दूर नेण्यात आले, त्यांच्यासाठी मोटारींची आणि विमानांची तरतूद करण्यात आली.

पण मोठी माणसे सर्व मुलांना वाचवू शकली नाहीत.

ब्रेस्तजवळच्या जंगलातील एक एकाकी समाधी मला आठवते. खांबाला ठोकलेल्या पाटीवर लिहिलेय: "इथे तान्या झोपलीय." कोण ही तान्या? ती फॅसिस्टांची बळी कशी ठरली? ह्या पुस्तकाचा नायक इवान ह्याच्याप्रमाणेच ती छोटी सैनिक होती, अथवा केवळ ती मायभूमीत जगत-हिंडत होती, उन्हात आनंदाने बागडत होती, म्हणून फॅसिस्टांनी दुष्टपणे तिला ठार मारून टाकले?

शत्रूच्या पिछाडीला अनेक सोविएत मुले होती आणि मोठ्या माणसांच्या खांद्याला खांदा भिडवून ती लढली.

शांतताकाळात ती कणखर बनली होती. अवघड किलोमीटर म्हणजे काय हे त्यांना कवनांमधून समजले होते, शेकोटयांपाशी त्यांना रात्र समजली होती. सहनशील होण्यास, अचूक नेमबाजी करण्यास, जखमींना बँडेज बांधण्यास, ती शिकली होती.

नवजात सोविएत राज्यासाठी केलेल्या लढाया आठवून मोठ्या माणसांनी त्यांना शिकविले. शाळांमध्ये त्यांना शिकविण्यात आले. पुस्तकांनी त्यांना शिकविले.

सोविएत मुलांचे आवडते लेखक आर्कादी गैदार यांनी युद्धाची भेट अशा शब्दांमध्ये घेतली होती: "मला मृत्यूचा तिटकारा आहे. मला बंदूक द्या आणि गोळया व संगीन यांच्या साह्यानं मायभूमीच्या रक्षणाला मी जाईन."

हा धडा आमच्या मुलांना उपयोगी पडला.

युद्धावरची मुले. मोठ्यांना ती ओझे बनली नाहीत. अत्यंत अवघड क्षणी त्यांचे काम हलके करण्याचे सोविएत माणसांनी प्रयत्न केले. मुलांमध्ये अनेक चिवट, निर्भय योद्धे निघाले.

युद्धाच्या शेवटच्या तोफा धडाडल्यानंतरच्या

दिवसापासून अनेक वर्षे उलटलीत, पण वालोद्या दूबीनिन, गूल्या कोरोल्येवा, झोया कोस्मोदेम्यान्स्काया, अशा बाल-योद्धयांची नावे लोकांच्या कायम स्मरणात आहेत. आणखी अशी खूप खूप नावे त्यांच्या ध्यानात आहेत.

झोया कोस्मोदेम्यान्स्काया पहिल्यांपैकी एक होती. ती अठरा वर्षांची होती. ती टेहळणीसाठी गेली असताना फॅसिस्टांच्या हाती सापडली. त्या कृश अंगकाठीच्या, अबोल मुलीने दाखविलेले धैर्य व निर्धार पाहून फॅसिस्ट थक्क झाले. फॅसिस्टांच्या उलटतपासणीवेळी ती गप्प राहिली, तिचा छळ करण्यात आला तरी तिने स्वतःच्या सहकाऱ्यांचा विश्वासघात केला नाही. नंतर जेव्हा तिला विवस्त्र अवस्थेत, अनवाणी पायांनी, बर्फावरून चालवत वधस्थळाकडे नेण्यात आले, तेव्हा तिने दयेची याचना केली नाही. अत्यंत थंडपणे तिने मृत्यूला स्वीकारले. तिचे नाव अजरामर झाले. त्या नावाने आमच्या मुलांना पराक्रमांना उद्युक्त केले व शत्रूला धडकी भरवली.

वालोद्या दूबीनिन युद्धापूर्वी सहावीत शिकत होता. केर्च येथे भूमिगत गुंफांखाली शत्रूपासून दडून राहिलेल्या पार्तीझानांच्या तुकडीत तो टेहळ्या बनला. हा मुलगा निर्भय होता, चपळ होता,

जेथे एकही मोठा माणूस घुसू शकला नसता अशा फटींमध्ये घुसायचा. शत्रूवर सूड घेणाऱ्या लोकांच्या तुकडीला त्याने खूप मदत केली. त्याला वीरमरण आले.

युद्धावरची मुले. अर्थात सर्वांनीच हाती शस्त्रे घेतली नाहीत. अनेकांनी स्वतःच्या शक्तीनुसार मोठ्यांना मदत केली.

लेनिनग्रादमधील मुलांनी स्थापन केलेल्या एका छोट्या म्युझियममधील शालेय तक्ता मला आठवतो. त्यात फक्त उत्कृष्ट आणि बरे शेरे होते. आता तसे शेकडो हजारो तक्ते आहेत, पण त्यांना काही म्युझियममध्ये ठेवत नाहीत! पण तो तक्ता होता १९४१-१९४२ च्या हिवाळ्यात लेनिनग्रादमध्ये शिकलेल्या एका मुलीचा शहर जळत होते, शहर उपासमारीमुळे आणि थंडीमुळे मृत्युमुखी पडत होते, शहरावर सतत बॉंब व तोफगोळ्यांचा वर्षाव चालू होता, शहराला शत्रूचा पोलादी वेढा पडला होता. अशा युद्धआघाडीवरील परिस्थितीत ती मुलगी स्वतःचे नित्याचे शिकण्याचे काम करीत होती, उत्कृष्ट शिकत होती. ह्यात तिचे धैर्य होते, तिची चिकाटी होती, शत्रूचा ती असा प्रतिकार करीत होती, अशी लढत होती.

युद्धावरील मुलांबाबत असे आणखी खूप वेळपर्यंत

मी सांगू शकेन. पण मला वाटते की, ह्या पुस्तकात तुम्हाला वाचायला मिळणारी कथा पूर्ण उघडपणे, प्रामाणिकपणे आणि कठोरपणे तुमच्या समवयस्काच्या पराक्रमांचे दर्शन घडवील. तो आज हयात नाही. फॅसिझमविरोधी लढ्यात तो ठार झाला. फॅसिझम स्वतःच्या रक्तात घुसमटून गेल्यामुळे, तुझ्याकडे येताना, उद्याच्या मुलांकडे येताना, अर्ध्या वाटेवरच थंडावला.

तरुण वाचका, ह्या चतुर, अवघड पुस्तकाबरोबर मी तुला एकट्याला सोडतो. हे पुस्तक लक्षपूर्वक वाच आणि छोटा रशियन मुलगा इवान ह्याच्यापासून धैर्य, शौर्य शिकून घे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मायदेशावर प्रेम करायला शीक.

यूरी याकोवलेव



१

त्या रात्री पहाटेपूर्वी पहाऱ्याच्या चौक्या तपासण्याचा माझा इरादा होता, म्हणून बरोब्बर चार वाजता मला जागे करा असा हुकूम देऊन मी संध्याकाळी आठनंतर थोड्या वेळातच बिछान्यावर आडवा झालो होतो.

मला आधीच जागे करण्यात आले: घड्याळ्याच्या चमकत्या तबकडीवर काटे एक वाजायला पाच मिनिटे कमी असल्याचे दाखवीत होते.

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट ... अहो कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट ... उठा ..." माझ्या खांद्यांना जोरजोराने कुणीतरी हलवीत होता. टेबलावर जळणाऱ्या

दिव्याच्या मंद प्रकाशात पहारेकऱ्यांच्या तुकडीतील लान्स-कॉर्पोरल वासील्येव मला दिसला. "इथं एकाला पकडलंय... ज्युनियर लेफ्टनंटनी हुकूम दिला की, त्याला तुमच्यासमोर हजर करायचं."

"दिवा मोठा करा!" मी हुकूम दिला. मनात मात्र मी शिव्या देत होतो: माझ्याशिवाय खरे तर ह्या प्रकरणाचा निवाडा करू शकले असते.

वासील्येवने दिव्याची वात वर सरकवली आणि माझ्याकडे वळून अहवाल दिला:

"किनाऱ्याजवळच्या पाण्यात सरपटत होता. कारण सांगत नाही. मुख्य ठाण्याला घेऊन चला अशी मागणी करतोय. प्रश्नांना उत्तर देत नाही. म्हणतो, फक्त कमांडरशी बोलेन. खूप थकलाय, पण कदाचित बहाणा करत असेल. ज्युनियर लेफ्टनंटनी हुकूम दिला..."

पांघरुणाखालील पाय बाहेर काढून फळीवर लोंबते ठेवीत मी डोळे चोळीत उठून बसलो. धिप्पाड केसाळ वासील्येव माझ्यासमोर उभा होता. त्याच्या काळ्या रेनकोटच्या ओल्याचिंब केपमधून पाण्याचे थेंब ठिपकत होते.

मोठ्या केलेल्या वातीमुळे जमिनीखालील प्रशस्त निवारा प्रकाशात उजळला होता. दारापाशी अकरा वर्षांचा एक हडकुळा मुलगा उभा असलेला मला

दिसला. थंडीमुळे तो निळा पडला होता व थरथर कापत होता. त्याच्या अंगाला ओला सदरा व विजार चिपकले होते. अनवाणी छोटे पाय घोटच्यापर्यंत चिखलाने माखले होते. त्याचा तो अवतार पाहून मी शहारलो.

"चुलाण्यापाशी येऊन उभा रहा!" मी त्याला आज्ञा केली. "कोण आहेस तू?"

तो पुढे आला आणि त्याच्या मोठ्या सावध डोळ्यांनी माझ्याकडे एकटक रोखून पाहू लागला. त्याच्या दोन डोळ्यांमधील अंतर वाजवीपेक्षा जास्त होते. त्याची गालफडे वर आलेली होती, त्याच्या कातडीत मळ बसल्यामुळे चेहरा काळसर-भुरकट दिसत होता. त्याच्या अस्पष्ट रंगाच्या ओल्या केसांच्या झिंज्या लोंबत होत्या. त्याच्या नजरेत, त्याच्या घट्ट आवळलेल्या निळ्या ओठांच्या ताणलेल्या चेहऱ्यात, काहीतरी आंतरिक तणाव जाणवत होता. त्याचा अविश्वास आणि वैरभाव मला जाणवला.

"कोण आहेस तू?" मी परत विचारले.

"त्याला बाहेर जाऊ दे," कडकड वाजणाऱ्या दातांमधून दुबळ्या आवाजात तो मुलगा म्हणाला व त्याने नजरेने वासील्येवकडे खूण केली.

"थोडी लाकडं घाला आणि वरती थांबा!" मी वासील्येवला हुकूम दिला.

उबदार निवाऱ्यात जास्तीत जास्त वेळ काढता यावा म्हणून त्याने मोठा सुस्कारा टाकीत सावकाशपणे चुलाण्यातील राख चिमटचाने झटकली, लाकडाचे नवे तुकडे आगीत टाकले व तशाच मंद पावलांनी तो बाहेर गेला. दरम्यान मी पायात बूट चढविले होते व अपेक्षेने मुलाकडे पहात होतो.

"गप्प काय राहिलास? कुठला तू?"

"मी बोन्दारेव," अशा हलक्या स्वरात त्याने ते नाव उच्चारले, जणू हे आडनाव मला काहीतरी सांगू शकत होते, किंवा सर्व खुलासा त्यात सामावला होता. "ताबडतोब मुख्य ठाण्यावर एकावन्नला कळवा, की मी इथं आहे."

"अरे वा रे!" मला हसू आवरले नाही. "पुढं काय?"

"पुढं तुमचा संबंध नाही. ते स्वतः सगळं करतील."

"'ते' म्हणजे कोण? कोणत्या ठाण्याला कळवायचं आणि एकावन्न कोण आहे?"

"सैन्याच्या मुख्य ठाण्याला."

"हा एकावन्न कोण?"

तो गप्प राहिला.

"कुठल्या सेनेची कचेरी पाहिजे तुला?"

"लष्करी टपाल, एकूणपन्नास पाचशे पन्नास..."

त्याने बिनचूकपणे आमच्या सेनेच्या मुख्य ठाण्याचा टपालाचा क्रमांक सांगितला होता.

आता माझ्या चेहऱ्यावरचे स्मित मावळले होते व त्याच्याकडे चकित नजरेने पहात एकूण प्रकरणाचा अंदाज मी घेऊ लागलो होतो.

ढुंगणापर्यंत पोचणारा घाणेरडा सदरा व अरुंद, लांडी विजार. जाडयाभरडया, हातमागावरच्या कापडाचे खेडयात शिवलेले कपडे होते, असा मी तर्क केला. तो अचूक बोलत होता, त्याच्या उच्चारांची ढब मॉस्कोवासी आणि ब्येलारूसमधल्या माणसांसारखी होती. त्याच्या बोलण्याच्या धाटणीवरून तो शहरात वाढलेला मुलगा होता.

नाक सुरसुरत आणि कुडकुडत, आठया घालून सावध नजरेने माझ्याकडे पहात तो माझ्यासमोर उभा होता.

"अंगावरचे सगळे कपडे काढ आणि खसाखसा अंग चोळ. ताबडतोब!" मी त्याला आज्ञा केली व एक मळकट टॉवेल त्याच्यापुढे धरला.

त्याने सदरा काढला. मळाने माखलेल्या त्याच्या कृश शरीरामधून बरगडया डोकावत होत्या. त्याने टॉवेलकडे अनिश्चित नजरेने पाहिले.

"घे, घे! तो मळका आहे."

तो स्वतःची छाती, पाठ, हात पुसू लागला.

"आणि विजार काढ!" मी हुकूम दिला. "तू लाजतोस काय?"

पट्ट्याऐवजी बांधलेल्या टेपची ओली गाठ त्याने तशाच मूकपणे खटपट करून सोडवली व विजार खाली फेकली. अजून तो अगदी लहान मुलगा होता– अरुंद खांदे, बारीक हात-पाय. तो दहा-अकरा वर्षांपेक्षा जास्त मोठा दिसत नव्हता, पण त्याचा दुर्मुखला चेहरा, त्याची मुलाला अस्वाभाविक अशी रोखलेली नजर आणि रेषांचे जाळे पडलेले कपाळ पाहिल्यानंतर त्याचे वय किमान तेरा असावे असे वाटत होते. त्याने विजार व सदरा उचलून दारापाशी कोपऱ्यात फेकले.

"त्यांना वाळवणार कोण–काका?" मी पृच्छा केली.

"माझ्यासाठी सगळं घेऊन येतील."

"असं होय!" संशयित सुरात मी म्हणालो. "कुठं आहेत तुझे कपडे?"

तो गप्प राहिला. त्याचे कागदपत्र कुठे आहेत असे मी पुढे विचारणार होतो, पण तेवढ्यात माझ्या ध्यानात आले की, तो अजून खूप लहान होता, एवढ्या लहान वयाच्या मुलापाशी अधिकृत कागदपत्र असत नाहीत.

झोपण्याच्या फळीखालून मी एक जुने दुलईचे

जाकीट काढले. बटालियनच्या वैद्यकीय उपचार केंद्रावर असलेल्या माझ्या मदतनीसाचे ते जाकीट होते. तो मुलगा चुलाण्यापाशी माझ्याकडे पाठ करून उभा होता. पुढे आलेल्या त्याच्या पाठीच्या हाडांदरम्यान पाच कोपेकच्या नाण्याएवढी मोठी जन्मखूण होती. उजव्या खांद्याच्या हाडापाशी जरा वरती तांबडी जखमेची खूण होती. माझ्या अंदाजानुसार ती गोळीची जखम होती.


"हे काय आहे?"

त्याने मान वळवून माझ्याकडे नजर टाकली, पण तो काहीही बोलला नाही.

"मी तुला विचारतोय, इथं तुझ्या पाठीवर काय आहे?" त्याच्यासमोर दुलईचे जाकीट धरीत मी चढ्या आवाजात विचारले.

"त्याच्याशी तुमचा संबंध नाही. आणि उगीच ओरडू नका माझ्यावर!" मांजरासारखे हिरवेगार डोळे गरागरा फिरवीत तुसडेपणाने तो उत्तरला. मात्र जाकीट त्याने घेतले. "मी इथं आहे असं कळवणं, एवढंच तुमचं काम. बाकीच्याशी तुमचा संबंध नाही."

"तू मला शिकवू नको!" संतापाने थरथरत मी त्याच्यावर खेकसलो. "तू कुठं आहेस आणि कसं वागलं पाहिजेस, हे तुला माहीत नाही. तुझ्या



आडनावामुळं मला कसलाही खुलासा झालेला नाही. तू कोण आहेस आणि कुठून आलास, नदीपाशी का आलास, ह्याचा जोवर खुलासा करत नाहीस, तोवर मी बोटसुद्धा हलवणार नाही."

"ह्याचा तुम्हाला जाब द्यावा लागेल!" उघडपणे धमकी घालीत तो म्हणाला.

"तू मला घाबरवू नकोस – अजून बच्चा आहेस!. मौनाचा खेळ माझ्याबरोबर खेळण्यात तुला यश येणार नाही! सरळ सांग: कुठून आलास तू?"

त्याच्या पायाच्या घोटयापर्यंत पोचणाऱ्या त्या जाकीटात त्याने स्वतःला गुंडाळून घेतले आणि चेहरा दुसरीकडे फिरवून तो गप्प राहिला.

"तू इथं दिवसभर, तीन दिवस, पाच दिवस बसून राहशील, पण तू कोण आणि कुठचा हे जोवर सांगणार नाहीस, तोवर मी कुठंही तुझी बातमी कळवणार नाही!" मी ठामपणे जाहीर केले.

माझ्याकडे थंड आणि परकेपणाने एक दृष्टिक्षेप टाकून परत त्याने तोंड फिरविले व तो गप्प बसला.

"तू बोलणार की नाही?"

"तुम्ही ताबडतोब मुख्य ठाण्यावरच्या एकावन्नला कळवलं पाहिजे की, मी इथं आहे," हट्टाने तो परत म्हणाला.

"मी तुला काहीही देणं लागत नाही," चिडून मी म्हणालो. "तू कोण आणि कुठला हे जोवर सांगत नाहीस, तोवर मी काहीही करणार नाही. अगदी काळ्या दगडावरची रेघ!.. कोण हा एकावन्न?"

त्याने तुसडे कट्टर मौन राखले.

"कुठून आलास तू?" मोठ्या कष्टाने संयम राखून मी विचारले. "मी तुझी बातमी कळवावी असं वाटत असेल, तर बोल पाहू!"

प्रदीर्घ काळ गप्प राहिल्यानंतर, मनाशी खूप विचार केल्यानंतर, त्याच्या दातांमधून अस्फुट शब्द आले:

"त्या किनाऱ्याहून."

"त्या किनाऱ्याहून?" माझा विश्वास बसला नाही. "आणि इथं कसा पोचलास? तू त्या किनाऱ्यावरून आलास हे कसं सिद्ध करशील?"

"मी सिद्ध करत बसणार नाही. यापेक्षा जास्त काहीही सांगणार नाही. माझी उलटतपासणी घेण्याच्या फंदात पडू नका, त्याबद्दल तुम्हाला जाब द्यावा लागेल! आणि फोनवर काहीही बोलू नका. मी त्या किनाऱ्यावरून आलोय ह्याबद्दल फक्त एकावन्नला माहिती आहे. तुम्ही त्याला ताबडतोब कळवलं पाहिजे: बोन्दारेव माझ्यापाशी आहे.

बास्स! माझ्यासाठी येतील ते!" तो ओरडून म्हणाला.

"अरे, तू खुलासा करशील का, तू कोण आहेस, म्हणून तुझ्यासाठी इथं माणसं येतील?"

तो गप्प राहिला.

काही वेळपर्यंत त्याला निरखून पहात मी विचार करीत राहिलो. त्याच्या आडनावामुळे मला काहीही खुलासा झाला नव्हता, पण कदाचित सेनेच्या मुख्य ठाण्यावर त्याला ओळखत असले तर? कशाचेही आश्चर्य वाटून न घेण्याची युद्धामुळे मला सवय झाली होती.

त्याचा अवतार केविलवाणा, थकलेला होता. पण तरी त्याने स्वतःचा स्वतंत्र बाणा टिकवून धरला होता, माझ्याशी तो आत्मविश्वासाने आणि अधिकाराने बोलला होता. त्याने विनंती केली नव्हती, मागणी केली होती. त्याची कष्टी मुद्रा, बालसुलभ नसलेली एकाग्रता आणि सावधता, ह्यांची माझ्यावर विचित्र छाप पडली होती. तो त्या किनाऱ्याहून आला होता, हे त्याचे सांगणे मला धादांत खोटे भासले होते.

सेनेच्या थेट मुख्य ठाण्यावर त्याच्याबद्दलची बातमी कळविण्याचा माझा इरादा नव्हता हे खरे, पण पलटणीच्या मुख्य ठाण्यावर वर्दी देणे माझे

काम होते. मी विचार केला की, ते ह्याला स्वत:कडे घेऊन जातील आणि एकूण प्रकरणाची शहानिशा करतील. मग मी आणखी दोन तास झोप काढीन आणि पहारे तपासायला जाईन.

मी टेलीफोनचा दांडा गरगर फिरवला आणि रिसीव्हर उचलून रेजिमेंटच्या मुख्य कचेरीशी संपर्क जोडला.

"तीन ऐकतोय." कचेरीप्रमुख कप्तान मास्लोवचा आवाज मला ऐकू आला.

"कॉम्रेड कप्तान, आठ बोलतोय! माझ्यापाशी बोन्दारेव आहे. बो-न्दा-रेव! तो मागणी करतोय की, त्याच्याबद्दल 'वोल्गा'ला कळवलं पाहिजे..."

"बोन्दारेव?" मास्लोवने आश्चर्याने उलट विचारले. "कुठला बोन्दारेव? ऑपरेशनचा मेजर तपासणीला आलाय काय? कुठून उगवला तो तुझ्यापाशी?" मास्लोवने प्रश्नांचा भडिमार केला. त्याच्या आवाजातील चिंता मला जाणवली.

"नाही-नाही, हा कुठला तपासणीवाला! हा कोण आहे ते मलासुद्धा माहीत नाही. मुळीच बोलत नाही. त्याची एकच मागणी की, 'वोल्गा'वर एकावन्नला मी कळवायचं, तो इथं आहे."

"हा एकावन्न कोण?"

"मला वाटलं, तुम्हाला माहीत आहे."

“आमच्यापाशी ‘वोल्गा’चे सांकेतिक आकडे नाहीत. फक्त डिव्हिजनचे आहेत. ह्या बोन्दारेवचं काम काय, त्याचा दर्जा कोणता!”

“त्याला दर्जा नाही,” नकळत स्मित करीत मी म्हणालो. “हा लहान पोरगा आहे... सुमारे बारा वर्षांचा मुलगा...”

“तू काय, थट्टा करतोस? कुणाची चेष्टा चालवली आहेस?!” मास्लोव टेलीफोनमधून गरजला. “सर्कसचा खेळ आहे?! मी तुला दाखवीन पोरगा! मी मेजरपाशी सांगीन! तू दारू प्यायलास काय, किंवा दुसरा काही उद्योग नाही तुला? मी तुला...”

“कॉम्रेड कप्तान!” प्रसंगाला भलतीच कलाटणी लागतेय असे पाहून मी चकित होऊन ओरडलो. “कॉम्रेड कप्तान, शपथपूर्वक सांगतो, हा पोरगा आहे! मला वाटलं, तुम्हाला त्याच्याबद्दल माहिती असेल...”

“माहीत नाही आणि माहीत करून घेण्याची इच्छा नाही!” संतापाने मास्लोव ओरडला. “आणि असल्या फालतू बाबी माझ्याकडं आणत जाऊ नकोस! माझ्याशी खेळायला मी काही छोटं बाळ नव्हे! इथं मी गळ्यापर्यंत कामात बुडालोय आणि तू...”

“पण मला वाटलं...”

“काही वाटून घेऊ नको!”

“जशी आज्ञा!.. कॉम्रेड कप्तान, त्याचं काय करायचं, त्या मुलाचं?”

“काय करायचं?.. कसा टपकला तो तुझ्यापाशी?”

“किनाऱ्यावरच्या पहारेकऱ्यांनी पकडला.”

“किनाऱ्यावर तो कसा आला?”

“मला समजलं त्यावरून ...” क्षणभर मी घुटमळलो. “तो म्हणतो, दुसऱ्या बाजूनं आला.”

“तो म्हणतो!” मास्लोवने माझी नक्कल केली. “काय जादूच्या उडत्या गालीच्यावर बसून आला? तो थापा मारतोय आणि तू त्याच्यावर विश्वास ठेवतोस! त्याला पहाऱ्यात बसव!” मास्लोवने हुकूम दिला. “आणि तुला स्वतःला प्रकरण हाताळता येत नसेल, तर झोतोवकडं सोपव. हे त्यांचं काम आहे. खुशाल निस्तरूं देत...”

“तुम्ही त्याला सांगा: जर तो ओरडत राहिला आणि आत्ताच्या आत्ता एकावन्नला त्यानं कळवलं नाही,” अचानक तो मुलगा मोठ्या आवाजात ठामपणे म्हणाला, “तर त्याला जाब द्यावा लागेल!”

पण मास्लोवने एव्हाना रिसीव्हर खाली ठेवला होता. आणि पोरग्यावर व त्याहूनही जास्त मास्लोव-वर संतापून मीही माझा रिसीव्हर खाली आपटला होता.

बाब अशी होती की, बटालियनचे कमांडरपद मी तात्पुरते सांभाळीत होतो आणि मी "तात्पुरता" होतो हे सर्वांना ठाऊक होते. शिवाय माझे वय अवघे एकवीस होते आणि अर्थातच दुसऱ्या बटालियन कमांडरांपेक्षा माझ्याशी सगळे वेगळ्या रीतीने वागत. रेजिमेंटचे कमांडर आणि त्यांचे उप-प्रमुख असा दुजाभाव न दाखविण्याचा जरी प्रयत्न करीत, तरी मास्लोव – माझ्या रेजिमेंट-प्रमुखांपैकी सर्वांत तरुण – मला बच्चा समजत होता हे लपवून ठेवत नव्हता आणि त्यानुसार माझ्याशी वागत होता. वस्तुतः युद्धाच्या पहिल्या महिन्यांपासून मी लढत होतो, माझ्या शरीरावर जखमांच्या खुणा होत्या, छातीवर सन्मानाची पदके होती.

पहिल्या अथवा तिसऱ्या बटालियनांच्या कमांडरांशी तशा स्वरात बोलण्याची मास्लोवची अर्थातच हिंमत झाली नसती. पण माझ्याशी... नीट न ऐकता, न समजून घेता, एकदम ओरडला होता... मास्लोवचे वागणे चूक होते अशी माझी खात्री होती. तरीही पोरग्याला मी दुष्ट आनंदाने म्हणालो:

"तुझ्याबद्दल कळवायला तू सांगितलं होतं – मी कळवलं! हुकूम झालाय की, तुला निवाऱ्यात पहाऱ्यात ठेवायचं," मी खोटे बोललो, "झालास खूष?"

"मी तुम्हाला सांगितलं होतं – सेनेच्या मुख्य



ठाण्यावर एकावन्नला कळवायला. पण तुम्ही कुठं फोन केलात?"

"तू 'सांगितलं म्हणे'!.. मी स्वतः सेनेच्या मुख्य ठाण्याला फोन करू शकत नाही."

"द्या, मी फोन करतो." निमिषार्धात जाकीटामधून हात बाहेर काढून त्याने टेलीफोनचा रिसीव्हर उचलला.

"खबरदार!.. कुणाला तू फोन करणार? सेनेच्या मुख्य ठाण्यावर तू कुणाला ओळखतोस?"

तो गप्प झाला, पण रिसीव्हर मात्र त्याने हातातून सोडला नाही. अखेर कपाळाला आठ्या घालीत तो पुटपुटला:

"लेफ्टनंट-कर्नल ग्र्याझनोव."

लेफ्टनंट-कर्नल ग्र्याझनोव सेनेच्या टेहळयांच्या विभागाचे प्रमुख होते. मी केवळ त्यांना ऐकून जाणत नव्हतो, तर त्यांच्याशी माझी प्रत्यक्ष ओळख होती.

"त्यांच्याशी कशी झाली तुझी ओळख?"

मौन.

"सेनेच्या मुख्य ठाण्यावर आणखी कुणाला ओळखतोस?"

परत मौन, कपाळाखालून एक धावता कटाक्ष आणि दात आवळून:

"कप्तान खोलीन."

खोलीन – सेनेच्या मुख्य ठाण्याच्या हेरखात्याचा ऑफीसर – माझ्या माहितीचा होता.

"त्यांच्या ओळखी कशा झाल्या तुझ्याशी?"

"ग्र्याझनोवना आत्ताच्या आत्ता कळवा – मी इथं आहे म्हणून," माझ्या प्रश्नाला उत्तर न देता पोराने मागणी केली, "नाही तर मी स्वतः फोन करतो!"

त्याच्या हातून रिसीव्हर काढून घेऊन मी आणखी अर्धा मिनिटभर विचार केला; निर्णय करून मी दांडा फिरवला व परत मास्लोवशी संपर्क जोडला.

"आठ बोलतोय. कॉम्रेड कप्तान, कृपया लक्ष देऊन ऐका," मनातील अस्वस्थता आवाजात उमटवू

न देण्याचा प्रयत्न करीत ठामपणे मी म्हणालो. "मी परत बोन्दारेवच्या संबंधात बोलतोय. तो लेफ्टनंट-कर्नल ग्याझनोव आणि कप्तान खोलीन यांना ओळखतो."

"कशी झाली त्यांच्याशी त्याची ओळख?" मास्लोवने थकल्या आवाजात विचारले.

"तो सांगत नाही. माझं मत आहे की, लेफ्टनंट-कर्नल ग्याझनोवना त्याच्याबद्दल कळवलं पाहिजे."

"असं करणं आवश्यक आहे असं तुझं मत असेल, तर कळव," मास्लोव काहीशा बेफिकीरीने म्हणाला. "सगळया फालतू गोष्टी घेऊन वरिष्ठांकडं जाणं, ही तुझी नेहमीची सवय आहे. पण वैयक्तिकरीत्या मला वाटतं की, एवढ्या रात्री वरिष्ठांना सतावण्याची मुळीच गरज नाही. थिल्लरपणा वाटेल!"

"तर तिकडं फोन करायची मला परवानगी देता?"

"मी तुला कसलीही परवानगी देत नाही आणि तू मला अडकवू नको... त्यापेक्षा दूनायेवला फोन कर. मी आत्ताच त्याच्याशी बोललो. तो झोपलेला नाही."

डिव्हिजनच्या टेहळयांचे प्रमुख मेजर दूनायेव यांच्याशी मी संपर्क साधला आणि त्यांना सांगितले

की, माझ्यापाशी बोन्दारेव आहे आणि त्याची मागणी आहे की, लेफ्टनंट-कर्नल ग्र्याझनोव यांना त्याच्याबद्दल ताबडतोब कळविण्यात यावं...

"ठीक आहे," दूनायेवनी माझे बोलणे अर्ध्यात तोडले. "वाट पहा. मी कळवतो."

दोन मिनिटांनंतर फोनची घंटी जोरात खणखणली.

"आठवा?.. 'वोल्गा'शी बोला," टेलीफोन ऑपरेटर म्हणाला.

"गाल्त्सेव?.. नमस्कार, गाल्त्सेव!" लेफ्टनंट-कर्नल ग्र्याझनोव यांचा बसका, खरबरीत आवाज मी ओळखला. त्यांना मी न ओळखणे अशक्य होते. गेल्या उन्हाळ्यापर्यंत आमच्या डिव्हिजनच्या टेहळया विभागाचे ग्र्याझनोव प्रमुख होते, त्यावेळी मी संपर्क अधिकारी होतो व त्यांच्याशी माझ्या वारंवार भेटी घडत होत्या. "बोन्दारेव तुझ्यापाशी आहे?"

"होय, कॉम्रेड लेफ्टनंट-कर्नल!"

"शाबास! (ही शाबासकी नेमकी कुणाला होती ते मला चटकन उमगले नाही: मला अथवा मुलाला.) लक्षपूर्वक ऐक! तुझ्या निवाऱ्यामधून सर्वांना बाहेर पिटाळ. तो कुणाच्या नजरेला पडता कामा नये आणि कुणीही त्याला त्रास द्यायचा नाही त्याच्याबद्दल कोणत्याही चौकशा करायच्या नाहीत,

कोणतीही चर्चा करायची नाही. समजलं?.. माझा त्याला नमस्कार सांग. खोलीन त्याला भेटायला येतोय. मला वाटतं, आणखी तीन तासांनंतर तुझ्या-पाशी पोहोचेल. तोवर त्याला सर्व आवश्यक गोष्टी दे. त्याच्याशी खुबीनं वाग. ध्यानात ठेव: तो पोरगा फार संवेदनाशील आहे. सर्वांत प्रथम त्याला कागद आणि शाई अथवा पेन्सिल दे. तो जे काही लिहील ते लिफाफ्यात घालून ताबडतोब खात्रीच्या माणसाबरोबर लिफाफा रेजिमेंटच्या मुख्य कचेरीकडं पाठव. मी हुकूम देतो, म्हणजे ते तात्काळ माझ्या-पाशी लिफाफा आणून देतील. त्याला सर्व सोयी उपलब्ध करून दे आणि त्याच्याशी बोलण्याच्या फंदात पडू नको. त्याला आंघोळीला गरम पाणी दे, खाऊ घाल आणि झोपू दे. हा आमचा पोरगा आहे. समजलं?"

"समजलं!" मी उत्तरलो. वस्तुतः मला खूप काही समजले नव्हते.

"खायला पाहिजे?" सर्वांत प्रथम मी विचारले.

"मग," डोळे वर न करता मुलगा पुटपुटला.

तेव्हा मी त्याच्यासमोर टेबलावर कागद, लिफा-फा, पेन आणि शाई ह्या वस्तू ठेवल्या. त्यानंतर निवाऱ्यामधून बाहेर पडून वासील्येवला चौकीवर

जायचा हुकूम केला व परत येऊन दाराला कडी लावली.

लालभडक तापलेल्या चुलाण्याकडे पाठ करून बाकाच्या कडेशी मुलगा बसला होता. पूर्वी कोपऱ्यात फेकलेली ओली विजार त्याच्या पायांपाशी पडली होती. सेफ्टी पिनने बंद केलेल्या विजारीच्या खिशातून त्याने एक घाणेरडा हातरुमाल बाहेर काढला; त्याच्या घड्या उलगडून गहू, राय यांचे दाणे, सूर्यफुलांच्या बिया, पाईन व फरच्या सुया, यांचा ढीग टेबलावर ओतला. मग त्यांना स्वतंत्रपणे निवडून त्यांचे वेगवेगळे ढीग बनविले आणि त्याच एकाग्र मुद्रेने प्रत्येक ढीगामध्ये किती संख्या होती त्याची मोजणी करून कागदावर लिहिले.

जेव्हा मी टेबलापाशी गेलो तेव्हा त्याने पटकन कागद उलट केला व माझ्याकडे अप्रिय नजर टाकली.

"मी नाही बघणार, नाही बघणार," घाईघाईने मी आश्वासन दिले.

बटालियनच्या मुख्य कचेरीला फोन करून मी हुकूम दिला की, दोन बादल्या पाणी ताबडतोब तापवा आणि मोठ्या तसराळ्यासह जमिनीखालील निवाऱ्यात धाडा. माझ्या हुकूमाचा पुनरुच्चार करणा-ऱ्या सार्जंटच्या टेलीफोनवरील आवाजात आश्चर्य उमटत असल्याचे मला जाणवत होते. मला आंघोळ

करायची होती असे मी सांगितले. त्यावेळी रात्री दीडचा सुमार झाला होता आणि कदाचित मास्लोव-प्रमाणेच त्याचीही समजूत झाली असावी की, मला दारू जास्त झाली होती अथवा दुसरा काही उद्योग नव्हता. त्याचप्रमाणे पाचव्या कंपनीतील चलाख सैनिक त्सारीवनी ह्याला मी हुकूम दिला की, रेजिमेंटच्या मुख्य कचेरीकडे निरोप घेऊन जायला तयार रहा.

टेलीफोनवरून बोलताना मी टेबलाच्या कडेशी उभा होतो व डोळयांच्या कोपऱ्यांमधून पाहिले की, मुलाने कागदावर रेषांनी भाग पाडले होते व सर्वांत डावीकडील स्तंभात बालीश ठळक अक्षरात तो लिहीत होता: "...२ ...४, ५..." ह्या आकड्यां-चा अर्थ काय होता आणि त्यानंतर त्याने काय लिहिले होते, हे मला तेव्हा समजले नाही व पुढे कधीच समजले नाही.

खूप वेळपर्यंत, सुमारे तासभर, कागदावर निबाने खरवडत, नाकाने सुरसुरत व हातांनी कागदावर आडोसा धरून तो लिहीत होता. त्याच्या हातांच्या बोटांवर ओरखडे व कापल्याच्या खुणा होत्या, त्याची नखे दातांनी कुरतडल्यामुळे आखूड होती. मानेला व कानांना बऱ्याच काळात पाण्याचा स्पर्श नसावा. अधूनमधून लेखन थांबवून तो अस्वस्थपणे ओठ

चावायचा, विचार करायचा किंवा आठवायचा, नाक सुरसुरायचा व परत लिहू लागायचा. एव्हाना गरम व गार पाणी हजर झाले होते. निवाऱ्यात कुणालाही येऊ न देता, मी दारापासून स्वतःच बादल्या व तसराळे आत आणून ठेवले होते. पण त्याचे लेखणीने खरडणे अजून चालूच होते. पाणी गरम रहावे म्हणून बादल्या मी चुलाण्यावरच ठेवल्या.


लिहून संपल्यानंतर त्याने त्या कागदांना घडी घातली, लिफाफ्यात कोंबले व डिंक लावलेली कडा जिभेने ओली करून लिफाफा घट्ट बंद केला. त्यानंतर आणखी मोठ्या आकाराचा लिफाफा घेऊन त्यात पहिला लिफाफा घातला व तशाच रीतीने घट्ट चिकटवला.

मी निरोप्यापाशी लिफाफा नेऊन दिला – तो निवाऱ्याबाहेर उभा होता – आणि हुकूम दिला:

"रेजिमेंटच्या मुख्य कचेरीत ताबडतोब नेऊन द्यायचा. तातडीचा! काम पार पाडल्यानंतर क्रायेवना वर्दी द्या."

मग परत आलो, एक बादलीतील पाण्यात विसण घातले. अंगातील जाकीट काढून मुलगा तसराळ्यात बसला व आंघोळ करू लागला.

मला त्याच्यासमोर अपराधी वाटत होते. त्याला दिलेल्या आदेशांना अनुसरून निःसंशयपणे त्याने



माझ्या प्रश्नांनी उत्तरे दिली नव्हती आणि मी त्याच्यावर ओरडलो होतो, त्याला धमक्या घातल्या होत्या, जी माहिती जाणून घेण्याचे मला कारण नव्हते अशी माहिती त्याच्याकडून काढून घेण्याचा यत्न केला होता. सर्वांना माहीत आहे की, मुख्य ठाण्याच्या वरिष्ठ ऑफीसरांनासुद्धा काही गुपिते न सांगण्याचा टेहळयांना अधिकार असतो.

आता त्याची सरबराई करायला एखाद्या तत्पर नोकरासारखा मी तयार होतो. त्याला आंघोळ मीच घालावी असे मला वाटत होते, पण तसे वागण्याचा मला धीर झाला नाही. तो माझ्या दिशेला पहात नव्हता, माझ्याकडे दुर्लक्ष करीत होता. जणू त्या निवाऱ्यात त्याच्या एकट्याशिवाय कुणीही नव्हते, असा तो वागत होता.

"मी तुझी पाठ चोळून देतो," न राहवून मी चाचरत म्हणालो.

"मी स्वतःच चोळतो!" तो फटकून म्हणाला.

आता हातात स्वच्छ टॉवेल व सुती सदरा धरून चुलाण्यापाशी गप्प उभे राहण्याव्यतिरिक्त मी दुसरे काही करू शकत नव्हतो – त्या सदऱ्याला तो अंगात घालणार होता – आणि मी स्पर्श न केलेले रात्रीचे जेवण भांड्यात ढवळत होतो : मांसासहित नाचणीची पेज.

आंघोळीनंतर त्याचे केस सोनसळी आणि त्वचा गोरी असल्याचे आढळले. फक्त चेहरा व हात वाऱ्यापायी अथवा उन्हापायी रापले होते. त्याचे कान छोटे, गुलाबी, नाजुक होते व ते असमान असल्याचे माझ्या ध्यानात आले. उजवा कान चपटा झाला होता, तर डावा किंचित पुढे डोकावत होता. त्याच्या चेहऱ्यावरील ठळक वैशिष्टय त्याचे डोळे होते – ते टपोरे, हिरवे होते आणि दोन डोळयांमधील अंतर फार असल्याचे जाणवत होते. एवढ्या अलग डोळयांना यापूर्वी मी कधीही पाहिले नव्हते.

त्याने अंग पुसून कोरडे केले, चुलाण्यावर उबदार बनविलेला सदरा माझ्याकडून घेऊन अंगात घातला, काळजीपूर्वक बाह्या वर गुंडाळल्या व टेबलापाशी तो बसला. आता त्याच्या मुद्रेवर सावधता व परकेपणा दिसत नव्हते. त्याची नजर थकली होती, तो कठोर आणि विचारमग्न दिसत होता.

तो अन्नावर तुटून पडेल अशी माझी अपेक्षा होती, पण त्याने अनेकदा चमचा बुडवला, भूक नसल्याप्रमाणे अन्न चघळले व भांडे बाजूला सारले. तशाच रीतीने खूप गोड चहा भांडेभर तो प्यायला – मी साखरेची काटकसर केली नव्हती – आणि माझ्या शिध्यामधून दिलेले बिस्कीट त्याने खाल्ले. मग उठून हळूच पुटपुटला:

"धन्यवाद."

दरम्यान काळयाशार पाण्याचे तसराळे मी बाहेर नेले. फक्त साबणाच्या फेसामुळे वरचे पाणी काहीसे राखाडी दिसत होते. फळीवरची उशी चोपून तयार केली. मुलगा माझ्या बिछान्यात शिरला व गाला-खाली हाताचा तळवा धरून भिंतीकडे तोंड करून निजला. माझ्या सर्व कृती जणू त्याने अपेक्षित धरल्या होत्या. माझ्या ध्यानात आले की, "दुसऱ्या बाजूने" तो काही आज प्रथमच परतत नव्हता आणि त्याला माहीत होते की, त्याच्या आगमनाची वार्ता सेनेच्या मुख्य ठाण्याला समजताच, त्याला सर्व "सुखसोयी उपलब्ध करून देण्याचा" हुकूम तात्काळ दिला जात होता... मी त्याच्या अंगावर दोन पांघरुणे घातली आणि सर्व बाजूंनी त्याला पांघरुणात गुंडाळले – कोणे एके काळी माझी आई मला गुंडाळायची त्याप्रमाणे...

२

आवाज न करण्याची खबरदारी घेत मी शिरस्त्राण घातले, माझ्या ओव्हरकोटावर झूल टाकली आणि चोरपावलांनी निवाऱ्यातून बाहेर पडलो. माझ्या

हुकूमाविना कुणालाही आत सोडायचे नाही अशी जाताना पहारेकऱ्याला मी तंबी दिली.

गडद काळोखी रात्र होती. पाऊस कोसळायचा थांबला होता, तरी उत्तरेचा वादळी वारा घोंघावत होता. सर्वत्र अंधार पसरला होता व कडाक्याची थंडी होती.

माझा जमिनीखालील निवारा खुरट्या झुडुपांमध्ये झेपर नदीपासून सातशे मीटर अंतरावर होता. झेपर आमच्या व जर्मनांच्या दरम्यान होती. समोरचा उंच किनारा भूप्रदेशावर वर्चस्व ठेवून होता आणि आमची मुख्य आघाडी खोलवरच्या प्रदेशात अधिक अनुकूल जागी मोर्चे धरून होती. नदीनजीकच्या प्रदेशात आमच्या चौक्या बसविलेल्या होत्या.

शत्रूच्या किनाऱ्यावरून उडणाऱ्या प्रकाश शलाकांच्या उजेडाच्या आधारे मी खुरट्या झुडुपांमधून अंधारातून वाट काढत होतो. सबंध जर्मन आघाडीवर अधूनमधून त्या शलाका उडत होत्या. रात्रीच्या स्तब्धतेत वारंवार मशिनगनच्या फैरी कडाडत होत्या. दर काही मिनिटांच्या अंतरानंतर जर्मन आमच्या बाजूचा नदीचा प्रदेश आणि खुद्द नदीला मशिनगनच्या फैरींनी विंचरून काढत होते. आमचे रेजिमेंटचे कमांडर ह्या कृतीला "प्रतिबंधक उपाय" म्हणत.

झेपरपाशी येताच सर्वांत जवळच्या आमच्या चौकीच्या खंदकाकडे मी मोर्चा वळविला आणि पहारेकऱ्यांच्या पलटणीच्या प्रमुखाला बोलावणे धाडले.

जेव्हा तो धापा टाकीत आला, तेव्हा मी त्याच्या-सह नदीतीराने निघालो. त्याने मला सरळ "पोरा" बद्दल विचारले. कदाचित मुलाच्या अटकेच्या संबं-धात मी आलो असेन असा त्याने तर्क केला होता. मी चटकन विषय बदलला, पण मनात मात्र त्या मुलाबद्दल पुनःपुन्हा विचार येत होते.

अंधारात दडलेल्या नदीच्या पाण्याकडे मी निरखून पाहिले. ह्या जागी पात्राचा विस्तार अर्धा किलो-मीटर होता. छोटा बोन्दारेव पलीकडील तीरावरून आला होता ह्यावर माझा विश्वास बसत नव्हता. त्याला तिकडून नेणारी माणसे कोण होती आणि ती कुठे आहेत? होडी कुठे आहे? चौकीवरच्या पहारेकऱ्यांच्या नजरांमधून ती कशी हुकली? कदाचित तीरापासून काही अंतरावर त्यांनी त्याला पाण्यात सोडले? पण अशा शारदीय थंडीच्या हवेत एवढ्याशा हडकुळ्या, दुबळ्या मुलाला त्यांनी पाण्यात जाऊ कसे दिले?

झेपर ओलांडण्याची तयारी आमची डिव्हिज़न करीत होती. मला मिळालेली पुस्तिका एव्हाना

तोंडपाठ झाली होती. प्रौढ, निकोप पुरुषांसाठी तयार केलेल्या ह्या पुस्तिकेत म्हटले होते: "...जर पाण्याचे तपमान +१५° सें. पेक्षा कमी असेल, तर उत्तम पोहणारा माणूससुद्धा पैलतीरापर्यंत जाणे अवघड आहे व विस्तृत नद्यांच्या संबंधात तर अशक्य आहे." पण पाण्याचे तपमान +१५सें. ऐवजी +५सें. असेल तर?

नाही, निःसंशयपणे होडी किनाऱ्यापाशी आली असावी, पण मग ती कुणाच्याही नजरेला कशी पडली नाही? मुलाला किनाऱ्यावर ठेवून ती गुपचूप पसार कशी झाली? माझा तर्क चालेना.

पहारे पूर्ण सावध होते. फक्त अगदी नदीजवळील एका बिळात डुलक्या काढणारा सैनिक आम्हाला आढळला. खंदकाच्या भिंतीचा आधार घेऊन, शिरस्त्राण डोळ्यांवर ओढून, उभ्या उभ्याच तो डुलकी काढत होता. आम्ही जवळ आल्याची चाहूल लागताच त्याने अर्धवट झोपेतच टॉमीगन उचलली आणि आमच्यावर फैर उडवली. त्याला आणि स्क्वाड कमांडरला दबत्या आवाजात मी शिव्या घातल्या आणि तात्काळ त्याची तेथून बदली करून त्याला शिक्षा फर्मावली.

पाहणी संपल्यानंतर उजव्या बाजूच्या खंदकात आम्ही बसलो व सैनिकांबरोबर धूम्रपान केले.

मशिनगन लावलेल्या त्या प्रशस्त खंदकात चार सैनिक होते.

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, त्या पोरटचाकडून काय समजलं?" एकाने बसक्या आवाजात मला विचारले. मशिनगनपाशी तो खडा पहारा देत होता व धूम्रपान करीत नव्हता.

"काय विशेष?" मी सावधपणे विचारले.

"असंच. मला वाटतं, हा मामला दिसतो तेवढा साधा नाही. अशा रात्री कुत्र्यालासुद्धा कुणी घराबाहेर हाकलणार नाही, पण तो नदी पोहून येत होता. कशासाठी?.. त्या किनाऱ्यावर जायला होडी शोधत होता का? कशाला?... संशयास्पद पोरटा आहे. त्याची चांगली उलटतपासणी घेतली पाहिजे! त्याला बोलका करायला घट्ट पिळला पाहिजे. त्याच्या तोंडून सगळी हकीकत बाहेर काढली पाहिजे!"

"होय, संशयास्पद परिस्थिती आहे खरी," दुसऱ्याने काहीशा अनिश्चितपणे री ओढली. "एखाद्या लांडग्याच्या पिलासारखा कपाळाला आठ्या घालून गप्प बसला होता, असं मी ऐकलं. आणि अंगावर कपडे का नव्हते?"

"पोरगा नोवोसेल्कीचा आहे," सिगारेटचा सावकाश झुरका घेत मी खोटे बोललो. (आमच्या

पाठीमागे चार किलोमीटर अंतरावर नोवोसेल्की नावाचे एक मोठे, अर्धे जळलेले खेडे होते).
"त्याच्या आईला जर्मनांनी पळवून नेलं, त्यामुळं पोराचं चित्त थाऱ्यावर नाही... तशा मनःस्थितीत नदीत शिरला."

"अच्छा, अशी आहे हकीकत!"

"बिचारा झुरतोय," माझ्यासमोर बसून धूम्रपान करणाऱ्या वयस्क सैनिकाने सहानुभूतीपूर्वक सुस्कारा टाकला. सिगारेटच्या थोटकाचा प्रकाश त्याचा अनेक दिवसांची दाढी वाढलेला रुंद, काळसर चेहरा उजळत होता. "झुरण्यापेक्षा भयानक दुसरं काही नाही! पण यूर्लोवच्या डोक्यात भलतेच विचार. लोकांबद्दल नेहमी वाईट समजुती करून घेतो. तसं वागणं बरं नव्हे," मशिनगनपाशी उभ्या असलेल्या सैनिकाकडे वळून सौम्य आणि समजदारपणे तो म्हणाला.

"मी दक्ष माणूस आहे," बसक्या आवाजात यूर्लोव हट्टाने म्हणाला. "तुझ्या टोचण्यामुळं मी काही बदलणार नाही! पटकन विश्वास ठेवणारी आणि दयाळू माणसं मला मुळीच सहन होत नाहीत. ह्या विश्वास ठेवण्यापायीच सीमेपासून ते मॉस्कोपर्यंत जमीन रक्तानं न्हाऊन निघाली!.. पुरे झालं!.. भलेपणा आणि विश्वासूपणाचं तुला अजीर्ण झालं असेल, तर त्यातला काही हिस्सा जर्मनांना का

देत नाहीस!.. तुम्ही सांगा: त्याचे कपडे कुठं आहेत? आणि पाण्यात तो काय करत होता? सगळं विचित्र आहे. माझ्या मते संशयास्पद आहे!"

"वा रे, वरिष्ठांना उलट प्रश्न करतोस," वयस्क सैनिक हसून म्हणाला. "त्या पोराच्या विचारानं तू अगदी पछाडला आहेस. जणू काही तुझ्याविना प्रकरण निकालात निघणार नाही. त्यापेक्षा कमांड आपल्याला वोदका देण्याबद्दल काय विचार करतेय हे विचार. गोठवणारी थंडी आहे इथं आणि ऊब देणारं काही नाही. लौकर देणार किंवा नाही, हे विचार. त्या पोराचा निवाडा आपल्याशिवाय होऊ शकेल..."

...सैनिकांबरोबर आणखी थोडा वेळ बसल्यानंतर मला आठवण झाली की, लौकरच खोलीन येईल आणि सैनिकांचा निरोप घेऊन मी परतीची वाट चालू लागलो. माझ्या सोबत येण्यास मी त्यांना मनाई केली, पण लौकरच त्याबद्दल मला पश्चात्ताप झाला. अंधारात मी वाट चुकलो. नंतर आढळले की, उजव्या बाजूला झुडुपांमध्ये मी फिरत राहिलो, पहारेकऱ्यांच्या दमदार आरोळ्यांनी मला थांबविण्यात आले. तीस मिनिटांनंतर, वाऱ्याने पुरत्या गारठून गेलेल्या अवस्थेत मी माझ्या निवाऱ्यात कसाबसा पोहोचलो.



आश्चर्य म्हणजे मुलगा झोपला नव्हता.

नुसता सदरा अंगात घालून फळीवरून पाय लोंबते सोडून तो बसला होता. चुलाणा केव्हाच विझला होता आणि निवाऱ्यात बराच गारवा निर्माण झाला होता. तोंडातून हलकी वाफ बाहेर पडत होती.

"अजून आले नाहीत?" मुलाने तडक विचारले.

"नाही. तू झोप, झोप. येतील तेव्हा मी तुला जागं करीन."

"तो पोचला?"

"कोण?" न उमजून मी विचारले.

"सैनिक. लिफाफा घेऊन गेलेला."

"पोचला," माहीत नव्हते तरी मी म्हणालो.

निरोप्याला पाठवून दिल्यानंतर मी त्याच्याबद्दल व लिफाफ्याबद्दल संपूर्ण विसरून गेलो होतो.

काही क्षणपर्यंत तो मुलगा विचारमग्नपणे दिव्याच्या ज्योतीकडे पहात राहिला आणि अनपेक्षितपणे व माझ्या मते काहीशा चिंतेच्या सुरात त्याने विचारले:

"जेव्हा मी झोपलो होतो, तेव्हा तुम्ही इथं होतात? मी झोपेत बोलत नव्हतो?

"नाही, मी नाही ऐकलं. का बरं?"

"काही नाही. पूर्वी मी बोलत नव्हतो. पण आता – मला माहीत नाही. काहीतरी ताण जाणवतो," खेदाने त्याने कबुली दिली.

लौकरच खोलीन आला. उंचापुरा, काळ्या केसांचा, सत्तावीस वर्षांचा हा देखणा पुरुष हातात एक मोठी जर्मन सूटकेस घेऊन सुसाट आत घुसला. चालता चालताच ओली सूटकेस माझ्या हाती कोंबून तो मुलाकडे धावला:

"इवान!"

खोलीनला पाहताच मुलगा क्षणात सचेतन बनला, त्याच्या मुद्रेवर स्मित उमटले. प्रथमच आनंदाचे बालसुलभ स्मित त्याच्या चेहऱ्यावर उजळले होते.

ही जिवलग मित्रांची भेट होती. निःसंशयपणे ह्या क्षणाला मी तिथे अनावश्यक उपरा होतो. मोठ्या माणसांप्रमाणे त्यांनी एकमेकांना मिठ्या मा-

रल्या. खोलीनने मुलाचे अनेक पापे घेतले, मग एक पाऊल मागे होऊन त्याचे अरुंद खांदे धरले आणि अत्यानंदाने त्याला न्याहाळत तो म्हणाला:

"... कातासोनीच तुझ्यासाठी होडी घेऊन दीकोवकाला वाट पाहतोय, पण तू इथं ..."

"दीकोवकाला जर्मन आहेत, किनाऱ्याला पोचणं शक्य नव्हतं," अपराधी स्मित करीत मुलगा म्हणाला. "सस्नोवकापासून मी पोहत आलो. अर्ध्या वाटेवर माझा दम छाटला, त्यातच पायात कळा यायला लागल्या ... वाटलं, आली अखेर ..."

"म्हणजे तू पोहून आलास त्या बाजूनं?!" खोलीन थक्क होऊन उद्गारला.

"ओंडक्याला धरून. तू रागावू नको, तसं करावं लागलं. होड्या वरती होत्या आणि त्यांच्यावर कडक पहारा आहे. आणि तुमचं होडगं अंधारात शोधणं सोपं होतं असं वाटतं? फटक्यात त्यांनी माझा निकाल लावला असता! पुरता थकलो होतो, ओंडका उलटा फिरायचा, निसटायचा, त्यात पायात कळा सुरू झाल्या. म्हटलं, आता खलास! प्रवाहात सापडलो! वाहात वाहात कसा काय किनाऱ्याला लागलो ... समजलंच नाही!"

सस्नोवका नदीच्या वरच्या बाजूला, शत्रूच्या किनाऱ्यावरची छोटी वस्ती होती. पोराला निदान

तीन किलोमीटर अंतर पाण्यातून कापावे लागले होते. अशा अंधाऱ्या रात्री, ऑक्टोबरमधल्या थंडगार पाण्यातून, एवढा छोटा व दुबळा मुलगा पोहून येऊ शकला, हा एक साक्षात चमत्कार होता.

खोलीन मागे वळला. स्वतःचा पिळदार हात त्याने माझ्यापुढे हस्तांदोलनासाठी धरला. नंतर सूटकेस घेऊन सहजपणे फळीवर ठेवली आणि कुलुपे उघडत मला म्हणाला:

"बाहेर जा आणि मोटार आणखी जवळ आणून उभी कर. आम्हाला आणणं जमलं नाही. इथं कुणा-लाही सोडू नका असा पहारेकऱ्याला हुकूम दे, आणि स्वतःही येऊ नको. आम्हाला कुणीही साक्षीदार नकोत. समजलं?

लेफ्टनंट-कर्नल ग्र्याझनोव यांचा आवडता "सम-जलं" शब्द केवळ आमच्या डिव्हिजनमध्येच नव्हे, तर सेनेच्या मुख्य ठाण्यावरही प्रचलित झाला होता.

बाहेर त्यांची मोटार सापडायला मला थोडा वेळ लागला. आमच्या निवाऱ्यापर्यंत कसे यायचे ते शोफरला दाखवून मी सुमारे दहा मिनिटांनंतर परतलो, तेव्हा मुलाचे रूप संपूर्ण पालटले होते.

त्याच्यासाठी खास बनविलेला लोकरी आखूड कोट त्याने अंगात घातला होता. देशरक्षक युद्धाचा किताब आणि नवेकोरे 'धैर्य पदक' त्यावर लटकत होते,

हिमशुभ्र गळपट्टी होती, गडद निळी तुमान होती व सुबक उंच बूट होते. आता तो प्रशिक्षार्थी दिसत होता, रेजिमेंटमध्ये असे अनेक होते, फक्त ह्याच्या कोटाच्या खांद्यावर फिती नव्हत्या; शिवाय प्रशिक्षार्थी ह्याच्यापेक्षा खूपच जास्त निकोप आणि बळकट दिसायचे.

स्टुलावर गंभीरपणे बसून तो खोलीनशी बोलत होता. मी आत येताच ते एकदम गप्प झाले. साक्षीदाराविना बोलता यावे म्हणून खोलीनने मुद्दामच मला मोटारीकडे धाडले असावे, असा विचारसुद्धा माझ्या मनात येऊन गेला.

"कुठं हरवला होतास?" नाराजी दाखवीत तो म्हणाला. "आणखी एक भांडं घे आणि बैस."

ताजे वर्तमानपत्र पसरलेल्या टेबलावर एव्हाना त्याने आणलेले खाद्यपदार्थ मांडून ठेवलेले होते: डुकराची चरबी, धुरावलेली सॉसेज, मांसाचे दोन हवाबंद डबे, बिस्कीटांचा पुडा, खाद्यपदार्थ भरलेल्या दोन कागदी पिशव्या व कापडी आवरणातील बाटली. फळीवर मुलाच्या मापाचा नवाकोरा, खूप सुंदर मेंढकातडी कोट पडला होता आणि कान झाकणारी ऑफीसरची केसाळ टोपी होती.

खोलीनने "चतुरपणे" पावाच्या पातळ फाका कापल्या, नंतर बाटलीतील वोदका तीन भांड्यांमध्ये

ओतली : माझ्यासाठी आणि स्वत:साठी अर्धे-अर्धे भांडे व मुलासाठी बोटभर.

"आपल्या भेटीनिमित्त!" भांडे उचलून खोलीन आनंदित स्वरात म्हणाला.

"मी नेहमी परत यावा म्हणून!" विचारमग्नपणे मुलगा म्हणाला.

त्याच्याकडे धावता दृष्टिक्षेप टाकून खोलीन म्हणाला :

"सूवोरोव विद्यालयात जाऊन तू ऑफीसर व्हावास म्हणून!"

"नाही, ते नंतर!" मुलाने निषेध केला. "जोवर युद्ध चालू आहे, तोवर मी नेहमी परत यावा म्हणून!" हट्टाने तो परत म्हणाला.

"ठीक आहे, वाद नको घालायला. तुझ्या भविष्यकाळासाठी. विजयासाठी!"

आम्ही भांडी एकमेकांवर आपटली व प्यायलो. मुलाला वोदकाची सवय नव्हती. त्याला ठसका लागला, त्याच्या डोळ्यांमधून पाणी आले, त्याने घाईघाईने हळूच डोळे पुसले. खोलीनप्रमाणेच त्याने पावाचा तुकडा उचलला आणि खूप वेळपर्यंत तो हुंगून झाल्यानंतर सावकाशपणे चघळून खाल्ला.

खोलीनने सुबक सँडविच बनविले आणि मुलापुढे धरले. मुलाने एक सँडविच घेतला आणि अनिच्छेने

संथपणे तो खाऊ लागला.

"तू खा, भरपूर खा!" स्वत: चवीने खात खोलीन त्याला आग्रह करीत होता.

"थोडी सवय गेली," उसासा टाकीत मुलगा म्हणाला. "शक्य नाही."

खोलीनला तो "तू" म्हणून संबोधत होता आणि केवळ त्याच्याकडेच पहात होता. जणू मी तेथे नव्हतोच, असा तो वागत होता. वोदकानंतर मी आणि खोलीन खाद्यपदार्थांवर अक्षरश: तुटून पडलो. आमचे जबडे जोरजोरात काम करीत होते. मुलाने मात्र दोन छोटे सँडविच खाल्ले, रुमालाने हात व तोंड पुसले आणि तो पुटपुटला:

"मला पुरे!"

तेव्हा खोलीनने त्याच्यासमोर टेबलावर रंगीबेरंगी कागदांमध्ये गुंडाळलेली चॉकलेटे ओतली. त्याच्या वयाच्या मुलांना चॉकलेटे पाहिल्यावर जसा मनस्वी आनंद होतो, तसा त्याला झाला नाही. जणू काही दररोज तो भरपूर चॉकलेटे खात असावा अशा तऱ्हेने त्याने निर्विकारपणे सावकाश एक चॉकलेट उचलले, त्याचा कागद उलगडून बारीक तुकडा चावला आणि बाकीची चॉकलेटे टेबलाच्या मध्यभागी सारीत तो आम्हाला म्हणाला:

"तुम्ही खा."

"नाही बंधू," खोलीन म्हणाला "वोदकानंतर हे खाणं जमणार नाही."

"तर मग चला," टेबलाकडे परत नजरही न टाकता उठत एकदम मुलगा म्हणाला. "लेफ्टनंट-कर्नल माझी वाट पाहताहेत, इथं कशाला बसायचं?.. चला!" त्याने मागणी केली.

"आत्ता जाऊ," काहीशा गोंधळलेपणाने खोलीन म्हणाला. त्याच्या हाती बाटली होती, अर्थातच मला आणि स्वतःला परत वोदका ओतण्याचा त्याचा इरादा स्पष्ट होता. पण मुलगा उठलेला पाहताच त्याने बाटली परत तिच्या जागी ठेवली. "आत्ता जाऊ," खिन्नपणे तो म्हणाला व उठला.

दरम्यान मुलाने टोपी घालून पाहिली.

"च्यामारी, मोठी होतेय!"

"यापेक्षा लहान नव्हती. मी स्वतः निवडली," खोलीन काहीशा दिलगिरीच्या सुरात म्हणाला. "पण आपण फक्त तिथवर पोहोचण्यापुरती ठीक आहे. मग तिथं दुसरी पाहू..."

खोलीनने टेबलावरील खाद्यपदार्थांकडे खेदाने नजर टाकली, बाटली उचलून हलवून पाहिली, माझ्याकडे दुःखाने पहात उसासत तो म्हणाला:

"किती चांगल्या गोष्टी वाया जात आहेत!"

"त्यांच्यासाठी ठेव!" चिडीच्या आणि तिटकाऱ्या-

च्या स्वरात मुलगा म्हणाला. "तू भुकेला आहेस काय?"

"मुळीच नाही!.. फक्त बाटली – वरच्या श्रेणीच्या लोकांची मालमत्ता आहे," खोलीन चेष्टेच्या सुरात म्हणाला. "आणि चॉकलेटं ह्याच्या कामाची नाहीत..."

"कंजूस वागू नको!"

"नाइलाजानं उदार व्हावं लागणार..." खोलीनने परत सुस्कारा टाकला व माझ्याकडे वळून तो म्हणाला: "पहारेकऱ्याला निवाऱ्यापासून दूर जायला सांग. आणि आम्ही कुणाच्याही दृष्टीला पडणार नाही अशी एकूण खबरदारी घे."

माझी ओली झूल खांद्यांवर टाकीत मी मुलापाशी गेलो. त्याच्या मेंढकातडी कोटाचे हूक अडकवताना खोलीन दिमाख दाखवीत म्हणाला:

"मोटारीत कडबा आहे – आख्खी जुडी! मी पांघरूण आणि उशा घेतल्यात. गुडुप झोपून जाऊ – थेट मुख्य ठाण्यापर्यंत!"

"अच्छा, वान्या!" मी मुलापुढे हात धरला.

"कायमचा निरोप नको. पुन्हा भेटू!" त्याने काटेकोरपणे माझी चूक सुधारली, माझ्या हातात त्याचा छोटा हात कोंबला व कपाळाखालून माझ्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला.

टेहळणी विभागाची ‘ डॉज ’ टप उभारून निवाऱ्यापासून दहा पावलांवर उभी होती. मला ती चटकन दिसली नाही.

“ रोदीओनोव ,” हळू आवाजात मी पहारेकऱ्याला हाक मारली.

“ मी , कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट ! ” माझ्या अगदी पाठीशीच घोगरा, थंडीची बाधा झालेला आवाज ऐकू आला.

“ कचेरीच्या निवाऱ्यात जा. मी लौकरच तुम्हाला बोलावणं धाडीन.”

“ जशी आज्ञा ! ” सैनिक अंधारात गायब झाला.

मी भोवती फेरी मारली – कुणीही नव्हते. ‘ डॉज ’ चा शोफर मेंढकातडी कोटावर रेनकोटची झूल चढवून, चक्रावर डोके टेकवून झोपला होता अथवा डुलकी काढत होता.

मी निवाऱ्यापाशी आलो, चाचपडत दार शोधले व उघडले.

“ चला ! ”

मुलगा आणि हाती सूटकेस घेतलेला खोलीन मला ओलांडून झटदिशी मोटारीकडे गेला. ताडपत्रीची सळसळ झाली, दबत्या आवाजातील त्रोटक संभाषण झाले, खोलीनने ड्रायव्हरला जागे केले – इंजिनाचा आवाज झाला आणि ‘ डॉज ’ जागेवरची हलली.

३

सार्जंट-मेजर कातासोनोव, डिव्हिजनच्या टेहळणी कंपनीच्या पलटणीचे कमांडर, तीन दिवसांनंतर माझ्याकडे आला.

त्याचे वय तिशीच्या पलिकडे होते, उंची फार नव्हती व अंगकाठी हडकुळी होती. लहान तोंड, वरचा ओठ तोकडा, नाक लहान चपटे आणि छोटचा नाकपुडचा, डोळे निळसर-करडे आणि पाणीदार. सौम्य, प्रसन्न चेहऱ्याचा कातासोनोव सशाची आठवण करून द्यायचा. तो नम्र, शांत आणि एकलकोंडा होता. त्याचे बोलणे तोतरे होते व म्हणूनच कदाचित तो लाजरा होता आणि लोकांमध्ये गप्प रहायचा. आमच्या सेनेत युद्धकैद्यांना ओळखून काढण्यात प्रत्यक्षात तो एक सर्वोत्तम शिकारी होता, ह्यावर विश्वास ठेवणे कठीण जायचे. डिव्हिजनमध्ये त्याला "कातासोनीच" अशा लाडक्या नावाने सर्वजण हाक मारीत.

कातासोनोवला पाहताच मला परत एकदा छोटचा बोन्दारेवची आठवण झाली. गेल्या काही दिवसात त्याच्याबद्दलचे विचार अनेकदा माझ्या मनात येऊन गेले होते. संधी सापडताच त्याच्याबद्दल कातासोनोवला माहिती विचारण्याचे मी ठरविले. त्याला नक्की ठाऊक असणार. कारण "जिथं खूप

जर्मन असल्यामुळं किनाऱ्यापाशी जाणं अशक्य होतं," अशा दीकोवकापाशी होडी घेऊन त्या रात्री काता-सोनोव वाट पहात होता.

मुख्य कचेरीच्या जमिनीखालील निवाऱ्याच्या दारापाशी येऊन त्याने स्वतःच्या किरमिजी किनारीच्या टोपीशी हात नेऊन सलाम ठोकला, हळू आवाजात अभिवादन केले आणि पडशी खांद्यावरून न काढता माझे कारकुनांशी काम संपेपर्यंत शांतपणे वाट पहात तो उभा राहिला.

कारकुनांसमोर कामाचा डोंगर होता आणि मी संतापलेला होतो. मास्लोवनी नुकतेच टेलीफोनवरून मला खवट व्याख्यान ऐकवले होते. जवळजवळ रोज सकाळी ते मला फोन करीत आणि त्याच त्या गोष्टी ऐकवत: नियोजित वेळेतील येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व अहवालांची, निवेदनांची, फॉर्मांची आणि आकृतींची सतत मागणी. मला संशय आहे की, तपासणीपैकी काही भाग त्यांनी स्वतःच्या मनानेच शोधून काढला होता: त्यांना कागदी कामाची फार आवड होती.

त्यांचे बोलणे ऐकल्यानंतर एखाद्याला वाटले असते की, ते सर्व कागदपत्र मी वेळच्या वेळी रेजिमेंटच्या मुख्य ठाण्यावर जर पाठवले, तर युद्ध तात्काळ संपेल व आम्ही विजयी होऊ. सर्व काही माझ्यावरच

अवलंबून होते असे भासत होते. मी कामात "तन-मन गुंतवावे" अशी मास्लोवची मागणी होती. मी माझ्याकडून पराकाष्ठा करायचा, पण बटालियनमध्ये अॅडज्युटंट नव्हते, अनुभवी कारकून नव्हते. सर्वसाधारणपणे आमच्याकडून उशीर व्हायचा आणि नेहमी काही ना काही चूक घडायची. हे कारकुनी काम करण्यापेक्षा लढणे जास्त सोपे होते, असा विचार खूपदा माझ्या मनात यायचा. खरा बटालियन कमांडर केव्हा पाठवतील आणि हे काम मी त्याच्यावर केव्हा सोपवीन, त्या क्षणाची मी आतुरतेने वाट पहात होतो.

मी कारकुनांवर आग पाखडत होतो तोवर हातात टोपी घट्ट धरून कातासोनोव दाराशी शांत उभा होता.

"तुझं माझ्यापाशी काम आहे काय?" अखेरीस त्याच्याकडे वळून मी विचारले. वस्तुतः विचारण्याचे कारण नव्हते. मास्लोवनी मला आधीच इशारा दिला होता की, कातासोनोव येईल, त्याला टेहळणी चौकीवर सोड आणि सर्व मदत कर.

"तुमच्यापाशीच," लाजरे स्मित करीत कातासोनोव म्हणाला. "जर्मनांवर नजर टाकायचीय..."

"ठीक आहे... पहा," स्वतःचे मोठेपण सिद्ध करण्यासाठी थोडा वेळ थांबून मी ऐटीत म्हणालो

व कातासोनोवला बटालियनच्या टेहळणी चौकीवर घेऊन जा, असा निरोप्याला हुकूम दिला.

दोन तासांनंतर, रेजिमेंटच्या मुख्य कचेरीकडे सगळे कागदपत्र पाठविल्यानंतर, अन्नाचा नमुना तपासून पाहण्यासाठी मी बटालीयनच्या भटारखान्यात गेलो व तेथून खुरटचा झाडांमधून टेहळणी चौकीवर गेलो.

कातासोनोव स्टेरेओस्कोपिक दुर्बीणीतून "जर्मनांना पहात" होता. मला सर्व परिचयाचे असूनही मीसुद्धा पाहू लागलो.

वाऱ्याने पृष्ठभागावर काळसर खळगे पडलेल्या झेपरच्या विस्तीर्ण उदास पात्राच्या पलिकडे शत्रूचा तीर होता. पाण्याच्या कडेने वाळूचा अरुंद पट्टा गेला होता. त्याच्यावरती एक मीटर उंचीचा उंचवटा होता व त्याच्या पलिकडे अधूनमधून झुडूपे उगवलेला उतरता चिकणमातीचा किनारा होता. रात्रीच्या वेळी शत्रूचे सैनिक तेथे गस्त घालायचे. आणखी पुढे, सरळसोट उभा आठ मीटर उंचीचा सुळका होता. ह्या सुळक्याच्या शिखरालगत शत्रूच्या पुढच्या आघाडीचे खंदक होते. आत्ताच्या क्षणाला तेथे फक्त कामावरचे निरीक्षक उभे होते व बाकीचे निवाऱ्यां-मध्ये विश्रांती घेत होते. रात्रीच्या प्रहरांना जर्मन खंदकांमधून सरपटत यायचे, अंधारात गोळीबार करीत रहायचे व सकाळपर्यंत आकाशात प्रकाश



शलाका उडवायचे.

दुसऱ्या तीरावरील वाळूच्या पट्ट्यावर पाच प्रेते पडली होती. वेगवेगळया अवस्थांमध्ये पडलेली त्यांपैकी तीन प्रेते कुजत होती – एव्हाना संपूर्ण आठवडाभर मी त्यांना पहात होतो. दोन ताजी प्रेते सुळक्याला टेकवून शेजारी शेजारी बसविलेली होती. ती थेट माझ्या टेहळणी चौकीसमोर होती. दोन्हींवरचे कपडे काढलेले होते आणि त्यांच्या पायांमध्ये बूट नव्हते. एकाच्या अंगातील पट्ट्यापट्ट्यांचा खलाशी गंजीफ्रॉक टेलीस्कोपमधून स्पष्ट दिसत होता.

"ल्याखोव आणि मोरोझ," नळीला डोळा तसाच चिकटवून कातासोनोव म्हणाला.

ते त्याचे साथीदार होते, दोघेही डिव्हिजनच्या टेहळणी पथकातील सार्जंट होते. निरीक्षण करता करता त्याने हळू, बोबडया आवाजात घडलेली हकीकत मला सांगितली.

...चार दिवसांपूर्वी पाच टेहळयांचा एक गट समोरच्या तीरावरून एक कैदी धरण्यासाठी गेला होता. खालच्या प्रवाहामधून त्यांनी नदी ओलांडली. कसलाही आवाज न करता त्यांनी कैदी पकडला, पण परतीच्या वाटेवर ते जर्मनांच्या दृष्टीस पडले. तिघेजण कैद्यासह होडीपर्यंत पोहोचून सटकले. (पण एकजण सुरुंगाच्या स्फोटाने ठार झाला व होडीतून

येताना कैदी मशिनगनच्या फैरीत जखमी झाला). दुसरे दोघे – ल्याखोव (खलाशी गंजीफ्रॉकमधला) व मोरोझ – साथीदारांना निसटून जाता यावे म्हणून जर्मनांना थोपवून धरीत होते.

शत्रूच्या पिछाडीला ते दोघे ठार झाले. जर्मनांनी त्यांचे कपडे काढले, रात्रीच्या वेळी त्यांची प्रेते नदीपाशी फरफटत आणून ठेवली आणि आम्हाला दिसतील अशा रीतीने त्यांना बसवून ठेवले – इतरांना धडा शिकविण्यासाठी.

"त्यांना आणलं पाहिजे ..." कातासोनोवने त्रोटक वृत्तांत सुस्कारा टाकीत संपविला.

आडोशामधून आम्ही दोघे बाहेर पडलो, तेव्हा मी त्याला बोन्दारेवबद्दल विचारले.

"वान्याबद्दल विचारताय?" कातासोनोवने माझ्याकडे पाहिले आणि त्याच्या मुद्रेवर प्रेमळ स्मित उजळले. "अजब पोरगा आहे! पण स्वभाव फार विचित्र! काल प्रचंड धुमाकूळ घातला त्यानं!"

"काय घडलं?"

"युद्ध करणं हे काय त्याचं काम आहे?.. त्याला सूवोरोव विद्यालयात पाठवताहेत. कमांडरांचा हुकूम. पण तो ऐकायला मुळीच तयार नाही! एकच ठाम वाक्य: युद्धानंतर. पण आत्ता टेहळ्या म्हणून काम करणार."

"पण कमांडरांचा हुकूम झाल्यानंतर पुढं काय टेहळणी करणार तो?"

"त्याला आवरून ठेवणं कुणाला शक्य आहे? त्याच्या काळजात द्वेष पेटलाय!.. त्याला पाठवलं नाही, तर तो स्वतःच जाईल. एकदा असा गेला होता..." सुस्कारा टाकीत कातासोनोवने घड्याळा-कडे नजर टाकली व घाईघाईने हात दाखवीत विचारले: "फार वटवट केली. तोफखान्याच्या टेहळणी चौकीवर मी ह्या वाटेनं पोहोचेन?"

क्षणार्धात चपळाईने फांद्या बाजूला सारून पावलांचा आवाज न करता तो निघून गेला.

आमच्या बटालियनच्या, आमच्या उजवीकडील तिसऱ्या बटालियनच्या, त्याचप्रमाणे तोफखान्याच्या टेहळणी चौक्यांवरून "जर्मनांना पाहण्यात" व स्वतः-च्या टिपणवहीत नोंदी करण्यात कातासोनोवने संपूर्ण दोन दिवस घालविले. आमच्या टेहळणी चौकीवर सबंध रात्रभर तो टेलीस्कोपपाशी बसून होता आणि परत सकाळी, दिवसा व संध्याकाळी होता, अशी वर्दी माझ्याकडे आली होती. तो झोपत केव्हा होता याबद्दल मी नवल करीत होतो.

तिसऱ्या दिवशी सकाळी खोलीन आला. कचेरी-च्या निवाऱ्यात ताडताड चालत येत त्याने सर्वांना

दमदारपणे अभिवादन केले. "पकड आणि बोलू नकोस, कमी पडलं म्हणून!" असे म्हणत त्याने माझा हात एवढ्या जोरात दाबला, की बोटांची हाडे कडकड वाजली आणि वेदनेने मी कळवळलो.

"तुझी मला गरज आहे!" त्याने मला दम भरला. मग टेलीफोन उचलून तिसऱ्या बटालियनचे कमांडर कप्तान ऱ्याबत्सेव यांच्याशी तो बोलू लागला.

"...तुझ्याकडं कातासोनोव येईल – त्याला मदत कर!.. तो स्वतः खुलासा करील... आणि गरम जेवण खाऊ घाल!.. पुढं ऐक: तोफखान्यामधून किंवा आणखी कुणी माझ्याबद्दल चौकशी केली, तर सांग की तुमच्या कचेरीत मी दुपारी एक वाजल्यानंतर असेन. आणि तुझीसुद्धा मला गरज आहे! संरक्षणाची योजना तयार ठेव आणि जागेवर हजर रहा..." खोलीन म्हणाला.

ऱ्याबत्सेवना तो "तू" म्हणतो. वस्तुतः ऱ्याबत्सेव त्याच्यापेक्षा दहा वर्षांनी मोठे आहेत. मला आणि ऱ्याबत्सेवना तो हाताखालच्या माणसांप्रमाणे वागवतो, पण प्रत्यक्षात तो आमचा साहेब नाही. त्याची वागण्याची तशी रीत आहे. डिव्हिजनच्या कचेरीतील ऑफीसरांशी आणि आमच्या रेजिमेंटच्या कमांडरांशी तो ह्याच पद्धतीने बोलतो. अर्थात आम्हा

सर्वांच्या दृष्टीने वरिष्ठ कचेरीचा तो प्रतिनिधी आहे, पण बाब एवढ्यावरच संपत नाही. अनेक टेहळयांप्रमाणे त्याचीही खात्री झालीय की, सैन्याच्या हालचालींमध्ये टेहळणी हा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे, म्हणून त्याला मदत करणे सर्वांचे कर्तव्य होते.

टेलीफोन खाली ठेवल्यानंतर, माझी पुढे काय कामे आहेत ह्याबद्दल मुळीच विचारणा न करता त्याने मला हुकूम ठोकला:

"संरक्षण-योजना बरोबर घे आणि तुझ्या शिपा-यांची पाहणी करायला जाऊया."

त्याचे असले वागणे मला आवडत नव्हते, पण त्याच्या शौर्याच्या आणि चातुर्याच्या अनेक कथा दुसऱ्या टेहळयांकडून ऐकलेल्या असल्यामुळे मी गप्प रहायचा आणि इतरांना ज्याबद्दल क्षमा केली नसती अशा गोष्टींबद्दल त्याला क्षमा करायचा. वस्तुतः कोण-तेही तातडीचे काम मला नव्हते, पण मुद्दामच म्हणालो की, थोडा वेळ कचेरीत थांबणे आवश्यक होते. निवाऱ्यातून बाहेर पडता पडता तो म्हणाला की, मोटारीपाशी तो माझी वाट पाहील.

सुमारे पंधरा मिनिटांनंतर, रेजिमेंटच्या हुकूमांच्या फायली व रायफलींची कार्डे चाळून, मी बाहेर गेलो. थोड्या अंतरावर फरच्या झाडांखाली टेहळया



विभागाची कॅन्व्हासच्या टपाची 'डॉज' उभी होती. तिचा ड्रायव्हर खांद्यावर टॉमीगन लटकावून फेऱ्या मारीत होता. समोर मोठ्या मापाचा नकाशा पसरून खोलीन चक्रापाशी बसला होता. त्याच्याशेजारी संरक्षण योजना हातात घेऊन कातासोनोव बसला होता. ते बोलत होते, पण माझ्या आगमनासरशी त्यांचे बोलणे थांबले आणि त्यांची डोकी माझ्या दिशेने वळली. कातासोनोवने घाईघाईने मोटारीबाहेर उडी मारली व नेहमीच्या लाजऱ्या स्मिताने मला अभिवादन केले.

"ठीक आहे, चालेल!" नकाशा व योजनेचा कागद गुंडाळून मोटारीबाहेर पडत खोलीन म्हणाला.

"सगळं नीट पाहून घ्या आणि विश्रांती घ्या! दोन-तीन तासांनंतर मी येईन..."

अनेक वाटांपैकी एकीवरून मी खोलीनला पुढच्या युद्धआघाडीकडे घेऊन निघालो. 'डॉज' तिसऱ्या बटालियनच्या दिशेने जाऊ लागली. खोलीन आनंदी, उत्तेजक मन:स्थितीत होता आणि शीळेवर उल्हसित सुरावट वाजवीत चालत होता. हवेत गारठा होता आणि एवढी नीरव शांतता होती, की युद्ध चालू होते ह्याचा विसर पडत होता. पण प्रत्यक्षात युद्ध थेट आमच्या पुढ्यात होते. जंगलाच्या किनार-पट्टीला ताजे खणलेले खंदक होते, दळणवळणाच्या खंदकाकडे डावीकडून रस्ता जात होता. त्या भक्कम खंदकावर वरच्या बाजूने हिरवळीचे व झुडुपांचे काळजीपूर्वक आच्छादन घातले होते. तो खंदक थेट नदीतीरापर्यंत टेकला होता.

बटालियनमध्ये माणसे अपुरी होती व रात्रीच्या वेळी हा खंदक खणणे (फक्त एका कंपनीने) काही सोपे काम नव्हते. आमच्या कामाची प्रशंसा होईल अशा अपेक्षेने मी ह्याबाबत खोलीनला बोललो, पण त्याने नुसती धावती नजर सभोवार टाकली व बटालियनची टेहळणी चौकी आणि निरीक्षण जागा कुठे आहेत एवढीच चौकशी केली. मी ती ठिकाणे दाखविली.

“किती शांत आहे!” आश्चर्य व्यक्त करीत तो उद्गारला आणि जंगलकडेच्या झुडूपांमागे आडोसा घेऊन दुर्बीणीमधून त्याने झेपर नदी व किनारा न्याहाळले. आम्ही ज्या टेकाडावर उभे होतो तेथून पलीकडील किनारा स्पष्ट दिसत होता. माझ्या “सैनिकांबाबत” त्याला विशेष कुतूहल दिसत नव्हते.

तो नदीचे निरीक्षण करीत होता व त्याच्या पाठी मी उभा होतो, तेव्हा अचानक मला बोन्दारेवची आठवण झाली आणि मी विचारले:

“तो मुलगा, जो माझ्यापाशी आला होता, कोण आहे तो? कुठला आहे?”

“मुलगा?” दुसराच कसलातरी विचार करीत विमनस्कपणे खोलीनने मला उलट विचारले. “हां-हां-इवान!.. तुला फार माहीत झालं तर लौकर म्हातारा होशील!” तो थट्टेने म्हणाला आणि त्याने विषय बदलला: “चल, तुझ्या मेत्रोचा अनुभव घेऊ!”

खंदकात अंधार होता. उजेडासाठी कुठे कुठे फटी ठेवल्या होत्या, पण त्यांच्यावर डहाळ्या झाकल्या होत्या. अर्धवट अंधारात आम्ही पुढे सरकत होतो, डोकी किंचित खाली झुकवून चालत होतो, पण ही ओलसर, उदास वाट कधी संपणारच नाही असे वाटत होते. समोर किंचित उजेड दिसू लागला

आणि झेपरपासून पंधरा मीटर अंतरावरील पहारा-चौकीच्या खंदकात आम्ही येऊन ठेपलो.

तेथील तुकडीचा तरुण सार्जंट मला अहवाल देत होता, तेव्हा रुंद छातीच्या धिप्पाड खोलीनकडे तिरपे कटाक्ष टाकीत होता.

किनारा वालुकामय होता, पण खंदकात घोटया-पर्यंत चिखल होता. ह्या खंदकाचा तळ नदीच्या पाण्याच्या पातळीच्या खाली होता, हे बहुधा कारण असावे.

मला माहीत होते की, मनःस्थिती चांगली असेल तेव्हा खोलीनला गप्पा मारायला व थट्टा-विनोद करायला आवडायचे. आतासुद्धा त्याने 'बेलोमोर' चे पाकीट काढून मला व सैनिकांना सिगारेटी दिल्या व स्वतःची सिगारेट पेटवून तो उल्हसितपणे म्हणाला :

"काय तुमचं आयुष्य! युद्ध चाललंय ह्यावर विश्वास बसत नाही. सारं काही शांत शांत!.."

"रम्य विश्रांती-स्थळ!" दुलईचे जाकीट व विजार घातलेला लंबू मशिनगनवाला चूपाखिन उदासपणे म्हणाला. डोक्यावरील पोलादी शिरस्त्राण उतरवून त्याने फावडयाच्या दांडयावर ठेवले आणि बांधावरती उंचावले. काही सेकंदांनंतर समोरच्या तीरावरून मशिनगन कडाडल्या आणि आमच्या डोक्यांवरून गोळया सणसणत गेल्या.

“निशाणबाज?” खोलीनने विचारले.

“रम्य विश्रांती-स्थळ!” चूपाखिन परत गंभीरपणे म्हणाला. “प्रेमळ नातेवाईकांच्या देखरेखीखाली चिखल-स्नान...”

...त्याच अंधाऱ्या खंदकातून आम्ही टेहळणी चौकीकडे परतलो. आमच्या पुढच्या फळीचे जर्मन दक्षपूर्वक निरीक्षण करीत होते ही वस्तुस्थिती खोलीनला आवडली नव्हती. प्रतिस्पर्ध्याने दक्ष असणे व त्याने सतत नजर ठेवणे स्वाभाविक होते, तरी खोलीनने अचानक कपाळाला आठ्या घातल्या व तो गप्प झाला.

टेहळणी चौकीवर स्टेरेओस्कोप दुर्बीणीतून त्याने सुमारे दहा मिनिटेपर्यंत उजव्या किनाऱ्याची पाहणी केली, टेहळणी चौकीवरच्या निरीक्षकांना काही प्रश्न विचारले, त्यांच्या नोंदवह्या चाळल्या, त्यांना काही येत नव्हते व त्यांच्या त्रोटक नोंदींवरून शत्रूच्या सवयींची आणि वर्तनाची काहीच कल्पना येत नव्हती म्हणून त्यांची खरडपट्टी काढली. मी त्याच्याशी सहमत नव्हतो, पण तरीही गप्प राहिलो.

“त्या वाळूत कोण आहेत, तुला माहीत आहे?” पलीकडील तीरावर ठार झालेल्या टेहळ्यांबाबत तो मला विचारीत होता.

“माहीत आहे.”

“मग त्यांना ओढून आणणं तुला शक्य नाही?” तो नाराजीच्या आणि तिटकाऱ्याच्या सुरात बोलला. “अवघ्या एका तासाचं काम! वरच्या हुकूमाची वाट पाहतोस?”

आडोशाच्या खंदकातून बाहेर पडल्यानंतर मी विचारले:

“तुम्ही आणि कातासोनोव काय बघताय? धाड घालायची तयारी करताय?”

“तपशील जाहिरातीच्या बोर्डांवर वाचायला मिळेल!” माझ्याकडे न पाहता खोलीन ताडकन उद्गारला आणि तिसऱ्या बटालियनच्या दिशेने ताडताड निघून गेला.

मी मुळीच विचार न करता त्याच्या पाठोपाठ निघालो.

“तुझी मला यापुढं गरज नाही!” मागे न वळता अचानक तो म्हणाला.

त्याच्या पाठीकडे गोंधळल्या नजरेने पहात मी थबकलो आणि कचेरीकडे मागे फिरलो.

“जरा थांब बेट्या!..” खोलीनच्या उर्मट वर्तनाचा मला राग आला होता. मी अपमानीत झालो होतो, चिडलो होतो, शिव्या पुटपुटत होतो. जवळून जाणाऱ्या एका सैनिकाने मला सलाम ठोकला व चकित नजरेने मागे वळून पाहिले.

कचेरीत कारकुनाने वर्दी दिली :

"मेजरनी दोनदा फोन केला. तुम्हाला अहवाल द्यायचा हुकूम केलाय."

मी रेजिमेंटच्या कमांडरना फोन केला.

"तुझ्याकडची परिस्थिती कशी आहे?" सर्वांत प्रथम त्यांनी त्यांच्या शांत आवाजात चौकशी केली.

"सर्व ठीक, कॉम्रेड मेजर."

"तुझ्याकडं खोलीन येईल... त्याला आवश्यक त्या सर्व गोष्टी कर आणि सर्व प्रकारची मदत कर..."

"खड्डयात गेला हा खोलीन!.." मी मनाशी म्हणालो.

दरम्यान काही वेळ गप्प राहून मेजर पुढे म्हणाले:

"हा 'वोलगा' चा हुकूम आहे. मला एकशे एकनं फोन केला होता..."

'वोल्गा' म्हणजे आमच्या सेनेचे मुख्य ठाणे; 'एकशे एक' म्हणजे आमच्या डिव्हिजनचे कमांडर कर्नल वोरोनोव. "मग काय झालं!" मी मनाशी म्हणालो. "खोलीनच्या पाठी मी धावणार नाही! जेवढं सांगेल, तेवढंच करीन! पण त्याच्या मागून सतत फिरायचं आणि अजीजीच्या सुरात त्याला विचारायचं – हे मात्र आता माझ्या बापानं होणार नाही!"

आणि खोलीनबद्दल विचार न करण्याचा प्रयत्न करीत मी माझ्या कामात गुंतलो.

दुपारच्या जेवणानंतर बटालियनच्या वैद्यकीय उपचार केंद्रावर गेलो. तिसऱ्या बटालीयनच्या शेजारी उजव्या फळीवर दोन प्रशस्त निवाऱ्यांमध्ये हे केंद्र होते. ही व्यवस्था विशेष सोयीची नाही, पण आम्ही रहात होतो ते जमिनीखालील निवारे व आडोसे पूर्वी जर्मनांनी खणून बांधलेले होते आणि अर्थातच त्यांनी त्यावेळी आमच्या सोयींचा विचार केलेला नव्हता.

दहा दिवसांपूर्वी आलेल्या नव्या लष्करी मेडिकल ऑफीसरने, वीस वर्षांच्या गडद निळया डोळयांच्या सोनेरी केसांच्या सुंदर तरुणीने, डोक्यावर बांधलेल्या जाळीदार रुमालावर बेंगरूळपणे हात उचलून मला सलाम करीत, चाचरत-अडखळत अहवाल दिला. पण मी तिला तिच्या चाचरण्याबद्दल काही बोललो नाही. तिच्या आधीचा ऑफीसर, सीनियर लेफ्टनंट वोस्त्रीकोव, म्हातारा, दम्याने हैराण झालेला लष्करी डॉक्टर, दोन आठवड्यांपूर्वी रणांगणावर ठार झाला होता. तो अनुभवी, धीट आणि कुशल होता. पण ही?.. अजून तरी मी हिच्याबाबत नाराज होतो.

लष्करी गणवेष – कमरेशी रुंद पट्ट्याने घट्ट आवळ-

लेला नखरेबाज आखूड कोट, भक्कम नितंबांभोवती चिकटून बसलेला तंग स्कर्ट, घाटदार पायांवरती मऊ कातडी उंच बूट – हे सर्व तिला छान शोभून दिसत होते. ही नवी लष्करी मेडिकल ऑफीसर एवढी सुरेख होती, की तिच्याकडे पाहण्याचे टाळ-ण्याचा मी प्रयत्न करीत होतो.

जाता जाता सांगायचे म्हणजे ती माझी गाववाली होती – मॉस्कोचीच होती. जर युद्ध नसते, तर कदाचित तिच्याशी पहिल्या भेटीतच मी प्रेमात पडलो असतो आणि तिचा प्रतिसाद मिळाला असता, तर स्वतःला अत्यंत सुखी समजलो असतो. रोज संध्याकाळी तिला भेटायला धावलो असतो, गोर्की पार्कमध्ये तिच्याबरोबर नाचलो असतो, झाडांच्या दाटीत हळूच तिची चुंबने घेतली असती... पण, हाय, युद्ध! बटालियनच्या कमांडरपदाची जबाब-दारी मी सांभाळीत होतो आणि ती माझ्या दृष्टीने केवळ मेडिकल ऑफीसर होती. एवढेच नव्हे तर स्वतःच्या कामाला पार पाडण्यास ती अक्षम होती.

मी तिला रुक्ष स्वरात सांगितले की, कंपनी-मध्ये गबाळेपणाचे प्रसंग घडले होते, पुरुषांची अंतर्वस्त्रे व्यवस्थित धुतली गेली नव्हती, स्नानाची व्यवस्था अजून नीट झाली नव्हती. मी आणखी अनेक तक्रारी केल्या आणि तिला आठवण करून दिली, की ती



तेथील कमांडर होती, सगळ्या गोष्टी तिने स्वतःच करण्याचे कारण नव्हते, कंपनीमधील स्ट्रेचरवाल्यांना आणि ऑर्डर्लींना काम करायला लावायचे होते.

ती माझ्यासमोर ताठ उभी होती, मान खाली घालून हळू आवाजात सतत म्हणत होती: "ठीक आहे... समजलं... समजलं..." ती मला खात्री देत होती की, ती प्रयत्न करील आणि लौकरच 'सर्व काही ठीक होईल.'

तिची मुद्रा एवढी करुण बनली होती, की मला तिची दया आली. पण त्या भावनेत गुरफटून राहण्याचा मला धीर झाला नाही. तिची दया करण्याचा मला

अधिकार नव्हता. बचावाच्या वेळी ती भावना चालली असती, पण आता आमच्या फौजा चढाईच्या पवित्र्यात होत्या, झेपर नदी ओलांडणार होत्या, बटालियनमधील अनेक लोक घायाळ होणार होते आणि लष्करी मेडिकल लेफ्टनंटच्या फिती खांद्यांवर लावणाऱ्या ह्या मुलीवर त्या अनेक घायाळांची आयुष्ये अवलंबून राहणार होती.

काहीशा अस्वस्थ मन:स्थितीत मी वैद्यकीय केंद्रामधून बाहेर पडलो. मेडिकल ऑफीसर माझ्या पाठोपाठ निघाली.

आमच्यापासून शंभर पावलांवर उजव्या बाजूला तोफखानावाल्यांनी एका टेकाडावर स्वत:ची टेहळणी-चौकी उभारली होती. तिच्या तळाशी मागील बाजूस ऑफीसरांचा गट उभा होता – खोलीन, ऱ्याबत्सेव, तोफखाना-कमांडर, तिसऱ्या बटालियनच्या उखळी तोफा कंपनीचे कमांडर व मला माहीत नसलेले आणखी दोन ऑफीसर. खोलीनने व आणखी दोघांनी हातांमध्ये नकाशे अथवा आराखडे धरले होते. खंदकावर धाड घालण्याची पूर्वतयारी चालू असल्याचे स्पष्ट दिसत होते आणि तिसऱ्या बटालियनच्या भागातून ती धाड पडणार होती.

आम्हाला पाहताच ऑफीसर वळले व आमच्या दिशेने पाहू लागले. ऱ्याबत्सेवनी, तोफखानावाल्यांनी

आणि उखळी तोफवाल्याने हात हलवून मला अभिवादन केले. मी उलट हात हलविला. खोलीन मला हाक मारील अशी माझी अपेक्षा होती – कारण त्याला "सर्व प्रकारची मदत" करण्याची कामगिरी माझ्यावर होती – पण तो तिरपा उभा राहून ऑफीसरांना नकाशावर काहीतरी दाखवीत होता.

मी मेडिकल ऑफीसरकडे वळून म्हणालो:

"मी तुम्हाला दोन दिवसांची मुदत देतो. सगळी नीट व्यवस्था लावा आणि मला अहवाल द्या."

न समजण्यासारखे ती काहीतरी पुटपुटली. मी तुटकपणे सलाम केला आणि तेथून निघताना मनाशी निर्धार केला की, पहिली संधी मिळताच हिची ब्याद टाळायची. आणि नवा मेडिकल ऑफीसर पुरुषच असेल अशी खबरदारी घ्यायची. सबंध दुपारभर मी निवारे आणि आडोसे तपासत होतो, शस्त्रास्त्रांची पाहणी करीत होतो, बटालियनच्या उपचार केंद्रातून परतलेल्या माणसांबरोबर गप्पा मारीत होतो, त्यांच्याशी सोंगट्या खेळलो होतो.

माझ्या जमिनीखालील निवाऱ्यात मी परतलो, तेव्हा अंधार पडला होता. माझ्या फळीवर खोलीन कपड्यांसकट गाढ झोपलेला मला आढळला. टेबलावर चिठी खरडलेली होती: "संध्याकाळी ६.३० वाजता मला झोपेतून उठव. खोलीन."

मी त्याला जागे करायला योग्य वेळी येऊन पोहोचलो होतो. डोळे उघडून तो फळीवर बसला. जांभई देत, अंगाला आळोखेपिळोखे देत तो म्हणाला:

"वयानं खूप तरुण आहेस, पण तुझी निवड काही वाईट नाही!"

"काय?" न उमजून मी विचारले.

"मी म्हणतोय, तुला बायकांची पारख चांगली आहे. तुझी मेडिकल ऑफीसर फटाकडी आहे!" कोपऱ्यातील हात धुण्याच्या जागेकडे खोलीन गेला.

"गेलास तू जहन्नममध्ये!" संताप न आवरून मी ओरडलो.

"उद्धट आहेस तू, गाल्त्सेव!" खोलीन प्रसन्नपणे म्हणाला. फुरफुर आवाज करीत, सभोवताली पाणी उडवीत त्याचे तोंड धुणे चालले होते. "मैत्रीत केलेली थट्टा समजत नाही...? बघ, हा तुझा टॉवेल किती मळका आहे. ती स्वच्छ धुवू शकली असती. शिस्त नाही!"

"गळक्या" टॉवेलने तोंड पुशीत त्याने विचारले:

"माझ्याबद्दल कुणी चौकशी केली नाही?"

"माहीत नाही. मी इथं नव्हतो."

"तुला कुणी फोन केला नाही?"

"बारा वाजता रेजिमेंट कमांडरांचा फोन आला होता."

“काय म्हणून ?”

“तुला मदत करायची विनंती केली.”

“तुला विनंती केली ?.. अरे वा ! ” खोलीन दात विचकीत म्हणाला. “तुमची व्यवस्था जबरदस्त आहे ! ” त्याने माझ्याकडे टवाळखोर कटाक्ष फेकला. “कोणती मदत करणार बाबा तू मला ? ”

सिगारेट पेटवून तो निवाऱ्याबाहेर गेला, पण लौकर परतला आणि हात चोळीत समाधानपूर्वक मला म्हणाला :

“आता अगदी मागणी नोंदवल्यासारखी सुरेख रात्र पडेल !.. देव तसा दयाळू आहे. तुझा देवावर विश्वास आहे ?.. तुझी स्वारी कुठं निघालीय ? ” त्याने एकदम कठोर आवाजात विचारले. “नाही, तू आत्ता कुठंही जायचं नाही. कदाचित तुझी गरज भासेल ...”

फळीवर बसून विचारमग्नपणे तो पुनःपुन्हा त्याच त्याच ओळी गाऊ लागला :

अरे रात्र काळी काळी,
माझी उडाली भंबेरी,
पोचवा मला घरी ...
मारूस्या, पोचवा घरी !

चौथ्या कंपनीच्या कमांडरशी मी टेलीफोनवरून बोललो आणि रिसीव्हर ठेवत असताना निवाऱ्या-

पाशी येणाऱ्या मोटारचा आवाज माझ्या कानी पडला. दारावर हळूच टकटक आवाज झाला.

"आत या!"

कातासोनोव आत आला, पाठीशी दार बंद करून सलाम ठोकत त्याने वर्दी दिली:

"आम्ही आलोय, कॉम्रेड कप्तान!"

"पहारेकऱ्याला घालव!" गाणे थांबवून उत्साहाने उठत खोलीन मला म्हणाला.

आम्ही कातासोनोवच्या मागोमाग बाहेर पडलो. पावसाची झिमझिम चालू होती. निवाऱ्यापाशी ओळखीची टपवाली मोटार उभी होती. पहारेकरी अंधारात नाहीसा होईपर्यंत वाट पाहून खोलीनने मोटारीच्या मागील भागातील ताडपत्री उघडली आणि दबत्या आवाजात हाक मारली:

"इवान!.."

"मी," टपाखालून मुलाचा बारीक आवाज आला आणि निमिषभरानंतर ताडपत्रीखालून जमिनीवर एका छोट्या आकृतीने उडी मारली.

४

"नमस्कार!" निवाऱ्यात प्रवेश करताच मुलगा मला उद्देशून म्हणाला आणि अनपेक्षित स्नेहल स्मित करीत त्याने हात पुढे धरला.

आता तो पूर्वीपेक्षा अधिक ताजातवाना आणि बळकट दिसत होता, त्याचे गाल लालबुंद बनले होते. कातासोनोवने त्याच्या मेंढकातडी कोटावरील गवताच्या काड्या झाडून काढल्या. खोलीन आस्थेच्या सुरात त्याला म्हणाला:

"पडून थोडी विश्रांती घेणार?"

"छे:! अर्धा दिवस झोपून काढला आणि परत विश्रांती?"

"तर मग आम्हाला काहीतरी रंजक दे, वेळ घालवायला," खोलीन मला म्हणाला, "एखादं मासिक किंवा आणखी काही... मात्र चित्रं पाहिजेत!"

कातासोनोवने मुलाला कपडे उतरवायला मदत केली व मी टेबलावर 'अगान्योक,' 'क्रास्नोआर्मेयत्स' वगैरे मासिकांचे अंक टाकले. त्यातील काही अंक मुलाने यापूर्वीच पाहिले होते असे आढळले – त्या अंकांना त्याने एका बाजूला सारले.

आज तो ओळखू येत नव्हता: खूप बडबडत होता, अधूनमधून स्मित करीत होता, माझ्याकडे मैत्रीच्या नजरेने पहात होता, खोलीन आणि कातासोनोवला जसा "तू" म्हणून संबोधत होता, तसाच मलासुद्धा "तू" म्हणू लागला होता. आणि ह्या सोनकेशा पोराबाबत माझ्या मनात अपार ममत्व

निर्माण झाले होते. माझ्यापाशी लिमलेटच्या वड्यांचा पुडा होता ह्याची मला आठवण झाली. मी तात्काळ त्याच्यासमोर तो पुडा उघडून ठेवला, चॉकलेटी फेसाचे भांडेभर ताक दिले व त्याच्याशेजारीच बैठक मारून त्याच्याबरोबर मासिके चाळू लागलो.

दरम्यान खोलीन व कातासोनोव यांनी मला परिचित झालेली जर्मन सूटकेस मोटारीमधून आणली. झूलवाल्या रेनकोटात गुंडाळलेले एक मोठे गाठोडे, दोन टॉमीगन आणि एक छोटी प्लायवूडची सूटकेस एवढ्या वस्तू आणल्या.

गाठोडे फळीखाली कोंबून ते दोघे आमच्या पाठीशी बसले व गप्पा मारू लागले. दबत्या आवाजात माझ्याबद्दल खोलीन कातासोनोवला सांगत होता ते मी ऐकले:

"...तो कसा फर्डा जर्मन बोलतो, तू ऐकायला पाहिजेस! गेल्या वसंतात मी त्याची दुभाष्या म्हणून निवड करणार होतो, पण एव्हाना तो बटालियनचा कमांडर बनलाय..."

तसे घडले होते. डिव्हिजनच्या कमांडरांच्या हुकू-मानुसार एकदा मी जर्मन कैद्यांना प्रश्न विचारीत होतो तेव्हा खोलीन व लेफ्टनंट-कर्नल ग्र्याझनोव यांनी माझे जर्मन बोलणे ऐकले होते आणि टेहळणी खात्यात दुभाष्या म्हणून मी काम करावे, ह्यासाठी

माझे मन वळविण्याचा प्रयत्न केला होता. पण माझी इच्छा नव्हती आणि त्याबद्दल मला मुळीच खेद झाला नव्हता: टेहळणी विभागात मी आनंदाने काम केले असते, पण केवळ दुभाष्या म्हणून नव्हे..

कातासोनोवने चुलाण्यातील लाकडे नीट करीत हळूच म्हटले:

"रात्र झकास पडलीय!"

तो आणि खोलीन दबत्या आवाजांमध्ये नव्या कामगिरीची चर्चा करीत होते. धाडीचा त्यांचा मुळीच बेत नव्हता हे मला आता समजले. आज रात्री खोलीन व कातासोनोव ह्या मुलाला झेपरच्या दुसऱ्या तीरावर जर्मनांच्या पिछाडीला घेऊन जाणार होते, ही गोष्ट मला स्पष्ट उमजली. त्यासाठी 'श्तूर्मोवका' ही छोटी रबरी होडी त्यांनी आणली होती. पण त्याऐवजी माझ्या बटालियनमधून सपाट तळाची होडी त्यांनी घ्यावी, असा कातासोनोव खोलीनला आग्रह धरीत होता. "फार सोयीस्कर होडगी आहेत!" तो दबत्या आवाजात म्हणाला.

"सैतानांना वास लागला!.." बटालियनमध्ये मच्छीमारांच्या सपाट तळाच्या पाच होडचा होत्या. गेले दोन महिने आम्ही त्यांना राखून होतो, इतर बटालियनांनी त्यांना पळवू नये म्हणून जपत होतो. बाकी प्रत्येक बटालियनपाशी फक्त एकेक होडी

होती. आमच्याजवळच्या होड्यांना काळजीपूर्वक आच्छादने घालून लपवून ठेवण्याची मी आज्ञा दिलेली होती. वाटचालीत त्यांच्यावर गवताची आच्छादने घालून आम्ही त्यांना छान लपविले होते, नदी पार करण्याच्या उपलब्ध सोयींबाबतच्या अहवालात आमच्यापाशी फक्त दोनच होड्या होत्या असे नमूद केले होते.

मुलगा लिमलेटच्या वड्या चघळत होता आणि मासिके चाळत होता. खोलीन व कातासोनोव यांच्या संभाषणाकडे मुळीच लक्ष देत नव्हता. टेहळ्यांबद्दलची कथा असलेल्या एका मासिकाला वेगळे काढीत तो मला म्हणाला:

"हे मासिक मी वाचतो... ए, तुझ्यापाशी ग्रामोफोन नाही?"

"आहे, पण स्प्रिंग तुटलीय."

"फार गरीबीत राहतोस," त्याने शेरा मारला व अचानक विचारले: "तू कान हलवू शकतोस?"

"कान?.. नाही, मला नाही जमत," मी स्मित करीत म्हणालो. "का बरं?"

"खोलीनला जमतं!" मोठ्या दिमाखाने त्याने मला माहिती पुरविली व वळून तो म्हणाला: "खोलीन, दाखव कान हलवून!"

"तुमच्या सेवेला नेहमी तयार!" खोलीन पटकन

उडी मारून उठला आणि आमच्या समोर उभा राहून कान हलवू लागला ; मात्र त्याचा चेहरा अगदी स्थिर होता.

मुलगा खूप आनंदला आणि त्याने ऐटीत माझ्याकडे पाहिले.

"वाईट वाटून घेऊ नकोस," खोलीन मला म्हणाला. "मी तुला कान हलवायला शिकवीन. पण ते मागाहून करू. आता आम्हाला होड्या दाखव प्रथम!"

"तुम्ही मला बरोबर घेऊन जाताय?" अनपेक्षितपणे मी प्रश्न केला.

"कुठं न्यायचं तुला?"

"त्या किनाऱ्यावर?"

"पाहिलंत," माझ्याकडे बोट दाखवीत खोलीन म्हणाला. "स्वयंसेवक! कशाला पाहिजे तुला तो किनारा?.." आणि नजरेने मला जोखत त्याने विचारले: "तुला पोहायला येतं का?"

"अर्थात! मी वल्हवू शकतो आणि पोहू शकतो."

"पोहतोस कसा? वरून खाली? उभा?" अत्यंत गंभीर चेहऱ्याने खोलीनने प्रश्न केला.

"निदान तुझ्याएवढं चांगलं नक्कीच पोहतो!"

"नक्की सांग – झेपर पोहून ओलांडशील?"

"पाच वेळा," मी म्हणालो. आणि उन्हाळी

मोसमात अंगावर कमीत कमी कपड्यात खरोखरीच मी इतक्या वेळा पोहू शकलो असतो. "सहज पाच वेळा, तिथपर्यंत आणि परत!"

"भलताच भक्कम गडी!" अचानक खोलीन खो खो हसू लागला. तिघांचेही चेहरे हसत होते. म्हणजे खोलीन व मुलगा हसत होते आणि काता-सोनोव लाजरे स्मित करीत होता.

एकदम गंभीर चेहरा करून खोलीनने विचारले:

"तू बंदूकीनं खेळत नाहीस?"

"गेलास मसणात!.." त्या प्रश्नातील पुढील खोच लक्षात येताच मी संतापलो.

"बघितलंत," माझ्याकडे बोट दाखवीत खोलीन म्हणाला, "तुटली ह्याची दोरी! मुळीच संयम नाही. नसा पार ताणलेल्या आहेत आणि त्या किनाऱ्याला जायला मागतोय. नाही पोरा, तुझ्या-बरोबर फंदात पडण्यात अर्थ नाही!"

"तर मग मी होडी देणार नाही."

"होडी आम्ही स्वतःच घेऊ. आम्हाला काय हात नाहीत? आणि वेळच पडली तर डिव्हिजन कमांडरना फोन करीन, मग तुला स्वतःच्या पाठीवरून होडी वाहून नदीपर्यंत आणावी लागेल!"

"पुरे करा!" समझोत्याच्या सुरात मुलगा म्हणा-ला. "तो आपल्याला देईल होडी... देशील ना?"

माझ्या डोळयांमध्ये पहात त्याने विचारले.

"द्यावी लागणार," स्मित करीत मी म्हणालो.

"तर मग चला पहायला!" माझ्या दंडाला धरीत खोलीन म्हणाला. "तू इथंच थांब," मुलाला तो म्हणाला. "स्वत:ला दमवू नकोस. विश्रांती घे."

कातासोनोवने स्टुलावर प्लायवूडची सूटकेस ठेवून उघडली. तिच्यात वेगवेगळी उपकरणे होती, डबे होते, चिंध्या, दोऱ्या, बँडेजे होती. माझे दुलईदार जाकीट अंगात घालण्यापूर्वी मी कमरपट्ट्यात नक्षीदार मुठीचा सुरा खोचला.

"किती सुरेख सुरा!" मुलगा एकदम कौतुकाने उद्गारला. त्याचे डोळे चमकत होते. "दाखव!"

मी त्याच्यापुढे सुरा धरला. हातांमध्ये त्याला उलटसुलट फिरवीत त्याने विचारले:

"मला देऊन टाक ना!"

"मी तुला दिला असता, पण... मला हा कुणीतरी भेट दिलाय!"

मी त्याला फसवत नव्हतो. हा सुरा म्हणजे माझा सर्वांत जिवलग मित्र कॉन्स्तन्तिन खोलोदोव याची भेट आणि स्मृती होता. कोस्त्या आणि मी तिसरीपासून एकाच डेस्काशी बसत होतो, सैन्यात एकत्र दाखल झालो होतो, एकत्र प्रशिक्षण घेतले होते, एकाच डिव्हिजनमधून लढलो होतो व नंतर



एकाच रेजिमेंटमधून.

... सप्टेंबरातील त्या दिवशीच्या सूर्योदयाच्या वेळी देस्ना नदीच्या किनाऱ्यावरील खंदकात मी होतो. आमच्या डिव्हिजनमधल्या पहिल्या कंपनीबरोबर कोस्त्या तराफ्यामधून उजव्या किनाऱ्याला जाऊ लागलेला मी पाहिले होते. लाकडी ओंडके, काठ्या आणि पिंपांच्या साह्याने तराफे बनविलेले होते. ते नदीच्या पात्राच्या मध्यभागी पोहोचले आणि जर्मनांनी त्यांच्यावर तोफांचा व उखळी तोफांचा भडिमार केला. कोस्त्याच्या तराफ्यावर पाण्याचे पांढरे कारंजे उसळले... नंतर तेथे काय घडले ते मी पाहिले नाही – टेलीफोन ऑपरेटरच्या हातातील रिसीव्हर ओरडत होता: "गाल्त्सेव, पुढे जा!.." मी बांधावरून पुढे झेपावलो आणि माझ्यापाठी संपूर्ण कंपनी – सुमारे शंभर लोक – धावली. नदीतीरापाशी तशाच प्रकारच्या उभ्या असलेल्या तराफ्यांकडे आम्ही धावत होतो... अर्ध्या तासानंतर आम्ही उजव्या तीरावर हातघाईच्या लढाईत गुंतलो होतो...

त्या सुऱ्याचे काय करावे हे अजून मी ठरवले नव्हते: स्वत:जवळच ठेवायचा अथवा युद्धानंतर मॉस्कोला परतल्यावर अर्बातमधल्या एका निवांत गल्लीत राहणाऱ्या कोस्त्याच्या म्हाताऱ्या आई-बापांना त्यांच्या मुलाची अखेरची आठवण म्हणून तो सुरा द्यायचा...

“मी तुला दुसरा देईन,” मुलाला मी आश्वासन दिले.

“नाही, मला हाच पाहिजे!” तो हट्टाने म्हणाला आणि त्याने माझ्या डोळ्यांना डोळे भिडवले. “मला दे हा!”

“खत्रूड वागू नको, गाल्त्सेव,” खोलीन फटकून उद्गारला. कपडे चढवून तयार होऊन तो माझी व कातासोनोवची वाट पहात होता. “असा कंजू-सपणा करू नको!”

“मी तुला दुसरा देईन. अगदी ह्याच्यासार-खाच!” मुलाची मी खात्री पटवू लागलो.

“तुला मिळेल तसाच सुरा,” कातासोनोवने सुरा न्याहाळीत मुलाला वचन दिले. “मी तुझ्यासाठी पैदा करीन.”

“होय, मी शप्पत असाच दुसरा सुरा बनवून घेईन!” मी मुलाची खात्री पटवीत होतो. “पण हा मला भेट मिळालाय – आठवण आहे!”

“ठीक आहे,” दुखावल्या आवाजात मुलगा अखे-रीस कबूल झाला. “पण आत्ता ठेव त्याला इथं – खेळायला ...”

“ठेव सुरा आणि चल,” खोलीन मला घाई करीत होता.

“कशाला येऊ मी तुमच्याबरोबर? काय आनंद

आहे त्यात? माझ्या दुलईदार जाकीटाची बटणे लावीत मी मनातील विचार मोठ्यांदा बोललो. "तुमच्याबरोबर तुम्ही मला घेऊन जाणार नाही आणि होड्या कुठं आहेत, माझ्याशिवाय तुम्हाला माहीत आहे."

"चल, चल," मला ढकलत खोलीन म्हणाला. "मी तुला घेऊन जाईन," त्याने मला आश्वासन दिले. "मात्र आज नाही."

आम्ही तिघे बाहेर पडलो आणि खुरट्या झुडुपां-मधून उजव्या फळीकडे जाऊ लागलो. थंडगार पावसाची झिमझिम चालू होती. मिट्ट काळोख होता, आकाश ढगांनी पूर्ण झाकोळले होते. एकही तारा चमकताना दिसत नव्हता.

सूटकेस घेऊन कातासोनोव सर्वांत पुढे घसरत चालत होता. त्याच्या पावलांचा आवाज मुळीच होत नव्हता आणि जणू रोज रात्री ह्या पाऊलवाटे-वरून तो जात असावा अशा ठाम विश्वासाने जात होता. खोलीनपाशी मी परत मुलाबद्दल प्रश्न विचारू लागलो आणि मला समजले की, छोटा बोन्दारेव गोमेल इथला होता. पण युद्धापूर्वी बाल्तिक प्रदेशात कुठेतरी आई-वडिलांबरोबर सीमा-चौकीवर रहात होता. त्याचे वडील सीमारक्षक होते आणि युद्धाच्या पहिल्याच दिवशी ठार झाले होते. माघारीच्या

वेळी दीड वर्षाची छोटी बहीण मुलाच्या हातांमध्येच ठार झाली होती.

"आपल्या स्वप्नातसुद्धा दिसलं नसेल असं भयंकर आयुष्य त्याला जगावं लागलंय," खोलीन दबत्या आवाजात सांगत होता. "तो पार्तीझानांबरोबर होता. नंतर त्रोस्त्यानेत्स मृत्यू-छावणीत होता... त्याच्या डोक्यात एकच विचार सतत घोळतो: शेवटच्या माणसापर्यंत सूड घ्यायचा! छावणीबद्दल सांगू लागला, किंवा बापाची, बहिणीची आठवण काढू लागला, म्हणजे त्याचं सगळं अंग थरथरत असतं. एखादं लहान मूल एवढा तिटकारा करू शकतं, असं मला कधीही वाटलं नव्हतं..."

खोलीन निमिषभर गप्प झाला, मग जेमतेम ऐकू येईल अशा आवाजात पुढे सांगू लागला:

"आम्ही दोन दिवस त्याच्याबरोबर वाद घालतोय, सूवोरोव लष्करी विद्यालयात दाखल हो म्हणून त्याची मनधरणी करतोय. कमांडरनी स्वतः त्याची खात्री पटवायचा प्रयत्न केला: त्याला समजुतीनं सांगितलं, धमकावून पाहिलं. शेवटी एका अटीवर त्याला जाण्याची त्यांनी परवानगी दिली: फक्त एकदाच – अखेरचं! अडचण म्हणजे त्याला कामगिरीवर पाठवलं नाही, तरीसुद्धा गोंधळ होतो. जेव्हा तो पहिल्यांदा आमच्यापाशी आला होता,

तेव्हा त्याला न पाठविण्याचा आम्ही निर्णय घेतला होता. तर तो स्वतःच निघून गेला. आणि परतला तेव्हा आमच्याच लोकांनी – शीलीनच्या रेजिमेंट-मधल्या पहारेकऱ्यांनी – त्याच्यावर गोळी झाडली. त्याच्या खांद्याला जखम झाली. त्याबद्दल दोष कुणाला देणार? रात्र काळोखी होती आणि कुणालाही काहीही माहीत नव्हतं!.. तो जे काही काम करतो ते मोठ्या माणसांना शक्य होत नाही. तुमची टेहळ्यांची आख्खी कंपनी जेवढं काम करते, तेवढं तो एकटा पार पाडतो. जर्मनांच्या व्यूहरचनेच्या पलीकडं टेहळे जाऊ शकत नाहीत. प्रतिस्पर्ध्याच्या सैन्याच्या पिछाडीला जाऊन पाच-दहा दिवस तिथं मुक्काम करणं टेहळ्या गटाला शक्य नसतं. आणि एकट्या-दुकट्या टेहळ्यांना ह्या कामी क्वचित यश मिळतं. मोठ्या माणसानं कोणतंही सोंग घेतलं तरी त्याच्याबद्दल ताबडतोब संशय निर्माण होत असतो. पण कुमारवयाचा मुलगा, घरदार नसलेला भटक्या – सैन्याच्या पिछाडीला टेहळ-णी करायला बहुधा सर्वोत्तम बहाणा!.. त्याला तू अजून नीट ओळखत नाहीस – कामाला अत्यंत आदर्श पोरगा!.. एव्हाना ठरलंय: जर युद्धानंतर त्याच्या आईचा शोध लागला नाही, तर कातासोनोव किंवा लेफ्टनंट-कर्नल त्याला दत्तक घेणार आहेत..."

"ते का? तू का नाही?"

"मी घेतला असता," उसासत खोलीन पुटपुटला. "पण लेफ्टनंट-कर्नलचा विरोध आहे. म्हणतात, अजून मला स्वत:लाच खूप शिकलं पाहिजे!" हसून त्याने कबुली दिली.

मनाने मी लेफ्टनंट-कर्नलांशी सहमत होतो. खोलीन रांगडा होता. कधी कधी बेफाम आणि विचित्र वागायचा. एवढे मात्र खरे, मुलासमोर तो खूप संयम बाळगायचा. मला वाटत होते की, इवानला तो थोडा घाबरतही असावा.

किनाऱ्यापासून दीडशे मीटर अंतरावर आम्ही झाडीत वळलो आणि फरच्या फांद्यांनी झाकून ठेवलेल्या होड्यांपाशी गेलो. माझ्या हुकूमानुसार त्यांना सतत सज्ज ठेवण्यात आले होते आणि वाकड्या होऊ नयेत म्हणून एका दिवसाआड त्यांच्यावर पाणी शिंपडण्यात येत होते.

विजेऱ्या पेटवून खोलीन व कातासोनोवने होड्या तपासून पाहिल्या, त्यांचे तळ व त्यांच्या कडा चाचपून पाहिल्या. मग त्यांनी प्रत्येक होडी उलट केली, तिच्यात ते बसले, वल्ही कड्यांमध्ये अडकवली व जमिनीवरच वल्हवू लागले. शेवटी त्यांनी एक छोटी, रुंद वरामीची, तीन-चार माणसे बसू शकणारी होडी निवडली.

"आम्हाला ह्या कड्या नकोत," जणू काही

स्वतःच होडीचा मालक असल्याच्या थाटात खोलीन साखळीला धरून म्हणाला आणि कडीचा स्क्रू सोडवू लागला. "बाकीचं काम तीरावर करू. प्रथम पाण्यात चाचणी घेऊ..."

आम्ही होडी उचलली – खोलीनने पुढची बाजू धरली व कातासोनोवसह मी मागची बाजू. झुडुपां-मधून होडीसह आम्ही काही पावले चाललो.

"हात् तुमची लेको!.." अचानक खोलीन हळू आवाजात चडफडला. "उचलून द्या!"

आम्ही त्याच्या पाठीवर होडी दिली. त्याने हात वर करून होडीच्या दोन्ही कडा धरल्या व किंचित वाकून लांब ढांगा टाकत कातासोनोवपाठोपाठ तो नदीपाशी गेला.

तीरापाशी मी त्यांना गाठून पुढे धावलो – पहा-ऱ्याच्या चौकीवर ताकीद द्यायला. मला वाटते, एवढ्याचसाठी मी त्यांना पाहिजे होतो.

खोलीन स्वतःच्या ओझ्यासह सावकाशपणे पाण्यात शिरला व थांबला.

आवाज न करण्याची दक्षता घेत आम्ही तिघांनी सावकाशपणे होडी पाण्यात सोडली.

"बसा!"

आम्ही होडीत बसलो. खोलीनने होडीला ढकलले व उडी मारून वरांमीकडे तो चढला. होडी तीरा-

पासून दूर सरकली. एका वल्ह्याने ढकलीत व दुसऱ्याने रेटा देत कातासोनोवने होडी गोल गोल फिरवली. मग त्याने आणि खोलीनने जणू होडी उलटी करण्याच्या इराद्याने प्रथम एका बाजूला व नंतर दुसऱ्या बाजूला सर्व वजनाचा भार टाकला आणि होडीत पाणी शिरेपर्यंत तिला कलती केली. त्यानंतर हाता-पायांवर ओणवून होडीचा तळ आणि कडा त्यांनी चाचपून पाहिल्या.

"सुटसुटीत होडी आहे!" कातासोनोव खुषीत पुटपुटला.

"चालेल," खोलीनने संमती दिली. "होड्या चोरण्यात हा खरोखरीच पटाईत दिसतोय. वाईट होड्या चोरत नाही!.. गाल्त्सेव, कबूल कर, किती होड्यांच्या मालकांना तू बुडवलंस?"

उजव्या तीरावरून अधूनमधून खोल भुंकल्याप्रमाणे मशिनगनच्या फैरी उडत होत्या.

"खुळयासारखे गोळया झाडताहेत," कातासोनोव हसून पुटपुटला. "खरं तर जर्मन काटकसरी समजतात, पण प्रत्यक्षात बघावं तर खूप उधळपट्टी करतोय! असा आंधळा भडिमार करून काय उपयोग?.. कॉम्रेड कप्तान, कदाचित नंतर, पहाटेपूर्वी, दोस्तांना ओढून आणू..." अनिश्चित स्वरात त्याने खोलीनपुढे प्रस्ताव मांडला.

“आज नाही. आज अजिबात नाही...”

कातासोनोव सहजपणे वल्ही चालवतो. किनाऱ्यापाशी येताच आम्ही पटापट होडीतून खाली उतरलो.

“आपण कड्यांना पट्ट्या बांधू आणि खोबणीं-मध्ये वंगण माखू, म्हणजे बास्स!” खोलीन समाधानपूर्वक पुटपुटला आणि माझ्याकडे वळला: “इथं खंदकात तुझं कोण आहे!”

“सैनिक, दोन.”

“एकाला ठेव. खात्रीचा आणि तोंड बंद ठेवणारा! समजलं? मी त्याच्याकडं सिगारेट ओढायला जातो – त्याला तपासून बघतो!.. पहारेकरी पलटणीच्या कमांडरला इशारा दे की, रात्री दहा वाजल्यानंतर टेहळयांचा गट कदाचित – त्याला न विसरता सांग: कदाचित!” खोलीन ठासून म्हणाला, “दुसऱ्या तीरावर जाईल. ह्या काळात सर्व चौक्यांना आधी इशारा देऊन ठेवा. आणि तो स्वत: सगळयात जवळच्या मोठ्या खंदकात मशिनगनपाशी थांबू देत.” खोलीनने खालच्या प्रवाहाच्या दिशेला बोट दाखविले. “जर आम्ही परतताना आमच्यावर त्यांनी गोळीबार केला, तर मी त्याची मुंडी मुरगाळीन!.. कोण जातोय, का, कशासाठी – ह्याबाबत चकार शब्दानं बोलायचं नाही! लक्षात ठेव: इवानबद्दल फक्त तुला माहीत आहे! तुझ्याकडून मी लेखी काही

घेत नाही, पण जर वटवट केलीस, तर मी तुला..."

"कशाला उगीच घाबरवतोस?" मी तिटकाऱ्याने पुटपुटलो. "मी काय लहान बाळ आहे?"

"मलासुद्धा तसंच वाटतं. तू अपमान वाटून घेऊ नको." त्याने माझ्या खांद्यावर थोपटत म्हटले. "मी तुला इशारा देणं आवश्यक आहे... आता कामाला लाग!.."

कातासोनोव एव्हाना वल्ह्यांच्या कड्यांशी गुंतला होता. खोलीनसुद्धा होडीपाशी जाऊन काम करू लागला. एक मिनिटभर मी उभा राहिलो व किनाऱ्यालगत चालू लागलो.

पहारेकरी पलटणीचा कमांडर मला जवळच भेटला. तो खंदकांमधून फेरी मारीत होता, चौक्या तपासत होता. खोलीनने सांगितल्याप्रमाणे मी त्याला सूचना दिल्या आणि बटालियनच्या कचेरीकडे गेलो. तेथे काही हुकूम देऊन, कागदपत्रांवर सह्या करून माझ्या निवाऱ्यात परतलो.

मुलगा एकटाच होता. तो लालबुंद दिसत होता, तापला होता, उत्तेजित बनला होता. त्याच्या हातात कोस्त्याचा सुरा होता, छातीवर माझी दुर्बीण लटकत होती, चेहरा अपराधी दिसत होता. निवाऱ्यात सगळी अव्यवस्था माजलेली होती. टेबल पाय वर करून उलटे पडले होते आणि त्यावर पांघरूण

7-207

पसरलेले होते, फळीखालून स्टुलाचे पाय डोकावत होते.

"तू माझ्यावर रागावणार नाहीस ना," मुलगा अजीजीच्या सुरात मला म्हणाला. "माझ्या हातून चुकून घडलं... शप्पत, अगदी चुकून..."

तेव्हा कुठे माझ्या ध्यानात आले की, सकाळीच धुवून काढलेल्या तक्तपोशीच्या फळ्यांवर शाईचा भलामोठा डाग पडला होता.

"तू रागावला नाहीस ना?" माझ्या डोळ्यां-मध्ये पहात त्याने मला विचारले.

"नाही रे," मी उत्तरलो. वस्तुतः निवाऱ्यातील अव्यवस्था आणि तक्तपोशीवरील शाईचा डाग माझ्या स्वभावाला मानवणाऱ्या गोष्टी नव्हत्या.

मी मुकाटपणे वस्तूंची व्यवस्थित मांडामांड करू लागलो, मुलगा मला मदत करीत होता. शाईच्या डागाकडे निरखून पहात त्याने मला सुचविले:

"पाणी तापवलं पाहिजे. आणि साबणानं... मी घासून काढतो!"

"असू दे. तुझ्याशिवाय करून टाकू..."

मला भूक लागली होती. सहा लोकांसाठी जेवण आणा असा मी टेलीफोनवरून हुकूम दिला. होडीशी खटपट केल्यानंतर खोलीन आणि कातासोनोव माझ्या-सारखेच भुकेने पेटले असणार.

टेहळ्यांबाबतच्या कहाणीचे मासिक नजरेला पडताच मी मुलाला विचारले :

"मग काय, वाचून काढली गोष्ट?"

"होय... हुरहुर लागते. पण प्रत्यक्षात असं कधी घडत नाही. त्यांचा ताबडतोब निकाल लावतात. इथं त्यांना नंतर आणखी पदकं लटकावलीत."

"तुला कशाबद्दल पदक मिळालंय?" मी कुतूहलाने विचारले.

"पार्तीझानांबरोबर होतो तेव्हाचं आहे..."

"तू पार्तीझानांबरोबर होतास?" जणू काही पहिल्यांदाच ऐकत होतो असा आश्चर्याचा बहाणा करीत मी विचारले. "मग तिथून का बाहेर पडलास?"

"आमची जंगलात कोंडी करण्यात आली आणि मला विमानातून तिथून सोडवलं. मग बोर्डिंग शाळेत. पण लौकरच मी तिथून पसार झालो."

"पसार झालो, म्हणजे?"

"पळालो. तिथं फार वाईट अवस्था झाली माझी. अगदी सहन होईना. नुसतं फुकट खायचं. आणि रानगव्यांची माहिती वाच. मासे एका मणक्याचे प्राणी आहेत... किंवा वनस्पतीभक्षक प्राण्यांचे माणसाच्या आयुष्यातील महत्त्व..."

"पण हीसुद्धा माहिती असली पाहिजे."

"होय. पण आत्ता मला तिची काय गरज? काय उपयोग ह्या माहितीचा?.. आख्खा महिनाभर ते सगळं सहन केलं. रात्र रात्र विचार करायचा: इथं मी कशासाठी? काय करण्यासाठी? .."

"बोर्डिंग शाळेत सगळ्यांनाच जमत नाही," मी त्याच्याशी सहमत होत म्हणालो. "तुला दुसरी शाळा पाहिजे. तुला सूवोरोव लष्करी विद्यालयात प्रवेश मिळाला तर छान होईल!"

"तुला असं बोलायला खोलीननं शिकवलं?" मुलाने पटकन प्रश्न टाकला व माझ्याकडे संशयित नजरेने पाहिले.

"इथं खोलीनचा संबंध काय? मला स्वत:लाच असं वाटतंय. तू एव्हाना लढाईचा वाटा पूर्ण केला आहेस. पार्तीझानांमध्ये आणि टेहळयांमध्ये. तू नाव मिळवलंय. आता तू विश्रांती घेतली पाहिजे, शिकलं पाहिजे! तुझ्यामधून किती झकास ऑफीसर निर्माण होईल, माहीत आहे?.."

"हे तुला खोलीननं शिकवलं!" मुलगा ठामपणे म्हणाला. "निष्कारण!.. ऑफीसर होण्यासाठी अजून खूप अवकाश आहे. जोवर युद्ध चालू आहे, तोवर फक्त कुचकामी माणूस विश्रांती घेऊ शकेल."

"खरं आहे, पण तू अजून खूप लहान आहेस!"

"लहान?.. तू मृत्यू-छावणीत होतास?" अचानक

त्याने विचारले. त्याच्या डोळयांमधून ठिणग्या उडत होत्या. मुलाला अस्वाभाविक असणारा द्वेष पेटला होता. त्याचा छोटुकला वरचा ओठ थरथर कापत होता. "तू काय मला पटवायचा प्रयत्न करतोस, काय?" उत्तेजित होत तो ओरडला. "तू... तुला काहीही माहीत नाही आणि उगीच नाक खुपसू नको!.. रिकामटेकडे उद्योग..."

काही मिनिटांनंतर खोलीन आला. प्लायवूडची सूटकेस फळीखाली सारून स्टुलावर त्याने बसकण घातली व सिगारेटचे जोरदार झुरके मारायला सुरुवात केली.

"सारखा सिगारेटी फुंकतोस," मुलगा नाराजीच्या स्वरात म्हणाला. तो सुरा न्याहाळीत होता, त्याची म्यानातून काढ-घालं करीत होता, एकदा डाव्या तर एकदा उजव्या बाजूला कमरेला खोचत होता. "सिगारेटी ओढल्यामुळं फुफ्फुसं हिरवी बनतात."

"हिरवी?" विमनस्कपणे स्मित करीत खोलीनने उलट विचारले. "होऊं देत खुशाल हिरवी! कुणाला दिसणार ती?"

"तू सिगारेटी ओढू नये अशी माझी इच्छा आहे. माझं डोकं दुखायला लागतं."

"ठीक आहे, मी बाहेर जातो."

खोलीन उठला आणि मुलाकडे सस्मित मुद्रेने



पहात राहिला. मुलाचा तांबडालाल चेहरा पाहून त्याच्याजवळ गेला, मुलाच्या कपाळावर त्याने हात ठेवला आणि आता तो नाराजीच्या स्वरात म्हणाला:

"परत खेळत बसलास?.. मुळीच चांगलं नाही! मुकाट निजून विश्रांती घे. झोप, झोप!"

मुलगा आज्ञाधारकपणे फळीवर जाऊन निजला. खोलीनने नवी सिगारेट काढली व जुन्या थोटकानेच पेटवली आणि खांद्यावर कोट टाकून तो निवाऱ्या-बाहेर गेला. जेव्हा त्याने सिगारेट पेटवली, तेव्हा त्याचे हात किंचित थरथरत असल्याचे माझ्या ध्यानात आले होते. माझ्या "मनाच्या चिंध्या" झालेल्या असतील, पण तोसुद्धा मोहीमेपूर्वी बेचैन होता. तो

विमनस्क बनला होता अथवा चिंतामग्न झाला होता, असे माझ्या ध्यानात आले होते. तो पट्टीचा निरीक्षक होता, तरी फरशीवरील शाईचा डाग त्याच्या लक्षात आला नव्हता आणि एकूण तो विचित्र दिसत होता. कदाचित मला तसे भासले असेल.

बाहेर तो दहा मिनिटेपर्यंत धूम्रपान करीत होता (अर्थात अनेक सिगारेटी ओढल्या असणार), परत आल्यानंतर तो मला म्हणाला:

"आणखी दीड तासानंतर निघू. आता जेवू या."

"कातासोनीच कुठाय?" मुलाने विचारले.

"त्याला डिव्हिजन-कमांडरनी तातडीनं बोलावून घेतलं. तो डिव्हिजनला गेला."

"काय – निघून गेला?!" मुलगा ताडदिशी उठून बसला. "इथं न येता निघून गेला? मला शुभेच्छा न देता?"

"त्याला शक्य झालं नाही! फार तातडीनं त्याला बोलावण्यात आलं," खोलीन समजावीत होता. "तिथं काय घडलंय ह्याची मलासुद्धा कल्पना नाही... आपल्याला त्याची गरज आहे हे त्यांना माहीत आहे आणि अचानक बोलावणं धाडलं..."

"धावत-पळत येऊ शकला असता. म्हणे मित्र..." बेचैन होत अपमानीत स्वरात मुलगा

म्हणाला. तो मनस्वी अस्वस्थ बनला होता.

भिंतीकडे तोंड करून अर्धा मिनिटभर तो गप्प पडून राहिला, मग वळून त्याने विचारले:

"तर मग आपण दोघांनीच जायचं?"

"नाही, तिघांनी. हा येईल आपल्याबरोबर," खोलीनने पटकन मानेने माझ्याकडे खूण केली.

मी त्याच्याकडे मख्खपणे पाहिले आणि तो थट्टा करतोय अशा कल्पनेने स्मित केले.

"तू हसू नको आणि नव्या फाटकापाशी उभ्या असलेल्या मेंढचासारखा बघू नको. मी तुला अत्यंत गंभीरपणं सांगतोय," खोलीन म्हणाला. त्याचा चेहरा केवळ गंभीरच नव्हे, तर चिंताक्रांत बनला होता.

त्याच्यावर माझा विश्वास बसत नव्हता, तरीसुद्धा मी गप्प राहिलो.

"तुझीच इच्छा होती. विनंती केली होतीस ना? आणि आता घाबरलास?" माझ्याकडे तिटकाऱ्याने एकटक पहात त्याने मला विचारले. काय करावे ते मला समजेना. अचानक मला जाणीव झाली, की तो थट्टा करीत नव्हता.

"मी घाबरत नाही!" विचार एकवटायचा प्रयत्न करीत ठामपणे मी म्हणालो. "फक्त अनपेक्षित आहे..."

"आयुष्यात सगळंच अनपेक्षित आहे," खोलीन विचारमग्न होत म्हणाला. "मी तुला बरोबर घेतलं नसतं, विश्वास ठेव: पण अत्यावश्यक आहे! काता-सोनीचला तातडीनं बोलावून घेण्यात आलं! तिथं काय घडलंय ह्याची मी कल्पनाच करू शकत नाही... आपण दोन तासांनंतर परतू," खोलीन माझी खात्री पटवीत होता. "मात्र तू स्वतः निर्णय घे, स्वतः! काही घडलं तर माझ्या डोक्यावर त्याचं खापर फोडू नको. परवानगीविना तू त्या तीरावर गेला होतास हे समजलं, तर आपल्या दोघांचीही शंभर वर्षं भरतील! तेव्हा नंतर विव्हळू नको: 'खोलीन म्हणाला, खोलीननं विनंती केली, खोलीननं मला गोत्यात घातला!' मला असं नकोय! लक्षात ठेव: तू स्वतःच विचारलंस. खरंच, विचारलंस ना? काही वेडंवाकडं घडलं तर अर्थातच माझ्यावर शेकेल, पण तूही त्यातून सुटणार नाहीस!.. स्वतः-च्या जागी कुणाला नेमण्याचा तुझा विचार आहे?" किंचित थांबून त्याने कामाच्या मुद्द्याला हात घातला.

"राजकीय उपप्रमुख... कल्बासोवला," थोडा विचार करून मी म्हणालो. "तो धडाकेबाज पोरगा आहे..."

"तो पोरगा धडाकेबाज असेल. पण त्याच्याशी संबंध न राखणं जास्त चांगलं. हे राजकीय उपप्रमुख—

फार तत्त्वनिष्ठ माणसं असतात. आपल्याला कळायच्या आत त्यांच्या राजकीय अहवालांमध्ये गुंतवतील आणि मग अप्रिय प्रसंगात अडकू," खोलीनने हसून खुलासा केला व डोळे वरती फिरवीत तो म्हणाला: "देवा, अशा संकटापासून आम्हाला वाचव!"

"तर मग गूश्चीनला, पाचव्या कंपनीचा कमांडर."

"तुला जास्त माहीत, तूच ठरव!" खोलीन म्हणाला आणि त्याने सल्ला दिला: "पण त्याला कामाची कल्पना देऊ नको: म्हणजे तू त्या किनाऱ्यावर जाणार आहेस हे फक्त पहारेकऱ्यांना माहीत असेल. समजलं?.. प्रतिस्पर्धी बचावाच्या पवित्र्यात आहे आणि सक्रिय कारवाया त्याच्या बाजूनं घडणार नाहीत, हे ध्यानात घेता काय घडू शकेल?.. काहीही नाही! शिवाय तू उपप्रमुखावर जबाबदारी सोपवून फक्त दोन तासांपुरता बाहेर जाणार. कुठं गेलास?.. समजू, खेड्यात गेलास... आपण दोन तासांनंतर परतू... जास्तीत जास्त तीन तासांनंतर – काही फार विशेष नाही!.."

...तो निष्कारण माझी समजूत पटवीत होता. मामला अर्थातच खूप गंभीर होता आणि जर वरिष्ठांना ही गोष्ट समजली असती, तर अप्रियता टाळणे अशक्य होते. पण एव्हाना माझ्या मनाचा

निर्णय झाला होता व अप्रियतेबद्दल विचार करण्याचे टाळत होतो. माझे विचार वर्तमानकाळाशी पूर्णतया गुंतले होते.

टेहळणीच्या कामगिरीवर जाण्याचा प्रसंग माझ्यावर यापूर्वी कधी आला नव्हता. एवढे खरे, तीन महिन्यांपूर्वी माझ्या कंपनीसह अत्यंत यशस्वीरीत्या मी टेहळणी-धाड घातली होती. पण अशी टेहळणी-धाड म्हणजे काय?.. प्रत्यक्षात आक्रमक चढाई, फक्त मोजक्या ताकदीनिशी आणि थोडक्या वेळापुरती.

टेहळणीवर मी पूर्वी कधीही गेलो नव्हतो आणि आगामी कामगिरीचा विचार करताना अर्थातच मी उत्तेजित होणे स्वाभाविक होते...

५

जेवण आणले होते. मी स्वतः दाराबाहेर गेलो व भांडी आणि गरम चहाची किटली घेऊन आलो. शिवाय ताकाने भरलेले मडके आणि मांसाचा हवाबंद डबा ह्या वस्तू मी टेबलावर ठेवल्या. आम्ही जेवू लागलो: मुलगा व खोलीन फारच कमी खात होते. माझीही भूक मेली होती. मुलाचा चेहरा अपमानीत आणि काहीसा दु:खी होता. कातासोनोव त्याला शुभेच्छा द्यायला आला नव्हता ही गोष्ट त्याच्या

मनाला फार झोंबलेली दिसली. खाल्ल्यानंतर तो परत फळीवर लवंडला.

टेबल स्वच्छ केल्यानंतर खोलीनने नकाशा उलग-डला व मला योजना समजावून सांगितली.

आम्ही तिघे पलीकडील किनाऱ्यावर जाणार होतो, झुडुपांमध्ये होडी लपवून वरच्या प्रवाहाकडे किनाऱ्या-लगत चालत खिंडीपर्यंत सहाशे मीटर अंतरापर्यंत जाणार होतो. खोलीनने हा मार्ग नकाशावर दाख-विला.

"थेट ह्या ठिकाणापर्यंत होडीतून जाणं जास्त चांगलं झालं असतं, पण तिथं बोडका किनारा आहे आणि होडी लपवायला कुठंही जागा नाही," खो-लीनने खुलासा केला.

तिसऱ्या बटालीयनच्या समोर असलेल्या शत्रूच्या संरक्षणफळीला मुलगा खिंडीमधून पार करणार होता.

जर मुलगा जर्मनांच्या नजरेला पडला, तर अगदी पाण्यापाशी उभ्या असलेल्या मी व खोलीनने ताब-डतोब लाल शलाका उडवून – आमच्या तोफखान्याला भडिमार करण्याचा इशारा – जर्मनांचे आमच्याकडे लक्ष वेधवायचे आणि "वाट्टेल ती किंमत देऊन" मुलाला होडीकडे परतायला संरक्षण द्यायचे. सर्वांत शेवटी खोलीन माघार घेईल.

जर मुलगा जर्मनांच्या नजरेला पडला, तर आम-

च्या इशाऱ्यासरशी "पाठराख्या माध्यमाने" — ७६ मि. मी. तोफांच्या दोन बॅटऱ्या, १२० मि. मी. उखळी तोफांची एक बॅटरी, दोन उखळी तोफांच्या आणि मशिनगनच्या कंपन्या — प्रचंड भडिमार करून खिंडीच्या दोन्ही बाजूंकडील आणि दूर डावीकडील जर्मनांना त्यांच्या खंदकांमधून डोके वर काढायला अवसर द्यायचा नव्हता व होडीपर्यंतची आमची माघार सुरक्षित करायची होती.

खोलीनने मला डावीकडील किनाऱ्यावरचे सहकार्याचे इशारे समजावून सांगितले, तपशील परत सांगितला व विचारले:

"तुला सगळं स्पष्ट समजलं?"

"हो."

थोडा वेळ गप्प राहून मी मनातील चिंता बोलून दाखविली. तसल्या गडद अंधारात एकाकी अवस्थेत मुलगा वाट तर चुकणार नाही? आणि तोफांच्या भडिमारात तो सापडला तर?

खोलीनने खुलासा केला की, "तो" — मुलाकडे मानेने खूण करून — कातासोनोवबरोबर तिसऱ्या बटालियनच्या टेहळणी चौकीवर बसून कित्येक तासपर्यंत शत्रूच्या किनाऱ्याचा व नदी ओलांडण्याच्या स्थळाचा अभ्यास करीत होता, तेथील प्रत्येक झुडूप, प्रत्येक टेकाड त्याला तोंडपाठ झाले होते. भडिमाराबाबत

बोलायचे तर आमच्या तोफखान्याने लक्ष्यांची निवड आधीच केलेली होती आणि माघारीसाठी सत्तर मीटर रुंदीची "वाट" मोकळी सोडण्यात येणार होती.

किती अनपेक्षित घटना घडू शकतील ह्याबाबत मी नकळत विचार करीत होतो, पण त्याबद्दल तोंडून एक अक्षर काढले नाही. छताकडे नजर रोखून विचारमग्न-खिन्न चेहऱ्याने मुलगा निजला होता. त्याचा चेहरा दुखावलेला दिसत होता आणि आमच्या संभाषणात जणू त्याला काहीही स्वारस्य नव्हते, असे मला भासत होते.

नकाशावरील निळ्या रेषा मी परत बारकाईने पाहिल्या – खोलवरचे जर्मन संरक्षण-मोर्चे – आणि प्रत्यक्षात ते कसे दिसत असतील त्याची कल्पना करीत हळूच विचारले:

"आपण नदी ओलांडण्याची जागा बरोबर निवडलीय अशी खात्री आहे तुझी? शत्रूचे संरक्षण-मोर्चे विरळ असलेली दुसरी जागा नाही? कुठंही "दुबळ्या" फटी नाहीत?"

डोळे किलकिले करून खोलीनने माझ्याकडे उपहासाने पाहिले.

"तुम्ही लढणारी माणसं स्वतःच्या नाकांपलीकडं अक्षरशः काही पहात नाही!" काहीशा तुच्छतेने तो म्हणाला. "तुम्हाला सतत वाटतं की, फक्त

तुमच्यासमोर प्रतिस्पर्ध्याचं मुख्य बळ आहे आणि इतर जागी केवळ दाखविण्यापुरत्या, दुबळ्या मोर्चांना उभं केलंय! तुझ्यापेक्षा कमी काळजीनं आम्ही जागा निवडलीय आणि तुझ्यापेक्षा आम्हाला कमी अक्कल आहे, असं खरंच वाटतंय काय तुला?.. जर तुला माहिती पाहिजेच असेल तर सांगतो – इथं सबंध आघाडीवर जर्मनांनी एवढे सैनिक पेरलेत की, तेवढे तू स्वप्नातसुद्धा पाहिले नसशील! आणि फटींवर ते डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवताहेत. आजकाल कुणी मूर्ख उरले नाहीत. मूर्खांची केव्हाच पाठवणी झालीय! कित्येक किलोमीटर आतपर्यंत कडक संरक्षण-मोर्चे बसवलेत," खोलीनने विषण्ण उसासा टाकला. "अरे शहाण्या, आम्ही ह्यावर अनेकदा विचार केलाय. लक्षात ठेव, अशा गोष्टी घाईगर्दीनं कधी ठरवत नाहीत!.."

तो उठला आणि मुलापाशी फळीवर बसून दबत्या आवाजात त्याला सूचना देऊ लागला. माझ्या कल्पनेनुसार ह्या गोष्टी तो काही त्याला पहिल्यांदाच सांगत नव्हता.

"...खिंडीत अगदी एका कडेनं जा. लक्षात ठेव: खाली सगळीकडं सुरुंग पेरलेले आहेत... सतत कानोसा घे. अगदी ठप्प थांब आणि कानोसा घे! खंदकांवर गस्त घालतात. तेव्हा सरपटत जा आणि

वाट पहा ! .. गस्तवाले निघून गेले की, खंदक ओलांड आणि पुढं जा ... "

पाचव्या कंपनीचा कमांडर गूश्चीनला मी फोन केला, माझ्या जागी त्याची तात्पुरती नेमणूक करतोय असं सांगितलं आणि आवश्यक हुकूम दिले. मी रिसीव्हर खाली ठेवला तेव्हा परत मला खोलीनचा हळू आवाज ऐकू आला :

" ... फ्योदरोवकाला वाट पहा ... तोंड वर करून पाहू नको ! मुख्य म्हणजे जपून रहा ! "

" तुला वाटतं, जपून राहणं सोपं आहे ? " किंचित कापऱ्या आवाजात मुलाने विचारले.

" माहीत आहे ! पण तू जपून रहा ! आणि नेहमी लक्षात ठेव : तू एकटा नाहीस ! आठवण ठेव : तू कुठंही असलास, तरी तुझ्याबद्दल मी सतत विचार करत असतो. आणि लेफ्टनंट – कर्नलसुद्धा ... "

" पण कातासोनीच मला न भेटता निघून गेला, " बालिश विसंगतीनुसार मुलगा फुरंगटून म्हणाला.

" मी तुला सांगितलं ना : त्याला अशक्य होतं ! त्याला फार तातडीनं बोलावून घेतलं. नाही तर ... तुझ्यावर त्याचं किती प्रेम आहे हे तुला माहीत आहे ! तुला माहीत आहे की, त्याचं दुसरं कुणीही नाही आणि तू त्याचं सर्वस्व आहेस ! ठाऊक आहे ना ? "

" ठाऊक आहे, " मान खाली घालून मुलाने

कबुली दिली. त्याचा आवाज कापरा बनला होता. "पण तरीसुद्धा, तो येऊ शकला असता..."

खोलीन त्याच्यापाशी निजला व त्याच्या मऊ तागासारख्या केसांवरून हात फिरवीत काहीतरी पुटपुटला. न ऐकण्याचा मी प्रयत्न करीत होतो. अनेक कामे मला पार पाडायची होती असे माझ्या ध्यानात आले व मी धांदल करू लागलो. पण प्रत्यक्षात हातून काही घडेना. शेवटी मी नाद सोडून दिला व आईला पत्र लिहायला बसलो: मला माहीत होते की, टेहळे लोक कामगिरीवर जाण्यापूर्वी नातेवाईकांना आणि जिवलगांना पत्रे लिहितात. मी अस्वस्थ बनलो होतो, विचार निसटत होते आणि पेन्सिलीने अर्धे पान लिहिल्यानंतर मी ते फाडून टाकले व चुलाण्यात फेकले.

"वेळ झाली," घड्याळावर नजर टाकीत खोलीन मला म्हणाला आणि उठला. जर्मन सूटकेस बाकावर ठेवीत त्याने फळीखालून गाठोडे खेचून बाहेर काढले व त्याची गाठ सोडली. तो आणि मी पोषाख करू लागलो.

सुती अंतर्वस्त्रांच्या वरती त्याने पातळ लोकरी पँट व स्वेटर अंगात चढवले. मग हिवाळी आखूड कोट आणि तुमान घातली व त्याच्यावर हिरवा बुरखेवाला अंगरखा घातला. त्याचे पाहून मीही

तसाच पोषाख करू लागलो. कातासोनोवची लोकरी पँट मला तोकडी झाली. शिवणीत ती उसवली. मी अनिश्चितपणे खोलीनकडे पाहू लागलो.

"असू दे, असू दे," तो मला धीर देत म्हणाला. "चढव अंगात! फाटली तर नवी मागवून घेऊ!"

बुरखेवाला अंगरखा मला ठीक झाला, पण तुमान किंचित आखूड होती. पायांवर आम्ही जर्मन खिळे ठोकलेले बूट चढवले. ते जड होते, सवयीचे नव्हते, पण खोलीनच्या सांगण्यानुसार ही सावधगिरी होती: त्या किनाऱ्यावर "ठसे न ठेवण्याची." खोलीनने स्वतः माझ्या अंगरख्याच्या दोऱ्या बांधल्या.

लौकरच आम्ही सज्ज झालो: कमरपट्ट्यांमध्ये सुरे आणि "F-1" ग्रेनेड लटकावले होते (शिवाय खोलीनने अवजड वजनाचा रणगाडाविरोधी "RPG-40" ग्रेनेड घेतला). भरलेली पिस्तुले कमरपट्ट्यांच्या आत खोचली, अंगरख्यांच्या बाह्यांमध्ये कंपास आणि चमकणाऱ्या तबकडीची घड्याळे लपविली. शलाका उडवणारी पिस्तुले तपासली आणि खोलीनने टॉमीगन-च्या थाळ्या तपासल्या.

आम्ही तयार झालो होतो, पण मुलगा मात्र अजूनही हातांची उशी डोक्याखाली धरून पडला होता आणि आमच्याकडे पहात नव्हता.

मोठ्या जर्मन सूटकेसमधून मुलाचा विटक्या

तपकिरी रंगाचा दुलईदार कोट, रफू केलेली काळपट-करडी विजार, मळकट केसाळ कानटोपी आणि जुनाट उंच बूट एवढ्या वस्तू काढण्यात आल्या. सुती अंतर्वस्त्रे, सर्वत्र ठिगळे लावलेला एक जर्सी आणि पायमोजे, जुनाट थैली, पायांभोवती गुंडाळण्याची फडकी व काही चिंध्या, फळीच्या कडेशी मांडून ठेवण्यात आल्या.

हातमागावर विणलेल्या फडक्यात खोलीनने मुलाचे खाण्याचे पदार्थ गुंडाळले. त्यात अर्धा किलो सॉसेजेस, डुकराच्या चरबीचे दोन तुकडे, रायच्या पावाचा एक तुकडा व पांढऱ्या पावाचे काही तुकडे यांचा समावेश होता. सॉसेजेस घरगुती होती, डुकराची चरबी आमच्या सैन्यातील शिध्यामधील नव्हती; घाणेरड्या मिठामुळे करडा रंग चढलेले ते पातळ तुकडे होते आणि पावसुद्धा घरच्या भट्टीत भाजलेला होता.

त्या वस्तू पाहताना माझ्या मनात विचार येत होता: प्रत्येक क्षुल्लक गोष्टीचा आधीपासून किती काटेकोर विचार केलेला होता...

खाण्याचे पदार्थ एव्हाना गुंडाळून थैलीत टाकण्यात आले होते, पण मुलगा स्तब्ध पडून होता. खोलीनने त्याच्याकडे चोरटा कटाक्ष टाकला, पण एकही शब्द न बोलता तो शलाका-पिस्तुलाची तपासणी करू

लागला आणि परत थाळ्यांचे पट्टे चाचपून पाहू लागला.

अखेरीस मुलगा फळीवर उठून बसला आणि सावकाशपणे स्वत:चा लष्करी गणवेष अंगावरून उतरवू लागला. गडद निळी तुमान गुडघ्यांवर आणि ढुंगणावर मळली होती.

"डिंक," तो म्हणाला. "त्यांना धुवायला सांग."

"त्यापेक्षा त्यांना गुदामात पाठवून नव्या कपड्यांना मागवून घेतलं तर?" खोलीनने प्रस्ताव मांडला.

"नको, ह्यांनाच स्वच्छ करा."

मुलगा सावकाशपणे नागरी पोषाख चढवीत होता. खोलीन त्याला मदत करीत होता व सर्व बाजूंनी त्याची पाहणी करीत होता. मीही पहात होतो: आता तो घरादाराविना एक अनाथ पोरगा दिसत होता. चढाईच्या वाटचालीत अशा अवतारातील अनेक मुले आम्ही पाहिली होती.

मुलाने खिशांमध्ये घरगुती बनावटीचा चाकू आणि चुरगळलेले कागद कोंबले: साठ किंवा सत्तर व्याप्त प्रदेशातील जर्मन मार्क. बस्स.

"उड्या मारा," खोलीन मला म्हणाला.

चाचणीसाठी आम्ही अनेक उड्या मारल्या. मुलानेसुद्धा उड्या मारल्या. वस्तुत: त्याच्या अंगावर वाजण्यासारख्या कोणत्या वस्तू होत्या?



जुन्या रशियन रीतीनुसार आम्ही प्रवासाला बाहेर पडण्यापूर्वी बसलो व काही काळ गप्प राहिलो. मुलाच्या चेहऱ्यावर परत अस्वाभाविक एकाग्रतेचा आणि अंतर्गत ताणाचा भाव उमटला होता. सहा दिवसांपूर्वी प्रथम तो माझ्या निवाऱ्यात आला होता, तेव्हा त्याचा असाच चेहरा मी पाहिला होता.

इशारा देण्याच्या विजेऱ्यांचा लाल प्रकाश आम्ही आमच्या डोळ्यांवर पाडून घेतला (अंधारात जास्त चांगले दिसावे म्हणून) आणि होडीकडे निघालो. मी सर्वांत पुढे, माझ्यापाठी पंधरा पावलांवर मुलगा व आणखी मागे खोलीन.

वाटेत भेटणाऱ्या प्रत्येकाला हाक मारून मी बोलण्यात गुंतवायचे होते व दरम्यान मुलाने लपून रहायचे होते. आमच्याविना इतर कुणाच्याही दृष्टीस आता त्याने पडायचे नव्हते. खोलीनने याबाबत मला सक्त ताकीद दिली होती.

उजवीकडून हळू आवाजातील हुकूम ऐकू येत होते: "गोलंदाजानो, आपापल्या जागा घ्या!.. लढाईला सज्ज!.." फांद्या कडकडत होत्या. गोलंदाज तोफा व उखळी तोफा सज्ज करीत होते. माझ्या आणि तिसऱ्या बटालीयनच्या दरम्यान झुडुपांमध्ये तोफांचे मोर्चे लावलेले होते.

मोहीमेत आमच्याशिवाय आणखी सुमारे दोनशे लोक गुंतलेले होते. जर्मनांच्या मोर्चांवर आगीचा भडिमार करून आम्हाला संरक्षण देण्यास कोणत्याही क्षणी ते सज्ज होते. आणि ही केवळ धाड होती ह्याबाबत कुणालाही संशय नव्हता. पाठबळ देणाऱ्या तुकड्यांच्या कमांडरांना खोलीनने तसेच सांगितले होते.

होडीपासून जवळच पहाऱ्याची चौकी होती. मुळात तेथे पहारेकऱ्यांची जोडी होती. पण खोलीनच्या सूचनेनुसार फक्त एकच पहारेकरी ठेवण्याचा मी हुकूम दिला होता. मध्यमवयीन, चाणाक्ष लान्स कार्पोरल द्योमीन ह्याची तेथे नेमणूक करण्यात आली होती. जेव्हा आम्ही किनाऱ्यापाशी आलो, तेव्हा खोलीनने द्योमीनला संभाषणात गुंतविण्यासाठी माझी पाठवणी केली व दरम्यान तो आणि मुलगा पसार झाले. ह्या सगळ्या सावधगिऱ्या मला अनावश्यक वाटत होत्या, पण खोलीनची गुप्तता बाळगण्याची पद्धत मला आश्चर्यकारक वाटत नव्हती. मला माहीत होते की, सगळे टेहळे असेच वागायचे. मी पुढे गेलो.

"कोणतीही भाष्यं नकोत!" खोलीनने दबत्या आवाजात मला कडकपणे बजावले.

दर पावलाला अशा ताकीदी ऐकण्याचा मला

वीट आला होता. मी काही लहान बाळ नव्हतो आणि अशा परिस्थितीत कसे वागावे ह्याची मला चांगली अक्कल होती.

रूढीनुसार द्योमीनने मला काही अंतरावरच हटकले आणि मी परवलीचे उत्तर देऊन त्याच्यापाशी गेलो, खंदकात उडी मारली व अशा रीतीने उभा राहिलो की, तो माझ्याशी बोलत असताना पाऊलवाटेकडे त्याची पाठ राहील.

"सिगारेट ओढ," मी त्याला सिगारेट देत म्हणालो. मी स्वतःही एक सिगारेट घेतली.

आम्ही उकीडवे खाली बसलो, तो दमट काड्या ओढू लागला, अखेरीस एक काडी पेटली. त्याने प्रथम माझी सिगारेट पेटवली व नंतर स्वतःची. काडीच्या उजेडात मला दिसले की, खंदकाच्या मागील भागात वाळक्या गवतावर कुणीतरी झोपलेला होता. त्याची टोपी मला परिचित भासली. खोल झुरका मारून काहीही न बोलता मी विजेरी पेटवली आणि तो झोपलेला माणूस कातासोनोव होता असे मला दिसले. तो पाठीवर निजला होता व तोंड टोपीने झाकले होते. अजूनही काही उलगडा न होऊन मी टोपी उचलली. सशासारखा सौम्य, राखाडी चेहरा. डाव्या डोळ्यावर गोळीने नीटस बारीक भोक पाडले होते...

"फार मूर्खासारखं घडलं," ग्रोमीन हळू आवाजात पुटपुटला. पण त्याचा आवाज दूरवरून कुठूनतरी आल्याप्रमाणे मला भासला. "होडी तयार केली आणि माझ्यापाशी बसून सिगारेट ओढत होता. कप्तान इथं उभे राहून माझ्याशी बोलत होते, तेवढ्यात हा खंदकातून वर चढू लागला आणि खंदकाबाहेर पडून उभा राहिला न राहिला, तोच तसाच सावकाश खाली घसरला. गोळीबाराचा आवाजसुद्धा आम्ही ऐकला नाही... कप्तान त्याच्यापाशी धावले आणि गदगदा हलवत ओरडले: 'कातासोनीच! कातासोनीच!..' आम्ही पाहतो तर तो जागच्या जागी ठार झालेला!.. कुणालाही याबाबत सांगायचं नाही असा कप्तानांनी हुकूम दिलाय.."

किनाऱ्यावरून परतल्यानंतर खोलीन विचित्र का भासला होता ह्याचा मला आता उलगडा झाला...

"भाष्यं नकोत!" नदीकडून त्याचा दटावणीचा दबता आवाज आला.

मला सगळे समजले. मुलगा कामगिरीवर निघाला होता आणि आता त्याची मन:स्थिती बिघडवून चालणार नव्हते. त्याला काहीही कळून चालणार नव्हते.

खंदकातून बाहेर पडून मी सावकाशपणे पाण्याकडे जाऊ लागलो.

मुलगा एव्हाना होडीत बसला होता. मी होडीच्या मागील बाजूस टॉमीगन सज्ज करून बसलो.

"नीट बैस!" आमच्यावर झूलीचा रेनकोट पांघरीत खोलीन म्हणाला. "होडी कलंडणार नाही अशी दक्षता घे!"

होडी पाण्यात लोटून तो उडी मारून आत बसला आणि त्याने वल्ही हाती घेतली. घड्याळ पाहून तो थोडा वेळ थांबला आणि त्याने हळूच शीळ घातली. मोहीमेच्या आरंभाचा तो इशारा होता.

तात्काळ त्याला उत्तर मिळाले: उजव्या फळीवर तिसऱ्या बटालियनच्या मशिनगन बसविलेल्या मोठ्या खंदकात जेथे पाठराखण करणाऱ्या तुकड्यांचे कमांडर व तोफखान्याचे निरीक्षक बसले होते, तेथून अंधारात रायफल कडाडली.

होडी वळवून खोलीन वल्हवू लागला – किनारा तात्काळ अदृश्य झाला. रात्रीच्या थंडगार काळ्या बुरख्याने आम्हाला तात्काळ गुरफटून टाकले.

६

खोलीनचा संथ गरम श्वास माझ्या चेहऱ्याला जाणवत होता. तो जोरजोराने वल्ही मारीत होता. वल्ही पाण्यावर आपटताच होणारा मंद आवाज

ऐकू येत होता. मुलगा गारठला होता, माझ्याशेजारी रेनकोटात गप्प बसला होता.

समोर, उजव्या किनाऱ्याला, जर्मन नेहमीप्रमाणे गोळीबार करीत होते आणि प्रकाश शलाका उडवून आसमंतातील प्रदेश उजळून काढत होते. पावसामुळे शलाकांचा उजेड मंद पडत होता. वारा आमच्या दिशेने वाहात होता. हवामान आम्हाला पूर्ण अनुकूल होते.

आमच्या किनाऱ्याकडून ट्रेसर गोळयांची फैर उडाली. आम्हाला परतीच्या वाटेवर मदत व्हावी म्हणून डाव्या फळीवरील तिसरी बटालियन दर पाच ते सात मिनिटांच्या दरम्यान अशा ट्रेसर गोळयांच्या फैरी झाडणार होती.

"साखर!" खोलीन पुटपुटला.

आम्ही तोंडात साखरेचे दोन दोन तुकडे कोंबले व त्यांना चोखू लागलो. आमचे डोळे आणि कान अधिक संवेदनाक्षम होण्यासाठी तसे करणे आवश्यक होते.

आम्ही नदीच्या मध्यभागी कुठेतरी होतो, तेव्हा आमच्या समोर एक मशिनगन कडाडू लागली. आमच्या जवळून गोळया सू सू जात होत्या, पाण्यावर आपटून फुस्स आवाज करीत होत्या.

"MG-34" मला बिलगत मुलगा अचूक पुटपुटला.



"घाबरलास ?"

"थोडासा," अगदी मंद आवाजात तो म्हणाला. "अजून सवय होत नाही. काहीतरी भीती बसलीय मनात... आणि भीक मागायचीसुद्धा सवय होत नाही. किळस येते!"

ह्या मानी, संवेदनाशील मुलाला भीक मागत फिरताना किती मानसिक यातना होत असाव्यात, ह्याची मी सहज कल्पना करू शकत होतो.

"अरे ऐक," आठवण होऊन मी दबत्या आवाजात म्हणालो, "आमच्या बटालियनमध्ये एक बोन्दारेव आहे. तोसुद्धा गोमेलचा आहे. योगायोगानं तो तुझा नातेवाईक तर नव्हे?"

"नाही . मला नातेवाईक नाहीत. एकटी आई आहे. तीसुद्धा आता कुठं आहे, माहीत नाही ..." त्याचा आवाज कंप पावला. "आणि माझं खरं आडनाव बूस्लोव, बोन्दारेव नव्हे!"

"आणि नाव इवान नाही?"

"नाही, नाव इवानच आहे."

"श्शू ... !"

खोलीन हळू वल्हवू लागला. बहुधा किनारा जवळ आला असावा. मी डोळे दुखेपर्यंत अंधारात ताणून पहात होतो. पावसाच्या झिमझिमीत फक्त प्रकाश शलाकांचा फिकट उजेड दिसत होता.

आम्ही जेमतेम पुढे सरकत होतो. आणखी एक क्षण उलटला आणि होडी वाळूवर खरचटली. खोलीनने चपळाईने वल्ही खाली ठेवली, तो पाण्यात उतरला आणि होडीची मागील बाजू धरून तिला किनाऱ्याकडे ओढत नेले.

दोन मिनिटेपर्यंत आम्ही जीव मुठीत धरून कानोसा घेतला. पावसाचे थेंब पाण्यावर, जमिनीवर आणि एव्हाना ओल्याचिप्प बनलेल्या आमच्या झूलीच्या रेनकोटांवर मंदपणे टपटपताना ऐकू येत होते. मला खोलीनचा संथ श्वासोच्छ्वास ऐकू येत होता आणि स्वतःच्या काळजाची धडधडसुद्धा ऐकू येत होती. आश्चर्य म्हणजे कसलाही आवाज, बोलणे अथवा

खुसपूस आम्हाला ऐकू आली नाहीत. खोलीन माझ्या अगदी कानाशी म्हणाला:

"इवान आहे तिथंच राहील. तू उतर आणि होडी धर..."

तो अंधारात नाहीसा झाला. मी सावधपणे झूलीच्या रेनकोटामधून सरपटत बाहेर पडलो, वालुकामय किनाऱ्याच्या पाण्यात उतरलो, टॉमीगन सावरली व होडीची मागची बाजू पकडली. मुलगा उठला आणि माझ्याशेजारी होडीत उभा राहिल्याचे मला जाणवले.

"बैस. आणि रेनकोट अंगावर घे," त्याचा हात चाचपत मी दबत्या आवाजात म्हणालो.

"आता काही फरक पडत नाही," किंचित ऐकू येईल अशा आवाजात तो उत्तरला.

अचानक खोलीन उगवला आणि जवळ येऊन आनंदाने पुटपुटला:

"सगळं ठीक! किनारा मोकळा आहे!"

असे आढळले की, ज्या झुडुपांमध्ये आम्ही होडी लपवून ठेवणार होतो, ती जागा नदीच्या प्रवाहापासून अवघ्या तीस पावलांच्या अंतरावर होती.

थोड्या अवधीत होडी लपविण्यात आली आणि आम्ही वाकून, अधूनमधून थबकत, कानोसा घेत, चोरपावलांनी जाऊ लागलो. जेव्हा जवळच प्रकाश



शलाका उडायची, तेव्हा आम्ही वाळूवर उंचवटयाच्या आड पालथे पडत होतो व मढयाप्रमाणे निपचित रहात होतो. मी तिरप्या नजरेने मुलाकडे पहायचा – पावसामुळे त्याचे कपडे काळपट बनले होते. मी आणि खोलीन परतल्यानंतर कपडे बदलू शकणार होतो, पण तो...

खोलीनने अचानक चाल मंद केली आणि मुलाचा दंड पकडून तो उजवीकडे पाण्यापाशी गेला. समोर वाळूवर काही आकृती दिसू लागल्या होत्या. "आमच्या टेहळयांची प्रेते," मी तर्क केला.

"काय आहे ते?" मुलाने हलक्या आवाजात विचारले.

"जर्मन!" खोलीन पटकन दबत्या आवाजात उत्तरला आणि त्याने मुलाला घाईने पुढे नेले. "आपल्या किनाऱ्यावरच्या नेमबाजांनी त्यांना टिपलं!"

"हलकट साले! स्वतःच्या माणसांचेसुद्धा कपडे काढून घेतात!" प्रेतांकडे पहात मुलगा तिरस्काराने पुटपुटला.

मला भासत होते की, आम्ही अनंत काळपर्यंत चालत होतो आणि यापूर्वी केव्हाच इच्छित स्थळी पोहोचायला हवे होते. पण मला आठवण झाली की, जेथे होडी लपविली होती त्या झुडुपांपासून ते

ह्या प्रेतांपर्यंतचे अंतर फक्त तीनशे मीटरच्या आसपास होते. आणि खिंडीपर्यंत पोहोचायला अजून एवढेच अंतर कापणे आवश्यक होते.

लौकरच आम्ही आणखी एका प्रेताला ओलांडून गेलो. ते पूर्ण कुजले होते. दूरवरून त्याचा दुर्गंध जाणवत होता. आमच्या पाठीशी पावसाळी आकाशात डाव्या किनाऱ्यावरून परत ट्रेसर गोळयांची फैर उडाली. खिंड जवळपास कुठेतरी होती. पण ती आम्हाला दिसत नव्हती. तिच्यावर ते प्रकाशशलाका उडवत नव्हते. बहुधा तेथे खाली सर्वत्र सुरुंग पेरलेले होते आणि खिंडीच्या पूर्ण कडेशी खंदकांवर कडक गस्त होती. इथे कुणीही घुसायचे धाडस करणार नाही, अशी बहुधा जर्मनांची खात्री होती.

जो ह्या खिंडीत सापडेल त्याच्या दृष्टीने ही खिंड चांगला सापळा होती. पण मुलगा तिच्या-मधून कुणाच्याही नजरेस न पडता निसटेल, ह्यावर आमची सगळी मोहीम बेतलेली होती.

अखेरीस खोलीन थांबला व आम्हाला खाली बसण्याची खूण करून पुढे गेला.

लौकरच तो परतला आणि हलक्या आवाजात त्याने आज्ञा केली:

"माझ्या पाठोपाठ चला!"

9-207

आम्ही आणखी तीस पावले पुढे सरकलो आणि उंचवटयाआड उकीडवे बसलो.

"खिंड आपल्या अगदी समोर आहे!" अंगरख्याची बाही सरकवून खोलीनने घड्याळावरील चमकते आकडे पाहिले व मुलाला उद्देशून तो पुटपुटला: "आपल्यापाशी आणखी चार मिनिटं आहेत. तू कसा काय आहेस?"

"सगळं ठीक."

काही काळपर्यंत आम्ही अंधारात कानोसा घेत बसलो. प्रेतांचा आणि दमट वातावरणाचा वास पसरला होता. आमच्या उजव्या बाजूस तीन मीटर अंतरावर वाळूवर पडलेले प्रेत खोलीनला दिशा धरण्यास उपयोगी पडलेले होते.

"आता मी चलतो," मुलगा हलकेच म्हणाला.

"मी तुला पोचवायला येतो," अचानक खोलीन पुटपुटला. "खिंडीमधून. थोडं अंतर."

आमच्या योजनेत असे नव्हते!

"नाही!" मुलाने विरोध केला. "एकटाच जातो! तू मोठा आहेस. तुला ते नेमका टिपतील!"

"मी जाऊ का?" अनिश्चित स्वरात मी विचारले.

"फक्त खिंडीमधून," खोलीन विनवणीच्या आवाजात पुटपुटला. "तिथं चिकणमाती आहे – तुझे ठसे उमटतील. मी तुला उचलून नेतो!"

"मी सांगितलं ना!" निग्रही स्वरात संतापून मुलगा म्हणाला. "मी एकटाच जाणार!"

त्याची छोटी, हडकुळी आकृती माझ्याशेजारी उभी होती व त्याच्या जुनाट पोषाखात तो कुडकुडत होता असे मला भासले. कदाचित मला केवळ भास झाला असावा...

"पुन्हा भेटेपर्यंत," सावकाशपणे तो खोलीनला म्हणाला.

"पुन्हा भेटेपर्यंत! (मला जाणवले की, त्यांनी एकमेकांना मिठी मारली व खोलीनने त्याचा पापा घेतला.) मुख्य म्हणजे सांभाळून रहा! स्वतःला जप! जर आम्ही चढाई केली, तर फ्योदरोवकाला आमची वाट पहा!"

"पुन्हा भेटू," आता मुलगा मला म्हणाला.

"पुन्हा भेटू!" गलबलत्या काळजाने मी पुटपुटलो. अंधारातच मी त्याचा छोटा पंजा चाचपून पकडला आणि घट्ट दाबला.

त्याचा पापा घ्यावा असे मला फार वाटत होते, पण चटकन निर्णय होत नव्हता. ह्या क्षणाला माझी फार चलबिचल झाली. सहा दिवसांपूर्वी मी चुकून "अच्छा" म्हणून कायमचा निरोप बोललो होतो तसे ह्यावेळी घडू नये म्हणून स्वतःशी दहा वेळा "पुन्हा भेटू" असे म्हणत राहिलो होतो.

आणि त्याचा पापा घेण्याचा मी निर्णय करण्यापूर्वीच तो आवाज न करता अंधारात नाहीसा झाला.

७

मी आणि खोलीन नदीतीराजवळच्या पुढे आलेल्या उंचवट्याआड दडून एकाग्रतेने कानोसा घेत होतो. पावसाची झिमझिम सतत चालू होती. शरदातील तो थंडगार पाऊस कधीच थांबणार नाही असे भासत होते. नदीच्या पाण्यामधून चावरा दमटपणा उमटत होता.

आम्ही एकटे राहिल्याला चार मिनिटे उलटून गेली होती आणि मुलगा ज्या दिशेने गेला होता, त्या दिशेने पावलांचा व घोगऱ्या आवाजातील संभाषणाचा आवाज ऐकू आला.

"जर्मन!"

खोलीनने माझा खांदा आवळला, पण मला इशारा देण्याची गरज नव्हती. त्याच्याआधी मी आवाज ऐकला होता. माझ्या टॉमीगनचा खटका उघडून आणि हातात ग्रेनेड पकडून मी सज्ज होतो.

पावलांचा आवाज जवळ आला. अनेक लोकांच्या पायांखाली रपरपणारा चिखल स्पष्ट ऐकू येत होता.

माझे तोंड कोरडे पडले होते आणि काळजाचे ठोके धाडधाड पडत होते.

«Verfluchtes Wetter! Hohl es der Teufel...»*

«Halte's Maul, Otto!.. Links Halten!..»**

ते आमच्या इतक्या जवळून गेले की, चिखलाचे थंड शिंतोडे माझ्या तोंडावर उडाले. क्षणानंतर, प्रकाश शलाकेच्या उजेडात त्यांच्या पाठमोऱ्या आकृती पावसाच्या झिरझिरीत पडद्यामधून आम्हाला दिसल्या. पोलादी शिरस्त्राणे घातलेल्या त्या उंच आकृतींनी (किंवा मी मान वर करून पहात असल्यामुळे मला त्या उंच भासल्या) मी व खोलीनने घातलेल्या खिळयांच्या बुटांप्रमाणे अवजड बूट घातलेले होते. त्यांच्यापैकी तिघांनी मेणकापडे पांघरली होती व चौथ्याचा लांब रेनकोट पावसात चमकत होता. त्याने कमरेला आवळलेल्या पट्ट्यात पिस्तूलाची चामड्याची पिशवी लटकावलेली होती. त्यांच्या खांद्यांवरून टॉमीगन लटकत होत्या.

ते चौघे होते – एस् एस् रेजिमेंटच्या पहाराचौकीवरील गस्तवाले. जर्मन सेनेचे लढाऊ गस्तवाले. त्यांच्या जवळून आत्ताच गोमेलचा बारा वर्षांचा

* "भिकारडी हवा! अगदी सैतानी..." (जर्मन) – ले.

** "जीभ आवर, ओट्टो!.. डावीकडं रहा!.." (जर्मन) – ले.

मुलगा इवान बूस्लोव निसटून गेला होता, ज्याचा उल्लेख आमच्या टेहळया-खात्याच्या फायलींमध्ये बोन्दारेव नावाने केला जात होता.

जेव्हा शलाकांच्या थरथरत्या उजेडात आम्ही त्यांना पाहिले, तेव्हा ते थांबले होते व आमच्यापासून दहा पावलांच्या अंतरावर पाण्यात उतरण्याच्या बेतात होते. अंधारात त्यांनी वाळूवर मारलेल्या उडया ऐकू आल्या होत्या. नंतर ते ज्या दिशेला चालू लागले होते, तिकडेच आम्ही लपवून ठेवलेली होडी होती.

खोलीनपेक्षा माझी अवस्था जास्त अवघड होती. मी टेहळया नव्हतो, युद्धाच्या पहिल्या महिन्यांपासून लढत होतो आणि शस्त्रसज्ज शत्रूला नजरेसमोर पाहताच सवयीनुसार झुंजीची खुमखुमी उसळून येत होती. शत्रूला त्याच क्षणी ठार मारण्याची माझी पहिली स्वाभाविक ऊर्मी होती! एका फैरीत सर्वांना लोळवावेसे वाटत होते! "त्यांना ठार मारायचे!" मी टॉमीगन सरसावली तेव्हा माझ्या डोक्यात ह्याविना दुसरा विचार नव्हता. पण माझ्यासाठी खोलीन विचार करीत होता. अंधारात त्याला माझ्या हाल-चालींचा अंदाज आला आणि त्याने माझा दंड जोराने गच्च आवळला. भानावर येऊन मी टॉमीगन खाली सोडली.

“त्यांना होडी सापडणार!” त्यांची पावले दूर जाताच दंड चोळत मी दबत्या आवाजात म्हणालो.

खोलीन गप्प होता.

“काहीतरी केलं पाहिजे,” किंचित काळ स्तब्ध राहिल्यानंतर परत मी चिंतेने पुटपुटलो. “जर त्यांना होडी सापडली...”

“जर!..” संतापाने माझ्या तोंडावर गरम श्वासाचा भपकारा खोलीनने सोडला. त्याने माझे सहज नरडे दाबले असते ह्याची मला जाणीव झाली. “आणि त्यांनी पोराला पकडलं तर?! त्याला एकट्याला टाकायचा तुझा विचार आहे?.. तू नामर्द भेकड आहेस अथवा नुसताच मूर्ख आहेस?”

“मूर्ख,” विचार करून मी पुटपुटलो.

“बहुधा तू मानसिक रोगी आहेस,” काहीशा विचारमग्नपणे खोलीन म्हणाला. “युद्ध संपल्यावर तुला उपचार करून घेतले पाहिजेत...”

मी कान देऊन ऐकत होतो, आमची होडी सापडताच जर्मनांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या उद्गारांची कोणत्याही क्षणी अपेक्षा करीत होतो. आमच्या डाव्या अंगाला एक मशिनगन कडकडली. तिच्या पाठोपाठ दुसरी थेट आमच्या डोक्यावर वाजली व परत निर्माण झालेल्या शांततेत पावसाची संथ झिमझिम ऐकू येऊ लागली. सबंध किनाऱ्यावर

अधूनमधून प्रकाश शलाका उडत होत्या. त्या उजळत, फुस्स आवाज करीत आणि जमिनीवर पोहोचण्यापूर्वीच विझून जात.

प्रेतांचा ओकारी आणणारा घाणेरडा वास काही कारणामुळे आणखीच उग्र बनला होता. मी थुंकलो आणि तोंडाने श्वास घेण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

धूम्रपान करण्याची मला अनावर इच्छा झाली होती. यापूर्वी आयुष्यात कधीही धूम्रपानाची एवढी तीव्र इच्छा झाली नव्हती. पण मी एकच करू शकत होतो – पाकीटातून एक सिगारेट उपसायची व बोटांमध्ये तिला चुरगाळून हुंगायचे.

लौकरच आम्ही चिप्प भिजलो होतो आणि थंडीमुळे कुडकुडत होतो. पाऊस सतत कोसळत होता.

"खिंडीत चिकणमातीची जमीन आहे, नतद्रष्ट साली!" अचानक खोलीन पुटपुटला. "आत्ता जर धो धो पाऊस कोसळला तर छान सगळे ठसे धुवून जातील ..."

त्याचे विचार सतत मुलाशी गुंतलेले होते आणि खिंडीतील चिकणमातीवर पावलांचे ठसे राहतील म्हणून तो चिंताक्रांत बनला होता. मला जाणवले की, चिंता करण्यास त्याच्यापाशी सबळ कारण होते. जर जर्मनांना त्या आगळया, लहान पावलांच्या

ताज्या ठशांचा किनाऱ्यापासून त्यांच्या पुढच्या आघाडीपर्यंत मागोवा लागला असता, तर त्यांनी इवानला निश्चित हुडकून पकडला असता. कदाचित कुत्र्यांची मदत ते घेतील. लोकांना पकडण्यासाठी एस् एस् रेजिमेंटांमध्ये खास शिकवून तयार केलेले भरपूर कुत्रे होते.

एव्हाना मी सिगारेट चघळत होतो. त्यात आनंद मुळीच नव्हता, पण तरीही चघळत होतो. खोलीनला चघळण्याच्या आवाजाची चाहूल लागली असावी. त्याने कुतूहलाने विचारले:

"तू काय करतो आहेस?"

"सिगारेट ओढावीशी वाटतेय – जीव कासावीस झालाय!" उसासत मी म्हणालो.

"आईकडं जावंसं नाही वाटत?" खोलीनने खवटपणे विचारले. "मला स्वतःला आईकडं जावंसं वाटतंय! वाईट नाही, काय?"

तशा ओल्याचिप्प अवस्थेत, थंडीत कुडकुडत, आणखी वीस मिनिटेपर्यंत आम्ही कानोसा घेत थांबलो. पाठीवर बर्फाचा दाब द्यावा तसा सदरा घट्ट चिकटला होता. पावसाचे हळूहळू हिमवर्षावात रूपांतर घडले होते. मऊ, ओले हिमकण भिरभिरत पडत होते. वाळूवर पांढरी चादर पसरली जात होती व अनिच्छेने वितळत होती.

10-207

“मला वाटतं, तो निसटला,” अखेरीस खोलीन सुटकेचा निःश्वास टाकीत म्हणाला व वर उठला.

किनाऱ्याच्या उंच बांधाला लगटून आम्ही होडीकडे निघालो. अधूनमधून थांबत कानोसा घेत होतो. जर्मनांना होडी सापडली होती आणि आमच्यावर झडप घालण्यासाठी ते झुडुपात लपून बसले होते, अशी माझी खात्री झाली होती. पण ह्याबाबत खोलीनशी मी बोललो नव्हतो: तो माझी टिंगल करील अशी भीती वाटत होती.

किनाऱ्यालगत अंधारातून सरपटत जात आम्ही आमच्या टेहळ्यांच्या प्रेतांपाशी पोहोचलो. तेथून पुढे पाच पावले गेलो न गेलो तोच खोलीन थांबला, माझ्या बाहीला पकडून स्वतःकडे खेचत तो माझ्या कानात पुटपुटला:

“इथंच थांब! मी होडी घेऊन येतो. दोघांनी एकदम धोका पत्करायचं कारण नाही. मी होडी घेऊन आलो म्हणजे जर्मन भाषेत मला हाक मार. मात्र अगदी हळू आवाजात! जर मी संकटात सापडलो, तर गोंगाट माजेलच. तेव्हा पोहून पली-कडच्या तीराला जा. आणि तासाभरानंतर जर मी आलो नाही, तर पोहून पलीकडं जा. तू इकडून तिकडं पाच वेळा पोहू शकतोस ना?” तो हसून म्हणाला.

“होय,” कापऱ्या आवाजात मी होकार दिला. “जर तुला त्यांनी जखमी केलं तर?”

“ती तुझी चिंता नाही. विचार कमी कर.”

“किनाऱ्यावरून होडीकडं जाण्यापेक्षा नदीमधून पोहत जाणं जास्त चांगलं ठरेल,” मी काहीशा अनिश्चितपणे म्हणालो. “मी जातो...”

“मी कदाचित तसंच करणार आहे... पण काही घडलंच तर तू नाक खुपसू नको! जर तुझं बरं-वाईट झालं, तर आमची चामडी सोलून काढतील. समजलं?”

“हो. पण जर...”

“काही ‘जर-तर’ नाही!.. तू चांगला पोरगा आहेस, गाल्सेव,” तो अचानक पुटपुटला, “पण मानसिक रोगी. आणि आमच्या कामात ही सर्वांत भयानक गोष्ट...”

तो अंधारात निघून गेला व मी वाट पहात बसलो. ती छळवादी प्रतीक्षा किती काळ चालली कोण जाणे: मी एवढा गारठलो होतो आणि एवढा बेचैन होतो, की घड्याळावर नजर टाकण्याचेही भान उरले नव्हते. किंचितही आवाज न करण्याची दक्षता घेत मी हात-पाय हलवून अंगात ऊब आणण्याचा प्रयत्न केला. अधूनमधून पूर्ण स्तब्ध बसत होतो आणि कानोसा घेत होतो.

अखेरीस पाण्यावर वल्ह्याचे सपकारे बसल्याचा मंद आवाज मला ऐकू आला व तोंडावर हातांची ओंजळ धरीत मी जर्मनमध्ये दबत्या आवाजात म्हणालो :

"थांब ... थांब ..."

"हळू, सैताना! ये इकडं ..."

सावधपणे मी काही पावले टाकली आणि माझ्या बुटांमध्ये थंडगार पाणी घुसले, माझ्या पायांना बर्फाळ मगरमिठी बसली.

"तिथं खिंडीत शांतता आहे?" सर्वप्रथम खोलीनने प्रश्न केला.

"हो."

"पाहिलंस, आणि तू घाबरला होतास!" समाधानाने तो पुटपुटला. "होडीच्या वरामीकडून बैस," माझ्याकडून टॉमीगन घेत त्याने हुकूम केला आणि मी होडीत चढताच त्याने प्रवाहाच्या विरुद्ध वल्ही मारायला आरंभ केला.

होडीच्या मागील बाजूस बसताच मी पायांमधून बूट खेचून काढले व त्यांच्यातील पाणी बाहेर ओतले.

हिमवर्षाव जोरात चालू होता आणि मोठमोठे जाड हिमकण पाण्यावर पडताच वितळत होते. डाव्या किनाऱ्यावरून परत ट्रेसर गोळया उडाल्या.

ती फैर थेट आमच्या डोक्यांवरून उडत गेली. एका बाजूला वळायला पाहिजे होते, पण खोलीन अजूनही वरच्या प्रवाहाकडे होडी वल्हवीत होता.

"तू कुठं चाललास?" न समजून मी विचारले.

उत्तर न देता तो जोरजोराने वल्ही मारीत राहिला.

"कुठं चाललोय आपण?"

"घे, अंगात ऊब आण!" वल्ही बाजूला ठेवीत त्याने माझ्या हाती छोटी चपटी बाटली कोंबली.

गोठलेल्या बोटांनी मोठ्या कष्टपूर्वक मी झाकण उघडले आणि घुटका मारला – वोदकाचा जळजळीत स्पर्श घशाला सुखद वाटला, अंगात ऊब आली, पण पूर्वीप्रमाणेच मी अजून कुडकुडत होतो.

"सगळी पिऊन टाक!" वल्ही किंचित हलवीत खोलीन पुटपुटला.

"आणि तू?"

"मी किनाऱ्यावर पिईन. पाजशील?"

मी आणखी एक घुटका मारला आणि बाटली संपल्याची खेदपूर्वक जाणीव झाल्यानंतर तिला खिशात कोंबले.

"अजून तो पार गेला नसेल तर?" अनपेक्षितपणे खोलीन म्हणाला. "कदाचित अजून गुपचूप पडून

असेल ... वाट पहात असेल ... ह्या क्षणी त्याच्यापाशी असावं असं मला फार फार वाटतंय!"

आम्ही परत का जात नव्हतो याचा मला उलगडा झाला. आम्ही थेट खिंडीच्या समोर होतो आणि काही "विपरीत" घडलेच असते, तर शत्रूच्या किनाऱ्यावर परत उतरून मुलाच्या मदतीला जाऊ शकलो असतो. तेथून, अंधारामधून, ठराविक काळानंतर मशिनगनच्या फैरी उडत होत्या. होडी-पाशी जेव्हा गोळया सुसाटत गेल्या आणि पाण्यावर सपासप आपटल्या, तेव्हा माझ्या अंगावर शहारे उमटले. ओल्या बर्फाच्या पडद्यामधून तशा अंधारात आम्ही जर्मनांच्या दृष्टीस पडणे कदाचित अशक्य होते, पण जेथे कुठलाही आसरा घेता येत नव्हता अशा नदीच्या पाण्यावरील उघडचा जागेत शत्रूच्या गोळीबाराला निमूट तोंड देणे तेवढेच अवघड होते. मला हुरूप आणण्यासाठी खोलीन पुटपुटला:

"अशा गोळयांना केवळ मूर्ख किंवा भित्रा बळी पडू शकेल! लक्षात ठेव!.."

कातासोनोव मूर्ख नव्हता अथवा भित्रा नव्हता. ह्याबाबत मला मुळीच संदेह नव्हता, पण खोलीनला मी काहीही बोललो नाही.

"तुझी मेडिकल ऑफीसर वाईट नाही!" थोडा वेळ थांबून, माझे चित्त दुसरीकडे वळविण्याच्या

इराद्याने तो म्हणाला.

"वाईट ना-ही," कडकडत्या दातांमधून मी म्हणालो. पण मेडिकल ऑफीसरबद्दल त्यावेळी माझ्या मनात मुळीच विचार नव्हते. त्याऐवजी उपचार केंद्राचा जमिनीखालील उबदार निवारा व तेथील चुलाणा माझ्या नजरेसमोर येत होते. फार सुरेख बिडाचा चुलाणा होता!..

ज्याची सतत अपेक्षा करीत होतो त्या डाव्या किनाऱ्यावरून आणखी तीनदा ट्रेसरच्या रेषा उमटल्या. किनारा आम्हाला परत बोलावत होता आणि आम्ही अजूनही उजव्या किनाऱ्याजवळच्या पाण्यात घुटमळत होतो.

"मला वाटतं, नक्की गेला," अखेरीस खोलीन म्हणाला आणि त्याने वल्ही जोरात मारून होडी वळविली.

अंधारात तो आश्चर्यकारकरीत्या अचूक दिशेने होडी वल्हवीत होता. उजव्या फळीवर माझ्या बटालियनचा मशिनगनचा मोठा खंदक जेथे होता, त्यापासून जवळच आम्ही किनाऱ्याला लागलो. खंदकात पहारेकऱ्यांच्या पलटणीचा कमांडर होता.

ते आमची वाट पहात होते. त्यांनी हळू आवाजात, पण जरबपूर्वक आम्हाला हटकले: "थांब! कोण आहे?.." मी परवलीचा शब्द उच्चारला.

माझा आवाज त्यांनी ओळखला आणि क्षणार्धात आम्ही किनाऱ्यावर पाय ठेवले.

मी पुरता खलास झालो होतो आणि जरी सुमारे दोनशे ग्राम वोदका प्यायलो होतो, तरी पूर्वी-प्रमाणेच कुडकुडत होतो आणि माझे गोठलेले पाय कसेबसे पुढे ढकलत होते. दातांची कडकड थोपवि-ण्याचा प्रयत्न करीत मी होडीला ओढून आणून झाकून ठेवण्याचा हुकूम दिला आणि स्क्वाड कमांडर झूयेवच्या सोबतीने आम्ही किनाऱ्याजवळून चालू लागलो. झूयेव माझा आवडता होता, वृत्तीने काही-सा खुशालचेंडू होता, पण कमालीचा निर्भय सार्जंट होता. तो सर्वांत पुढे चालत होता.

"कॉम्रेड सीनियर लेफ्टनंट, कैदी कुठाय?" मागे वळून अचानक त्याने उल्हसित स्वरात विचारले.

"कुठला कैदी?"

"इथं म्हणत होते, तुम्ही कैदी आणायला गेला होतात!"

माझ्यापाठी चालणारा खोलीन मला धक्का मारून झूयेवकडे पुढे गेला.

"तुझी जीभ तोंडातच ठेव! समजलं?" प्रत्येक शब्द ठासून उच्चारत खोलीन म्हणाला. मला भासले की, त्याने आपला भक्कम पंजा खाडदिशी झूयेवच्या खांद्यावर आपटला आणि कदाचित त्याची

कॉलरही खेचली. हा खोलीन कमालीचा धोपटमार्गी आणि शीघ्रकोपी होता. तो असे वागू शकायचा. "तुझी जीभ तोंडातच ठेव!" धमकीवजा आवाजात तो परत म्हणाला. "आणि दातांमध्ये आवळून ठेव! तुझ्या दृष्टीनं ते जास्त चांगलं ठरेल!.. आता चौकीवर परत जा!.."

झूयेव काही पावलांच्या अंतरावर मागे राहिला असेल-नसेल, तेवढ्यात खोलीन कठोरपणे आणि मुद्दामच मोठ्यांदा म्हणाला:

"तुझ्या बटालियनमध्ये फार वटवटी माणसं आहेत, गाल्त्सेव! आमच्या कामात ही सर्वांत भयानक गोष्ट..."

अंधारात त्याने माझ्या हातात स्वत:चा हात अडकवला, माझा कोपर दाबला व उपहासाच्या स्वरात तो पुटपुटला:

"तुझी तरी कमालच! स्वत:ची बटालियन सोडून पलिकडच्या तीरावर कैदी आणायला जातोस! वा रे शिकारी!"

जमिनीखालील निवाऱ्यात उखळी तोफांच्या जादा दारुच्या बारांच्या मदतीने आम्ही चुलाणा सणसणीत तापविला, संपूर्ण नागडे झालो आणि टॉवेलांनी अंगांना खसखसून चोळून काढले.

कोरडे कपडे अंगावर चढवून खोलीनने खांद्यावर कोट टाकला व टेबलावर नकाशा पसरून तो एकाग्रतेने त्याचे निरीक्षण करू लागला. ज्या क्षणी तो निवाऱ्यात आला होता, त्याच क्षणी एकदम कोमेजला होता. त्याची मुद्रा अत्यंत थकलेली व चिंताग्रस्त दिसत होती.

मी टेबलावर खाद्यपदार्थ मांडले: मांसाचा डबा, डुकराची चरबी, खारवलेल्या काकड्या, पाव, ताक आणि वोदकाची बाटली.

"आत्ता त्याची परिस्थिती कशी आहे हे जर समजलं तर?!" खोलीन उठत अचानक उद्गारला. "तिथं कसं असेल?"

"काय झालं?"

"ते गस्तवाले – त्या किनाऱ्यावरचे – आणखी अर्ध्या तासानंतर यायला पाहिजे होते. समजलं?.. म्हणजे एक तर जर्मनांनी पहाऱ्याची वहिवाट बदलली, किंवा आमच्याकडून काहीतरी घोटाळा झाला. कोणत्याही परिस्थितीत पोराला स्वतःच्या प्राणांची किंमत मोजावी लागेल. आम्ही प्रत्येक मिनिटाचा काटेकोर हिशेब केला होता."

"पण तो निसटला. आपण कितीतरी वेळ थांबलो होतो – किमान तासभर. आणि सर्व शांत होतं."

"निसटला म्हणजे काय?" खोलीनने चिडून



विचारले. "तुला माहीत करून घ्यायची इच्छाच असेल तर सांगतो – त्याला पन्नासपेक्षा जास्त किलो-मीटर अंतर कापून जायचंय. त्यांपैकी पहाटेपर्यंत त्यानं वीस किलोमीटर तोडले पाहिजेत. आणि प्रत्येक पावलाला जर्मन भेटण्याची शक्यता आहे. कितीतरी अनपेक्षित गोष्टी घडू शकतील!.. जाऊं दे, बडबड करून काही फायदा नाही!.." त्याने टेबलावरून नकाशा उचलला.

"ओत!"

मी दोन भांड्यांमध्ये वोदका ओतली.

"भांडी एकमेकांवर आपटायला नकोत," एक भांडे उचलीत खोलीनने आधीच ताकीद दिली.

भांडी उचलून काही क्षण आम्ही मुकाट बसून राहिलो.

" अरे कातासोनीच, कातासोनीच ...", माझ्याकडे आठचा घालून पहात खोलीन सुस्कारला आणि तिखट आवाजात म्हणाला: "तुला काही वाटणार नाही! पण माझा त्यानं जीव वाचवलाय..."

त्याने एका दमात वोदकाचे भांडे रिकामे केले आणि काळ्या पावाचा तुकडा हुंगत मागणी केली:

" आणखी!"

मी स्वतःची वोदका पिऊन दुसऱ्यांदा ओतली: स्वतःला थोडीशी आणि त्याला भांडे भरून.

हाती भांडे घेऊन मुलाचे कपडे भरलेली सूटकेस जेथे होती त्या फळीकडे तो वळला व हळू आवाजात म्हणाला:

"तू परत यावास आणि पुन्हा कधी जाऊ नयेस, म्हणून. तुझ्या भविष्यकाळासाठी!"

आम्ही भांडी एकमेकांवर आपटली आणि वोदका पिऊन खायला सुरुवात केली. निःसंशयपणे ह्या क्षणाला आम्हा दोघांच्याही मनात मुलाबद्दलचे विचार होते. चुलाण्याच्या कडा व वरची बाजू लालभडक तापल्या होत्या. आम्ही परतलो होतो, उबदार जागेत सुरक्षित बसलो होतो. पण तो कुठेतरी शत्रूच्या फळ्यांमधून अंधारातून व बर्फातून सरपटत

चालला होता, दर पावलाला मृत्यूचा धोका त्याच्या मानेवर लटकत होता.

मुलांविषयी मला विशेष माया कधी वाटली नव्हती, पण हा मुलगा मला अत्यंत जवळचा आणि लाडका बनला होता. वस्तुतः मी फक्त दोनदाच त्याला भेटलो होतो. त्याचा विचार करताना माझ्या काळजात हमखास कळ उमटत होती.

मी त्यानंतर आणखी प्यायलो नाही. खोलीनने तिसरे भांडे मुकाट संपविले. लौकरच तो झिंगला आणि लालभडक, तारवटलेल्या डोळयांनी माझ्याकडे पहात खिन्नपणे बसला.

"दोन वर्षांपेक्षा जास्त काळ लढतो आहेस?" सिगारेट पेटवीत त्याने विचारले. "मीसुद्धा... पण इवानप्रमाणं समोर मृत्यू पाहिला नाही... तुझ्यापाठी बटालीयन, रेजिमेंट, आख्खी सेना... पण तो एकटा!" अचानक संतापून खोलीन ओरडला. "लहान पोर!.. आणि तुझा भिकारडा सुरा त्याला द्यायला कुरकुरलास!"

८

"मी कुरकुरलो!.." नाही, मला शक्य नव्हते. तो सुरा कुणालाही देण्याचा मला अधिकार नव्हता.

माझ्या मृत मित्राची ती एकमेव आठवण होती, त्याच्यामागे उरलेली एकमेव वस्तू होती.

पण मी शब्द पाळला होता. डिव्हिजनच्या ऑर्ड-नन्स वर्कशॉपमध्ये उरालचा एक वयस्क सार्जंट होता. गेल्या वसंतात त्याने कोस्त्याच्या सुऱ्याची मूठ बनवून दिली होती. आता मी त्याला नवा कोरा सुरा दिला होता व तशीच मूठ बनवून द्यायला सांगितले. मी केवळ विनंतीच केली नव्हती, तर युद्धात हस्तगत झालेली जर्मन उपकरणांची पेटी त्याला बहाल केली होती. मला त्या उपकरणांची गरज नव्हती, पण तो मात्र एखाद्या लहान मुला-प्रमाणे खूष झाला होता.

सुऱ्याची मूठ त्याने सुरेख बनविली होती. पात्यावरील खाचा आणि कोरलेली आद्याक्षरे सोडता कोस्त्याच्या सुऱ्यात व नव्या सुऱ्यात दुसरा काहीही फरक नव्हता. अशा सुरेख मुठीचा कमांडो सुरा मिळाल्यानंतर पोरगा किती खूष होईल, ह्याबद्दल मी मनोमन कल्पना करीत होतो. मला त्याचे मन समजले होते : मी माझ्या कुमारवयातून नुकताच बाहेर पडलो होतो.

खोलीनशी अगर लेफ्टनंट-कर्नल ग्र्याझनोवशी भेट होताच त्यांच्यापाशी हा सुरा देता यावा म्हणून मी सतत त्याला माझ्या कमरपट्ट्यात खोवून फिरत

होतो. इवानशी माझी परत भेट होईल अशी अपेक्षा करणे मूर्खपणाचे ठरले असते. आता तो कुठे होता? मला त्याबद्दल कल्पनाही करवत नव्हती, मात्र अनेकदा त्याची आठवण यायची.

दिवस धामधुमीचे होते. आमची डिव्हिजन झेपर नदी ओलांडत होती आणि माहिती खात्याच्या अहवालानुसार, "उजव्या तीरावर संपर्क विस्तृत करण्यात ती यशस्वी लढाया देत होती..."

सुऱ्याचा मी जवळजवळ वापर केला नव्हता. एवढे मात्र खरे, एकदा हातघाईच्या लढाईत हॅम्बुर्गच्या एका लठ्ठ्या कार्पोरलविरुद्ध जर मी त्या सुऱ्याला वापरले नसते, तर त्याने माझी खोपडी फोडली असती.

जर्मनांनी निकराने प्रतिकार केला होता. आठ दिवस आक्रमक चढाई केल्यानंतर आम्हाला बचावाचा पवित्रा घेण्याचा हुकूम झाला होता. तेव्हा नोव्हेंबरातील आरंभीच्या एका स्वच्छ, थंडीच्या दिवशी, क्रांतिदिनाच्या वाढदिवसाच्या जरा आधी, माझी लेफ्टनंट-कर्नल ग्याझनोवशी गाठ पडली.

मध्यम उंचीचे, भक्कम शरीराचे, मोठ्या डोक्याचे, ओव्हरकोट आणि केसाळ कानटोपी घातलेले, फिन्लंडच्या युद्धात जखमी झाल्यामुळे उजवा पाय किंचित फरफटत चालणारे लेफ्टनंट-कर्नल ग्याझनोव

रस्त्याच्या कडेशी फेऱ्या मारीत होते. माझ्या बटालियनमधील उरलेले लोक जेथे उभे होते, त्या राईच्या कडेपासून मी बाहेर येताच त्यांना दुरून ओळखले. आता मी पूर्ण हक्काने "माझी" बटालियन म्हणू शकत होतो, कारण नदी ओलांडण्याच्या आधीच माझी बटालियनच्या कमांडरपदी नेमणूक झाली होती.

झाडांच्या राईत पूर्ण शांतता होती. गोठलेल्या दंवाचे थर बसलेल्या पानांनी जमीन आच्छादली होती आणि घोड्यांच्या लीदीचा व मुताचा दर्प वातावरणात भरला होता. चढाईत ह्या विभागात कझाकांच्या तुकडीने भाग घेतला होता व राईत कझाकांनी तळ ठोकला होता. घोड्यांचा व गायींचा वास माझ्या लहानपणापासून धारोष्ण दुधाच्या व नुकत्याच भट्टीतून बाहेर काढलेल्या पावाच्या वासाशी नेहमी निगडित होता. आतासुद्धा मला माझ्या खेड्याची आठवण झाली, जेथे लहानपणी प्रत्येक उन्हाळ्यात मी आजीबरोबर रहात होतो. सुकल्या शरीराच्या त्या म्हातारीने माझ्यावर अमाप प्रेम केले होते. हे सगळे खरे तर नुकतेच घडून गेले होते, पण आता मला ते खूप खूप पूर्वीचे वाटत होते आणि युद्धापूर्वीच्या सर्व गोष्टींप्रमाणेच पुन्हा कधीही घडणार नव्हते असे भासत होते...

राईमधून बाहेर पडताच बालपणच्या स्मृती विरल्या. रस्त्यावर जर्मनांच्या मोटारींची गर्दी होती. काही जळल्या होत्या, काही मोडल्या होत्या, तर काही नुसत्याच टाकून दिलेल्या होत्या. ठार झालेले जर्मन रस्त्यावर व डबक्यांमध्ये वेगवेगळया अवस्थांमध्ये पडले होते. खंदक खणलेल्या मैदानात प्रेतांचे करडे ढीग सर्वत्र विखुरलेले दिसत होते.

रस्त्यावर, लेफ्टनंट-कर्नल ग्याझनोव यांच्यापासून पन्नास मीटर अंतरावर, त्यांचा शोफर व लेफ्टनंट-दुभाष्या, जर्मन चिलखती गाडीशी काहीतरी खटपटत होते. आणखी चौघे, ज्यांच्या पदांना मी ओळखू शकलो नाही, रस्त्याकडेच्या खंदकांची तपासणी करीत होते. लेफ्टनंट-कर्नल त्यांना काहीतरी ओरडून सांगत होते, पण वाऱ्यामुळे मला त्यांचे बोलणे ऐकू आले नाही.

मी जवळ गेलो तेव्हा ग्याझनोवनी त्यांचा देवीच्या वणांचा, काळसर, गुबगुबीत चेहरा माझ्याकडे वळविला व आश्चर्यमिश्रित आनंदाने ते ओरडले:

"तू जिवंत आहेस, गाल्त्सेव?"

"होय! दुसरा उपाय काय?" स्मित करीत मी म्हटले. "रामराम करतो."

"रामराम! जर जिवंत आहेस – रामराम!"

त्यांनी पुढे केलेला हात धरून मी दाबला,

आसपास नजर टाकली व ग्याझनोव यांच्याशिवाय कुणी माझे बोलणे ऐकत नाही अशी खात्री करून घेऊन म्हणालो :

"कॉम्रेड लेफ्टनंट-कर्नल, प्रश्न विचारायची परवानगी द्या : इवान परतला ?"

"इवान ?.. कुठला इवान ?"

"तो पोरगा, बोन्दारेव !"

"तो परत आला अथवा न आला, त्याच्याशी तुझा काय संबंध ?" ग्याझनोव नाराजीने म्हणाले आणि कपाळाला आठ्या घालून काळ्या, धूर्त डोळ्यांनी माझ्याकडे पहात राहिले.

"मी त्याला पलिकडच्या तीरावर घेऊन गेलो होतो ..."

"म्हणून काय झालं ? प्रत्येकाला आवश्यक तेवढंच माहीत असावं ! हा सैन्याचा नियम आहे आणि टेहळ्यांना तो विशेष लागू पडतो !"

"मी खाजगीरीत्या विचारत होतो ... माझी एक विनंती आहे. मी त्याला भेट द्यायची कबूल केलं होतं ..." ओव्हरकोटाची बटणे सोडून, पट्ट्यातून मी सुरा काढला व लेफ्टनंट-कर्नलांपुढे धरला. "कृपा करून त्याला द्या. तुम्हाला कल्पना नाही, त्याला हा सुरा फार पाहिजे होता !"

"मला माहीत आहे, गाल्त्सेव, सगळं माहीत

आहे!" सुस्कारा टाकीत लेफ्टनंट-कर्नल म्हणाले व सुरा हाती घेऊन त्यांनी न्याहाळला. "वाईट नाही. पण याहून चांगले बनवतात. त्याच्यापाशी असले किमान दहा सुरे आहेत. आख्खी पेटी भरलीय... काय करणार – नाद! वयच तसं! पोराकडून दुसरी काय अपेक्षा करायची!.. ठीक आहे... जर भेटला, तर देईन..."

"म्हणजे... तो... परत नाही आला?" अस्वस्थपणे मी विचारले.

"आला होता. पण गेला... स्वतः होऊन गेला..."

"असं कसं काय?"

लेफ्टनंट-कर्नलनी कपाळाला आठ्या घातल्या व गप्प राहून दूर कुठेतरी नजर लावली. मग खर्ज स्वरात हळूच ते म्हणाले:

"त्याला आम्ही प्रशिक्षण विद्यालयात पाठवायचं ठरवलं होतं आणि तो कबूल झाला होता. सकाळी कागदपत्र तयार व्हायचे होते, पण रात्रीच तो पसार झाला... मी त्याला दोषी ठरवू शकत नाही. त्याचं मन मला समजतं. ती फार मोठी कहाणी आहे आणि तुला माहीत असण्याचं कारण नाही..."

त्यांचा मोठा, देवीच्या वणांचा, कठोर आणि विचारमग्न चेहरा माझ्याकडे वळला.

"त्याच्यातला द्वेष जळून गेला नाही. त्याच्या जिवाला स्वस्थता नाही... कदाचित अजून परत येईल, बहुधा पार्तीझानांमध्ये सामील झाला असण्याची जास्त शक्यता आहे... तू त्याच्याबद्दल विसरून जा आणि पुढच्या काळात लक्षात ठेव: आघाडीपलिकडच्या माणसांबद्दल प्रश्न विचारू नकोस. त्यांच्याबद्दल जेवढी कमी चर्चा होईल, जेवढी कमी माणसं त्यांना जाणतील, तेवढं जास्त आयुष्य त्यांना लाभेल... त्याच्याशी केवळ योगा-योगानं तुझी भेट झाली आणि त्याच्याबद्दल माहिती करून घेणं – वाईट वाटून घेऊ नकोस – तुला मना आहे! तेव्हा पुढं ध्यानात ठेव: काहीही झालं नाही, तुला कुठलाही बोन्दारेव माहीत नाही, तू काही पाहिलं नाहीस आणि काहीही ऐकलं नाहीस. आणि कुणालाही तू नदीच्या दुसऱ्या तीरावर नेलं नाहीस! तेव्हा विचारायला प्रश्न नाहीत. समजलं?.."

...आणि पुढे मी विचारले नाही. आणि विचारणार तरी कुणाला? लौकरच एका टेहळणी मोहीमेत खोलीन ठार झाला. पहाटेपूर्वीच्या अर्धवट अंधारात त्याच्या टेहळया-गटावर जर्मनांनी झडप घातली होती व खोलीनचे दोन्ही पाय मशिनगनच्या फैरीत जायबंदी झाले. त्याने सर्वांना माघार घ्यायचा हुकूम

दिला, पण स्वत: मात्र अखेरच्या क्षणापर्यंत शत्रूला थोपवून धरत राहिला. जेव्हा त्याला शत्रूने पकडले, तेव्हा त्याने रणगाडाविरोधी ग्रेनेड फोडला... लेफ्टनंट-कर्नल ग्याझनोव यांची दुसऱ्या ठिकाणी बदली झाली आणि पुढे त्यांच्याशी माझी कधीही भेट झाली नाही.

पण लेफ्टनंट-कर्नलांच्या सल्ल्यानुसार इवानला विसरून जाणे अर्थातच मला शक्य झाले नाही. त्या छोट्या टेहळ्याची मला अनेकदा आठवण यायची, पण केव्हातरी त्याच्याशी भेट होईल अथवा त्याच्या दैवाबद्दल मला काही समजेल, असे मात्र कधीही वाटले नव्हते.

९

कोवेलजवळच्या लढाईत मी जखमी झालो व "मर्यादित सैनिक" बनलो. बिनलढाऊ कर्मचारी अथवा पिछाडीकडील सेवांमध्ये फक्त काम करण्यास मला परवानगी देण्यात आली. बटालियनचा आणि माझ्या डिव्हिजनचा मला निरोप घ्यावा लागला. युद्धाच्या अखेरच्या सहा महिन्यांमध्ये मी त्याच ब्येलोरूस्सियाच्या प्रथम आघाडीवर, पण दुसऱ्या सेनेत, टेहळणी विभागात दुभाष्या म्हणून काम करीत होतो.

जेव्हा बर्लिनची लढाई सुरू झाली, तेव्हा जर्मन दफतरखान्यांचा व कागदपत्रांचा कबजा घेण्याची कामगिरी सोपविलेल्या एका खास गटामध्ये माझी आणि आणखी दोन ऑफीसरांची नेमणूक करण्यात आली.

२ मे रोजी दुपारी तीन वाजता बर्लिन शरण आले. त्या ऐतिहासिक क्षणाला आमचा गट शहराच्या अगदी केंद्रभागी, प्रिन्स आल्ब्रेख्तस्ट्रासेवरील अर्धवट कोसळलेल्या इमारतीत होता. थोड्याच दिवसांपूर्वी त्या इमारतीत 'गेस्टापो'ची, राजकीय गुप्त पोलीसांची, मुख्य कचेरी हलविण्यात आली होती.

अपेक्षेप्रमाणे बहुसंख्य कागदपत्रांना पळवून नेण्यात अगर नष्ट करण्यात जर्मनांना यश आले होते. फक्त चौथ्या, सर्वांत वरच्या, मजल्यावर आमच्या माणसांना धड अवस्थेतील फायली व कार्डांनी भरलेली कपाटे सापडली. इमारतीत प्रथम घुसलेल्या टॉमीगनवाल्यांनी ही बातमी आनंदाने खिडक्यांमधून ओरडून सांगितली.

"कॉम्रेड कप्तान, आवारात मोटार भरून कागद आहेत!" रुंद खांद्यांच्या एका बुटक्या सैनिकाने धापा टाकीत मला येऊन सांगितले.

आता दगड-मातीचा खच पडलेल्या 'गेस्टापो'च्या प्रचंड आवारात डझनावारी अथवा शेकड्यांनी

मोटारी व लॉरी ठेवल्या जात होत्या. स्फोटांमध्ये उध्वस्त झालेल्या त्यातील काही मोटारी तेथे उरल्या होत्या. मी सभोवती नजर फिरवली: बंकर, प्रेते, बॉंबस्फोटांचे खड्डे, आवाराच्या कोपऱ्यात सुरुंग शोधण्याची उपकरणे घेतलेले सॅपर्स.

दरवाजापाशी गॅस-जनरेटरांची एक उंच लॉरी उभी होती. मागील फळी उघडी होती आणि आतमध्ये ताडपत्रीखाली झाकलेले काळया गणवेषातील एस्. एस्. ऑफीसरचे प्रेत व फायलींचे व्यवस्थित रचलेले जाडजूड गठ्ठे होते.

सैनिक धडपडत कसाबसा लॉरीत चढला व त्याने फायलींचे गठ्ठे कडेशी ओढून आणले. माझ्या सुऱ्याने फायलींवरच्या दोऱ्या मी कापल्या.

ते युद्धआघाडीवरील गुप्त पोलीसांचे कागदपत्र होते. 'केंद्र' सैन्य-गटाचे. १९४३-४४ च्या हिवाळयातील तारखा त्यांच्यावर होत्या. शासन "कृतीं" चे अहवाल, हस्तकांचे संदेश, झडतीचे हुकूम, ओळखपत्रांच्या नोंदी, वेगवेगळया पत्रांच्या आणि गुप्त अहवालांच्या प्रती, ठार मारल्या गेलेल्या व सूड घेतलेल्या, पकडल्या व न पकडल्या गेलेल्या, अशा सर्व प्रकारच्या लोकांच्या शौर्याच्या व भित्रेपणाच्या विविध कथा त्या कागदपत्रांमध्ये सामावल्या होत्या. माझ्या दृष्टीने त्या कागदपत्रांना विशेष

महत्त्व होते. मोझीर आणि पेत्रीकोव, रेचीत्सा आणि पीन्स्क – आमची युद्धआघाडी जेथून गेली होती, त्या गोमेल व पोलेस्ये जिल्ह्यांमधील परिचित ठिकाणे माझ्या नजरेसमोर उभी राहिली.

फायलींमध्ये नोंदींची खूप कार्डे व कागद होते: गुप्त पोलीसांनी शोध घेतलेल्या, पकडलेल्या आणि ठार केलेल्या माणसांबद्दलच्या त्रोटक माहितींनी भरलेले. काही कार्डांवर फोटो चिकटवलेले होते.

"कोण हा?" लॉरीत उभ्या असलेल्या सैनिकाने लठ्ठ आखूड बोट कागदांमध्ये खुपसत मला विचारले: "कॉम्रेड कप्तान, कोण हा?"

उत्तर न देता काहीशा विमनस्कपणे मी कागद चाळत होतो, फायलींमागून फायली धुंडाळत होतो, पाऊस आम्हाला भिजवत होता ह्याचे मला भान नव्हते.

होय, आमच्या विजयाच्या त्या महान दिवशी बर्लिनमध्ये थंडगार पावसाची सतत झिमझिम चालू होती व आकाश ढगाळलेले होते. केवळ संध्याकाळी आकाशातील काळे मेघ बाजूला सरले व धुक्यामधून सूर्य डोकावला.

दहा दिवसांच्या रणधुमाळीनंतर आता शांततेचे साम्राज्य पसरले होते. अधूनमधून कुठेतरी एखादी टॉमीगन कडकडत होती. शहराच्या मध्यभागी आगी



धडाडल्या होत्या. शहराबाहेर बागांमध्ये फुललेल्या नीलपुष्पींचा घमघमाट सर्व वासांवर मात करीत होता, पण इथे जळका दर्प वातावरणात भरला होता व भग्न अवशेषांवरून काळ्या धुराचे लोट उसळत होते.

"सगळं इमारतीत घेऊन जा!" गठ्ठ्यांकडे बोट दाखवीत अखेरीस सैनिकाला मी हुकूम केला व हातातील फाईल यांत्रिकपणे उघडली. आत नजर टाकताच माझ्या काळजाचा ठोका थांबला: फॉर्मवर चिकटवलेल्या फोटोमधून इवान बूस्लोव माझ्याकडे पहात होता...

गालांची हाडे वर आलेला आणि रुंद डोळ्यांच्या ठेवणीचा त्याचा चेहरा मी ताबडतोब ओळखला. दोन डोळ्यांमध्ये एवढे अंतर असलेली दुसरी एकही व्यक्ती मी आजवर पाहिली नव्हती.

त्याच्या कपाळावर आठ्या होत्या. द्नेपरच्या किनारी जमिनीखालील निवाऱ्यात आमच्या पहिल्या भेटीच्या वेळी त्याच्या कपाळावर अशाच आठ्या होत्या. त्याच्या डाव्या गालावर जखमेचा काळा डाग दिसत होता.

फोटो चिकटवलेल्या फॉर्मवर माहिती भरलेली नव्हती. खचल्या मनाने मी तो उलटला. खाली टाचणी लावलेला एक टंकलिखित कागद होता:

दुसऱ्या जर्मन सेनेच्या रणांगणावरील गुप्त पोलीस-प्रमुखाकडून पाठवलेल्या खास अहवालाची ती प्रत होती.

"क... शहर लूनीनेत्स. २६-१२-४३. गुप्त रणांगणावरील 'केंद्र' गटाच्या. पोलीस-प्रमुखांना...

"...ह्या वर्षाच्या २१ डिसेंबर रोजी, २३ व्या सेना कोअरच्या प्रदेशात, रेलमार्गाच्या प्रतिबंधित भागात, दोन तासांच्या निरीक्षणानंतर, पूरक पोलीस विभागाच्या येफीम तीत्कोवने १०-१२ वर्षांच्या रशियन शाळकरी मुलाला पकडले. हा मुलगा बर्फात निजून कालीन्कोविची-क्लीन्स्क भागातून जाणाऱ्या लष्करी आगगाड्यांचे निरीक्षण करीत होता.

"अटकेनंतर अनामिकाने (नंतर सिद्ध झाले की, स्थानिक रहिवासी मारीया सेमिनाला त्याने स्वतःचे नाव "इवान" असल्याचे सांगितले होते) जोरदार प्रतिकार केला, तीत्कोवच्या हाताला तो चावला व केवळ तेथे हजर असलेल्या कार्पोरल विन्त्स याच्या मदतीमुळेच त्या मुलाला रणांगणावरील पोलीसांकडे नेणे शक्य झाले...

"...असे सिद्ध झाले की, २३ व्या कोअरच्या प्रदेशात "इवान" चे अनेक दिवस वास्तव्य होते... तो भीक मागत फिरत होता... पडवीमधील धान्य झोडपण्याच्या ओसाड कोठारात झोपत होता. त्याच्या

हातांना व पायांच्या बोटांना हिमबाधा झाली होती, काही भाग सडला होता ...

"झडतीमध्ये "इवान" पाशी खिशांमध्ये हातरुमाल व ११० (एकशे दहा) व्याप्त प्रदेशातील मार्क मिळाले. तो पार्तीझानांपैकी असल्याचा अथवा हेरगिरी करीत असल्याचा कोणताही सबळ पुरावा सापडला नाही ... ठळक खुणा: पाठीवर मध्यभागी मोठा जन्मखुणेचा डाग, उजव्या खांद्यावर – गोळीच्या जखमेचा वण ...

"मेजर वॉन बिस्सिंग, ओबेर-लेफ्टनंट क्ल्याम्त आणि सार्जंट-मेजर श्तामेर यांनी चार दिवसपर्यंत पूर्ण व अत्यंत कडक उलटतपासणी घेऊनही, ओळख पटू शकेल अथवा प्रतिबंधक प्रदेशात आणि २३ व्या कोअरच्या विभागात वास्तव्य करण्याचे कारण सापडू शकेल, असा कोणताही पुरावा "इवान" ने दिला नाही.

"उलटतपासणीच्या वेळी तो उर्मटपणे वागला. जर्मन सेनेविषयीचा आणि जर्मन साम्राज्याविषयीचा स्वतःचा शत्रुभाव त्याने लपविला नाही.

"सेनेच्या सर्वोच्च सेनापतींच्या ११ नोव्हेंबर १९४२ च्या आदेशांनुसार, २५-१२-४३ रोजी सकाळी ६.५५ वाजता गोळी घालून ठार करण्यात आले.

“ ... तीत्कोवला ... इनाम देण्यात आले ... १०० (शंभर) मार्क. पावती जोडण्यात आली आहे ... ”

ऑक्टोबर-डिसेंबर
१९५७



माननीय वाचक !

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे.

आमचा पत्ता: 'रादूगा' प्रकाशन, १७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को ११९८५९, सोविएत संघ.

